
मे २०१९/पाने ६०/किंमत ₹१०

# लोकराज्य

## अमर्याद



## अप्रतिम



## अवर्णनीय



# महाराष्ट्र







# महाराष्ट्र दिन...

१) शिवाजी पार्क येथे पार पडलेल्या महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या ५९ व्या वर्धापनदिनाच्या मुख्य शासकीय सोहळ्याप्रसंगी राज्यपाल सी. विद्यासागर राव, मुख्य सचिव यू. पी. एस. मदान, पोलीस महासंचालक सुबोधकुमार जयस्वाल.

२) संचलन दलांची पाहणी करताना राज्यपाल सी. विद्यासागर राव.

३) मानवंदना देताना पोलीस दलाचे पथक.





# अंतरंग

जगभरातील तसेच देशांतर्गत लाखो पर्यटक दरवर्षी महाराष्ट्रात येऊन पर्यटनाचा आनंद घेत असतात. पर्यटनाच्या अमर्याद शक्यता असलेली महाराष्ट्रातील काही पर्यटन स्थळे निसर्गाशी जवळीक साधत असतात.

## निसर्गाशी जवळीक

६

## फेसाळणारे समुद्रकिनारे



१२

पाहताच क्षणी प्रेमात पडावा असा अत्यंत रमणीय ७२० कि.मी. समुद्रकिनारा महाराष्ट्राला लाभला आहे. समुद्र किनाऱ्यावर फिरण्याची मौज काही औरच असते.

## अनुभवा जलाशयांचा गारवा...

पावसाळ्यात वाहणारे असंख्य धबधबे आणि काठोकाठ भरणारी धरणे ही सर्व ठिकाणे पर्यटनासाठी नेहमीच आकर्षणे ठरली आहेत. पावसाळ्यात कोसळणाऱ्या पाण्याखाली मनमुराद भिजण्यासाठी हे धबधबे आपल्याला साद घालत असतात.



२२

## शेतातला आनंद

शहरी माणसाला वाटते, कधी घटकाभर शेतात राहावे, पाण्यात मनसोक्त डुबावे, बैलगाडीतून सैर करावी यांसारख्या थेट शेतीशी संबंधित गोष्टींची ओळख करून घ्यावी. आतापर्यंत असे वाटणाऱ्या लोकांना ते सर्व अनुभवण्याची फारशी संधी मिळत नसे, पण आता कृषी पर्यटनामुळे ही बाब शक्य झाली आहे.



३३


| | |
|---|---|
| निसर्गाशी जवळीक | ६ |
| फिरते व्हा... | ८ |
| फेसाळणारे समुद्रकिनारे | १२ |
| कलात्मक वारसा | १५ |
| दऱ्याखोऱ्यांतील सौंदर्य | १८ |
| अरण्य वाचन | २१ |
| अनुभवा जलाशयांचा गारवा... | २२ |
| वाशिष्ठीतील जलसफर | २४ |
| वाघोबांच्या साम्राज्यात... | २६ |
| आपली सात आश्चर्ये | ३०-३१ |
| शेतातला आनंद | ३३ |
| भूतकाळात डोकावताना... | ३६ |
| रम्य असे अपुला इतिहास... | ४० |
| वेगळी अनुभूती | ४७ |
| प्रेरणेची ऊर्जा | ५० |
| स्वत:ची क्षमता ओळखा... | ५४ |
| सुरळीत आणि सुरक्षित | ५६ |


## वेगळी अनुभूती

आजच्या सर्वच प्रकारच्या जागतिक पर्यटनात संग्रहालयाला भेट दिली जाते. ही संग्रहालये पर्यटकांना वेगळी अनुभूती देत असतात.



४७

वर्ष ७० वे | अंक ११ | मे २०१९

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

लोकराज्य

- मुख्य संपादक — ब्रिजेश सिंह
- प्रबंध संपादक — अजय अंबेकर
- संपादक — सुरेश वांदिले
- कार्यकारी संपादक — डॉ. संभाजी खराट
- उपसंपादक — गजानन पाटील, राजाराम देवकर
- प्रशासन — मीनल जोगळेकर
- वितरण — मनीषा पिंगळे, मंगेश वरकड, अश्विनी पुजारी
- साहाय्य — स्वप्नाली जाधव, भारती वाघ
- मुखपृष्ठ — सीमा रनाळकर, सुशिम कांबळे
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रितशोधन — उमा नाबर
- मुद्रण — डिलिजंट मीडिया कॉर्पोरेशन लि., महापे, नवी मुंबई.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२.
Email : lokrajya.dgipr@maharashtra.gov.in

वर्गणीदार व तक्रार निवारण: ९३७२२३०३२०
(सकाळी १०.३० ते ५.३० कार्यालयीन कामकाजा दिवशी)

ई - लोकराज्य http://dgipr.maharashtra.gov.in

या अंकात प्रकाशित लेखातील मतांशी
शासन सहमतच असेल असे नाही.

# जागतिक वारसास्थळे

**युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत देशातील सर्वात जास्त वारसास्थळांचा मान असलेले महाराष्ट्र हे एकमेव राज्य आहे. अजिंठा लेणी, एलिफंटा लेणी, वेरूळ लेणी व छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसची इमारत, व्हिक्टोरियन गॉथिक आणि आर्ट डेको इमारती यांचा या यादीत समावेश आहे.**

गेल्या पाच वर्षांत भारतातील सात स्थानांचा युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समावेश झाला आहे. विशेष संरक्षणास पात्र असलेले मानवनिर्मित किंवा नैसर्गिक उत्कृष्ट आंतरराष्ट्रीय दर्जाचे ठिकाण, क्षेत्र किंवा संरचना यांना युनेस्कोकडून (युनायटेड नेशन्स एज्युकेशनल, साईंटिफिक ॲण्ड कल्चरल ऑर्गनायझेशन) जागतिक वारसास्थळाचा दर्जा दिला जातो. युनेस्कोच्या जागतिक वारसा समितीकडून या स्थळांची निवडप्रक्रिया पार पडते.

भारतातील एकूण ३७ स्थाने या यादीत असून, यापैकी २९ सांस्कृतिक आहेत, तर ७ नैसर्गिक आहेत. जागतिक वारसास्थळांच्या यादीत भारत जगात सहाव्या स्थानावर आहे. मागच्या वर्षी दक्षिण मुंबईतील १९ व्या शतकातील 'व्हिक्टोरियन आणि आर्ट डेको इमारतींचा' जागतिक वारसा स्थळांच्या यादीत समावेश करण्यात आला. १९ व्या शतकातील व्हिक्टोरियन शैलीच्या आणि २० व्या शतकातील कलात्मक स्थापत्यकलेचा उत्तम नमुना असलेल्या या इमारती समुद्रकिनाऱ्याजवळ असून ओव्हल मैदानाने जोडलेल्या आहेत. १९ व्या आणि २० व्या शतकातील या इमारतींत ओव्हल मैदानजवळील उच्च न्यायालय, मुंबई विद्यापीठ, जुने सचिवालय, एल्फिन्स्टन महाविद्यालय, डेव्हिड ससून वाचनालय, वॉटसन हॉटेल, आदी वास्तूंचा समावेश आहे. व्हिक्टोरियन व आर्ट डेको पद्धतीच्या इमारती या जगभरात दिसून येतात. मात्र, एकाच परिसरात एवढ्या मोठ्या प्रमाणात दोन्ही शैलीच्या इमारती या फक्त मुंबईतच आढळतात.



**डेव्हिड ससून वाचनालय, फोर्ट, मुंबई.**

# शोभिवंत महाराष्ट्र...

केल्याने देशाटन.. असे आपण म्हणतो. त्यामुळेच पर्यटन हा सर्वांच्याच आवडीचा विषय आहे. वर्षातून एकदातरी कुटुंबासह देशात किंवा परदेशात जाऊन भ्रमंती करण्याकडे नागरिकांचा कल वाढलेला आहे. नवनवीन पर्यटन स्थळे पाहावीत, त्या स्थळांचा आनंद घ्यावा, असे प्रत्येकाला वाटत असते.

अलीकडच्या काळात विविध प्रकारचे पर्यटन सुरू झालेले आहे. कृषी पर्यटन, वन पर्यटन, म्युझियम पर्यटन, धार्मिक पर्यटन, वैद्यकीय पर्यटन, सांस्कृतिक पर्यटन, ऐतिहासिक पर्यटन, साहसी पर्यटन, सामाजिक पर्यटन असे कितीतरी पर्यटनाचे पर्याय उपलब्ध झालेले आहेत. त्यामुळे आपल्या आवडीनुसार पर्यटन करण्यास संधी उपलब्ध आहेत.



पर्यटकांची आवड लक्षात घेता अनेक टूर्स ॲण्ड ट्रॅव्हल्स कंपन्या पर्यटन सहली आखत असतात. त्यामुळे पर्यटनासाठी कोठेही आपण सहजपणे जाऊ शकतो. निसर्ग भ्रमंती, दुर्गभ्रमंती किंवा सुंदर समुद्रकिनारा आपण दोन-तीन दिवसांच्या सहलीमध्ये कुटुंबासह पाहू शकतो. आपल्या राज्यात पर्यटनासाठीचे अनेक पर्याय उपलब्ध आहेत. नागरिकांमध्ये पर्यटनाची मोठ्या प्रमाणात आवड निर्माण झाली आहे. महाराष्ट्र पर्यटन महामंडळाने अनेक सोयीसुविधा पर्यटकांसाठी उपलब्ध केल्याने दरवर्षी पर्यटकांच्या संख्येत वाढ होत आहे. तेथे राहण्याची उत्तम सोय असल्याने पर्यटक सहलीचा चांगला आनंद घेतात. पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी महामंडळाने अनेक चांगले उपक्रम सुरू केले आहेत. त्यामुळे पर्यटकांनाही सहलीचा आनंद घेतल्याचे समाधान मिळते.

'मे' चा लोकराज्य पर्यटन या खास विषयावर आहे. जनतेला नवनवीन पर्यटन स्थळांची माहिती व्हावी, त्या ठिकाणी कसे जावे, त्या भागाचा इतिहास समजावा म्हणून पर्यटन अंक सजवला आहे. या अंकात जवळपास सर्वच महत्त्वाच्या स्थळांची थोडक्यात माहिती दिली आहे. राज्यातील समुद्रकिनारे, धबधबे, गड-किल्ले, लेणी, गुंफा, अभयारण्य आणि जलाशय अशा विविध नयनरम्य स्थळांचा आढावा या अंकात घेण्यात आला आहे. त्यामुळे पर्यटकांना सहलीला जाताना त्याचा नक्कीच उपयोग होईल.

पर्यटन विकास महामंडळ आपल्या गड-किल्ल्यांच्या पर्यटनवाढीस विशेष लक्ष पुरवत आहे. यामुळे नव्या पिढीस आपली संस्कृती, उज्ज्वल इतिहास आणि अभिमानास्पद वारशांची नव्याने ओळख होत आहे.

आपल्या देशात प्रथमच 'क्रुझ पर्यटन' मुंबईत सुरू झाले आहे. त्यामुळे पर्यटकांना सागरावरील भ्रमंतीची नवी सुविधा उपलब्ध झाली आहे. महामंडळाने 'होम स्टे'ची नावीन्यपूर्ण योजना प्रभावीरीत्या राबवली असून त्यामुळे आपल्या संस्कृती आणि परंपरेची ओळख होण्यासोबतच महिलांना रोजगार-स्वयंरोजगाराच्या विपुल संधी उपलब्ध झाल्या आहेत.

महाराष्ट्रात अनेक सामाजिक संस्था आहेत. अनेक समाजोपयोगी उपक्रम त्यांनी राबवले आहेत. अशा काही सामाजिक संस्थांची ओळख 'प्रेरणेची ऊर्जा' या लेखातून करून दिली आहे.

शहरांमध्ये राहणाऱ्या नागरिकांना ग्रामीण भागाची ओढ वाटू लागली आहे. शेती व्यवसाय आणि तेथील पीकपाणी या गोष्टी आजही त्यांच्या मनाला भुरळ घालतात. अशा नागरिकांना कृषी पर्यटन हा एक चांगला पर्याय रूढ झाला आहे. राज्यातील महत्त्वाच्या अशा कृषी पर्यटन केंद्रांची माहिती या अंकात आहे.

पर्यटनाच्या दृष्टीने म्युझियम पर्यटन ही पर्यटनाची नवी संकल्पना जगभर रूढ झालेली आहे. या माध्यमातून ऐतिहासिक घटना आणि घडामोडींची नोंद आपल्याला पाहायला मिळते. म्हणूनच या अंकात म्युझियम पर्यटन याबाबतही माहिती दिली आहे. तसेच ऐतिहासिक गगनबावड्याची माहिती यात दिली असून 'निसर्गाशी जवळीक' या लेखातून पर्यटन महामंडळाच्या विविध उपक्रमांचा तसेच महाराष्ट्रात नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीचा थोडक्यात आढावा या अंकात घेतला आहे.

मला खात्री आहे की, नेहमीप्रमाणेच हा अंक आपणा सर्वांना आवडेल.

**विनिता वेद सिंगल** (अतिथी संपादक)
सचिव, पर्यटन, महिला व बालविकास




**महाराष्ट्रातील पर्यटनस्थळांना दरवर्षी राज्यासह देश, विदेशातील हजारो पर्यटक भेटी देत असतात. समुद्रकिनारे, किल्ले, व्याघ्र प्रकल्प, गुंफा, राष्ट्रीय उद्याने, थंड हवेची ठिकाणे पर्यटकांना नेहमीच भुरळ घालतात. ही पर्यटन स्थळे निसर्गाशी जोडल्यामुळे पर्यटकांना वेगळी अनुभूती मिळते.**

# निसर्गाशी जवळीक

**अभिमन्यू काळे** (भा.प्र.से.)

पर्यटनस्थळांसोबतच महाराष्ट्रातील साहित्य, सांस्कृतिक, कला परंपरा, स्थानिक लोकनृत्यांसह काव्य व गायन याचा आनंद पर्यटक आता घेऊ शकतात. दिवसभर विविध स्थळांना भेटी देऊन महामंडळाच्या रिसॉर्टवर परतलेल्या पर्यटकांसाठी असे आगळेवेगळे कार्यक्रम घेतले जात आहेत.

## पौर्णिमा महोत्सव

पर्यटकांना निसर्गाशी जोडणारा पौर्णिमा महोत्सव एक मनोरंजनात्मक उपक्रम आहे. महामंडळाच्यावतीने चालवण्यात येणाऱ्या हरिहरेश्वर, वेळणेश्वर, तारकर्ली, गणपतीपुळे, माथेरान, माळशेज घाट, महाबळेश्वर, अजिंठा फरदापूर, औरंगाबाद, कार्ला, पानशेत, भंडारदरा, शिर्डी, चिखलदरा, ताडोबा मोहर्ली, नागपूर, बोदलकसा, कुणकेश्वर येथील रिसॉर्टवर प्रत्येक महिन्यात पौर्णिमेच्या रात्री हा कार्यक्रम घेतला जातो.

महामंडळाचे बहुतांश रिसॉर्ट हे निसर्गाचे सान्निध्य लाभलेल्या जंगलभागात आहेत. पौर्णिमेची रात्र हलक्या प्रकाशाने अधिक खुलून जाते. या रात्रीचे सौंदर्य इतर

दिवसांपेक्षा वेगळेच असते. अशा विलोभनीय निसर्गरम्य वातावरणात पौर्णिमा महोत्सव रंगतो. रिसॉर्टवरील पर्यटक या महोत्सवाचा आनंद घेतात. या महोत्सवात स्थानिक कलावंतांना सहभागी करून घेतले जाते. त्यांच्या मनाला खुणावणाऱ्या कविता पर्यटकांना एका वेगळ्या दुनियेत घेऊन जातात. पर्यटकांना आगळीवेगळी मेजवानी देण्यासोबतच स्थानिक कलावंतांनाही एक चांगले व्यासपीठ या महोत्सवाच्या निमित्ताने उपलब्ध झाले आहे.

## पर्यटक गातात गाणी

अनेक पर्यटक लगतच्या सुट्यांमध्ये पर्यटनाचा बेत आखतात. त्यामुळे विकेंडला पर्यटनस्थळांना भेटी देणाऱ्यांची संख्या अधिक असते. विकेंडच्या या पर्यटकांचे खास मनोरंजन पर्यटन महामंडळाच्यावतीने केले जाते. महामंडळाच्या रिसॉर्टवर अशा गर्दीच्या आठवड्यातून किमान दोन दिवशी खास मनोरंजनाचे कार्यक्रम घेतले जातात. हे कार्यक्रमसुद्धा स्थानिक कलावंतांद्वारे साजरे केले जातात. त्यात काव्यवाचनासह एकपात्री प्रयोग, दशावतारी कार्यक्रम तसेच संगितखुर्ची, जादूचे प्रयोग, पर्यटकांचे अनुभव कथन आदींचा समावेश आहे.

आर्केस्ट्रा गायन व 'कराओके'द्वारे गायनाचे कार्यक्रमही घेतले जातात. पर्यटकांना आपल्यातील सुप्त गुणांचे प्रदर्शन या वेळी करता येते. अनेक पर्यटक मोकळेपणाने गायनाचा आनंदही चांदण्यारात्री निसर्गरम्य वातावरणात घेतात.

## खाद्य संस्कृतीला प्रोत्साहन

राज्याच्या वेगवेगळ्या भागात विविध प्रकारची खाद्यसंस्कृती आहे. महामंडळाच्या त्या-त्या ठिकाणी असलेल्या रिसॉर्टमध्ये या खाद्यांचा आस्वाद पर्यटकांना घेता यावा म्हणून किमान पाच प्रकारचे स्थानिक पदार्थ बनवले जातात. महामंडळाच्या या उपक्रमामुळे महाराष्ट्राची रूचकर खाद्य संस्कृती देशभर प्रचलित केली जात आहे.

## पर्यटक वाचनालय

देशाच्या विविध भागातून पर्यटक राज्यातील स्थळांना भेटी देतात. या पर्यटकांसाठी महामंडळाच्या पर्यटन निवासात खास वाचनालयाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. विशेष म्हणजे या ठिकाणी मराठी सोबतच हिंदी, गुजराती, बंगाली भाषेतील पुस्तकेसुद्धा पर्यटकांना वाचनासाठी उपलब्ध आहेत. पर्यटकांच्या मनोरंजनासाठी महामंडळाच्यावतीने पर्यटन निवासस्थानी प्रश्नमंजुषासारखे कार्यक्रम घेतले जातात. पर्यटकांसह सामान्यांसाठी फोटोग्राफी स्पर्धा, चित्रकला स्पर्धा घेतल्या जातात.

## पर्यटनातून रोजगार

पर्यटकांना राज्यातील पर्यटनस्थळांचा आनंद घेता यावा, त्यांचा राज्यातील प्रवास, निवास अधिक सुखकर व्हावा, तसेच त्यांना परतीच्या प्रवासात चांगल्या आठवणी आपल्यासोबत घेऊन जाता याव्यात, यासाठी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ झटत असते. पर्यटनातून रोजगार ही संकल्पनाही महामंडळ राबवत आहे. यासाठी महामंडळाने अधिक व्यापक, सर्वसमावेशक, पर्यटकस्नेही होण्याचा संकल्प केला आहे. त्यामुळे देशातील इतर राज्यांमध्ये महामंडळाचे कामकाज कशा पद्धतीने चालते याचा अभ्यास करण्यासाठी १२ राज्यांमध्ये महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी अभ्यास दौरा केला. या दौऱ्यात आढळून आलेल्या उल्लेखनीय बाबींचे सादरीकरण राज्यातील महामंडळाचे अधिकारी व कर्मचाऱ्यांसमोर करण्यात आले. त्यानुसार अनेक चांगले बदल पर्यटन महामंडळात घडून येणार आहेत.

**व्यवस्थापकीय संचालक,**
**महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ**

## बाग-बगिच्यांची सहल

आंबे, द्राक्ष किंवा संत्री प्रत्येक व्यक्ती आवडीने खातो. परंतु या फळांच्या मळ्यांना भेटी देऊन प्रत्यक्ष लगडलेली ही फळे पाहण्याचा योग फार कमी पर्यटकांच्या आयुष्यात येतो. विविध पिकांच्या या मळ्यांना भेटी देण्यासोबत ती फळे कशी पिकवली जातात, पिकांची काढणी ते विक्री तंत्रज्ञानसोबतच त्यावरील प्रक्रिया उद्योग याची अनुभूती महामंळाच्यावतीने विविध महोत्सवांचे आयोजन करून घडवली जाते. महोत्सव म्हटला की, त्यानिमित्ताने सांस्कृतिक कार्यक्रम, गायन, नृत्य, मनोरंजनाचे एकूणच विविध कार्यक्रम अशीच धारणा असते. परंतु आंबा महोत्सव, द्राक्षे महोत्सव, संत्रा महोत्सव मात्र वेगळा आहे. द्राक्ष पिकणाऱ्या भागातील महामंडळाच्या रिसॉर्टवर द्राक्ष महोत्सव उपक्रम राबवला जातो. महोत्सवाची घोषणा केल्यानंतर यात सहभागी होणाऱ्या पर्यटकांची नोंदणी केली जाते. या पर्यटकांना द्राक्षांची शेती, लगडलेली द्राक्षे दाखवली जातात. द्राक्षांची शेती कशी केली जाते, याबाबत शेतकऱ्यांशी संवाद, शेतीचे मशागत तंत्र, विक्री व्यवस्थापन यासोबतच द्राक्षांपासून तयार होणाऱ्या विविध वस्तूंच्या प्रक्रिया उद्योगांनाही भेटी घडवल्या जातात. द्राक्षांपासून वाइन तयार केली जात असल्याने वायनरीला भेटसुद्धा दिली जाते. असेच आंबा व संत्री महोत्सवही घेतले जातात. या महोत्सवातून फळपिकांची थेट विक्री केली जाते.



# फिरते व्हा...

**जगभरातील तसेच देशांतर्गत लाखो पर्यटक दरवर्षी महाराष्ट्रात येऊन पर्यटनाचा आनंद घेत असतात. पर्यटनाच्या अमर्याद शक्यता असलेल्या महाराष्ट्रातील काही पर्यटन स्थळांची आनंददायी सफर..**

**मीनल जोगळेकर**

आदिम काळापासून प्रवास ही मनुष्यप्राण्याची सहज प्रवृत्ती आहे. अन्न, वस्त्र आणि निवारा या मूलभूत गरजा भागवण्यासाठी मानवाने सुरू केलेला प्रवास, आजच्या काळात मूलभूत गरजा भागवण्याबरोबरच स्वत:चे जगणे समृद्ध करून घेण्यासाठी सुरू आहे. 'अतिथी देवो भव' असे मानणारी आपली संस्कृती त्यातूनच आकाराला आली. प्राचीन काळी पर्यटनासाठी पायी, बैल, घोडे, खेचर, उंट इत्यादींचा तर मध्ययुगीन कालखंडात बैलगाडी, घोडागाडी, होडी इत्यादींचा वापर केला जात असे. कालौघात तंत्रज्ञान प्रगत होत गेले, दळणवळण सुकर झाले आणि आजच्या काळात तर अनेक देशांची संपूर्ण अर्थव्यवस्था पर्यटन व्यवसायावर चालते. नातेवाइकांच्या भेटी-गाठी, व्यापार, विविध प्रदेशांबद्दल आकर्षण, धार्मिक स्थळांना भेटी, यात्रा-जत्रा, हवापालट ते शिक्षण, नोकरी, ऐतिहासिक वास्तूंची आवड, निसर्गाची आवड, रोजच्या जीवनातील एकसुरीपणात बदलाची आवश्यकता, धकाधकीच्या आयुष्यातून थोडा विरंगुळा, आनंदासाठी पर्यटन असा 'प्रवास' या संकल्पनेचा विस्तार होत गेला.

अलीकडे तर वैद्यकीय, कृषी, साहसी, सामाजिक असे अनेक पैलू पर्यटनाशी जोडले गेले आहेत. साध्या-सोप्या उद्दिष्टाने केल्या जात असलेल्या प्रवासाला, देशाच्या अर्थव्यवस्थेत मोठा वाटा असणारा 'पर्यटन व्यवसाय' असे स्वरूप प्राप्त झाले आहे. पर्यटक आणि पर्यटन उद्योग या दोन्ही घटकांचा लाभ करून देणारे हे क्षेत्र आहे.

प्रवासातून विविध मानवी समूह, संस्कृती यांची परस्पर ओळख होत असे, अनेक गोष्टींची देवाणघेवाण होत असे. एकमेकांच्या समाजजीवनाचे आकलन होत असे. व्यापार-उदीम वाढीला लागत असे. आजचा पर्यटन व्यवसाय हा बहुस्पर्शी आहे. हा असा व्यवसाय आहे, जो अर्थशास्त्र, समाजशास्त्र, विज्ञान, व्यवस्थापन, पर्यावरण, भूगोल इ.अनेक घटकांशी निगडित



आहे.

हवामान, ऋतू, अतिवृष्टी, अवर्षण, भूकंप, उल्कापात, लाव्हा उद्रेक यांसारख्या नैसर्गिक तर इतिहास, संस्कृती इ. अनैसर्गिक घटकांचा पर्यटनावर परिणाम होतो. आज पर्यटनाचे राष्ट्रीयत्वानुसार, कालावधीनुसार, संख्येनुसार, उद्देशानुसार, वाहतूक साधनांनुसार, ऋतूनुसार, पर्यटन स्वरूपानुसार असे विविध प्रकारे ढोबळमानाने वर्गीकरण करण्यात येते. कुशल व अकुशल अशा दोन्ही प्रकारच्या कामगारांची या व्यवसायासाठी गरज लागते, त्यांना प्रत्यक्ष रोजगार उपलब्ध होतो. सेवा उद्योग असल्याने स्थानिक पातळीवरच वाहतूक, हॉटेल, उपहारगृहे, लघु व मध्यम उद्योगांना चालना, स्थानिक कलाकार-कारागिरांना रोजगाराच्या संधी मिळतात, प्रदेशाचा भौतिक - आर्थिक विकास होतो, स्थानिक बाजारपेठ विकसित होते, आचार-विचार, रूढी, चालीरितींची देवाणघेवाण होते, एकतेची भावना वाढीस लागते, राहणीमान बदलते, खाद्यसंस्कृतीची ओळख होते, संस्कृतीचे जतन होते, परदेशी पर्यटकांकडून परकीय चलनाचा लाभ होतो. पर्यटन क्षेत्र हे ज्ञान, आनंद, समाधान इ. अभौतिक घटकांचे उत्पादक क्षेत्र समजले जाते.

## महती महाराष्ट्राची

*'आषाढस्य प्रथमदिवसे मेघमाश्लिष्टसानु वप्रक्रीडापरिणतगजप्रेक्षणीयं ददर्श'*

'मेघदूत' या जगप्रसिद्ध खंडकाव्यातील या लोकप्रिय ओळी ज्या ठिकाणी महाकवी कालिदासाला स्फुरल्या, ते ठिकाण म्हणजे नागपूरजवळील रामगिरी, आताचे रामटेक !

एका प्रेमव्याकूळ शापित यक्षासाठी मेघाने दूत म्हणून करायच्या प्रवासाचे रमणीय वर्णन म्हणजे मेघदूत हे भावरम्य काव्य! थोडक्यात, पर्यटनाच्या दृष्टीने महाराष्ट्र प्रदेशाची महती प्राचीन काळापासून आजतागायत आहे.

## अमर्याद महाराष्ट्र

विविधतेने संपन्न असलेले आपले राज्य पूर्वापार सर्व प्रकारच्या पर्यटनासाठी अतिशय आदर्श मानले गेले आहे, ही आपल्यासाठी आनंदाची आणि अभिमानाची गोष्ट आहे. महाराष्ट्राचे भौगोलिक स्थान आणि नैसर्गिक संपदा यांनी राज्याच्या पर्यटन-अनुकूलतेत भरच घातली आहे. उंच-उंच पर्वतरांगा, घनदाट जंगले, पश्चिम घाटातील जैवविविधता, सह्याद्रीच्या उंच डोंगररांगांतील थंड हवेची ठिकाणे, विपुल पशुपक्षी व वनसंपदा राखून असलेली अभयारण्ये, फेसाळणारे विस्तीर्ण समुद्र किनारे, समुद्रातील साहसी खेळ, ऐतिहासिक गडकिल्ले, प्राचीन कोरीव लेणी, भाविकांचे श्रद्धास्थान असलेली धार्मिक स्थळे, पुरातन वस्तूंचे जतन करणारी संग्रहालये, संस्कृतीच्या पाऊलखुणा जपणारी ठिकाणे, जागतिक वारसाचा मान मिळालेली ठिकाणे, जगातील आश्चर्य समजले जाणारे, उल्कापातामुळे निर्माण झालेले खाऱ्या पाण्याचे लोणार सरोवर अशी अनेक पर्यटनस्थळे भिन्न अभिरूची असलेल्या सर्व वयोगटातील पर्यटकांसाठी महाराष्ट्राने उपलब्ध करून दिले आहेत.

आचार्य अत्र्यांनी सार्थ अभिमानाने म्हटलेच आहे की, माझ्या महाराष्ट्राला इतिहास आहे, बाकीच्या राज्यांना फक्त भूगोल आहे. देशातील सर्वाधिक विमानतळ राज्यात असून सर्वाधिक लांबीचे रस्ते, रेल्वेचे जाळे, मेट्रो, मोनोरेल अशी जलद, आरामदायी व सुखकर वाहतुकीची साधने, धर्मशाळा, यात्री निवास, शासकीय विश्रांतिगृहे, खासगी हॉटेल्स, बंगले, रिसॉर्ट अशा अनेक प्रकारच्या निवासाच्या उत्तम व विपुल सुविधा उपलब्ध आहेत.

पर्यटनस्थळांचा विकास आणि अन्य पायाभूत सोयीसुविधांनीयुक्त महाराष्ट्राचा सर्वाधिक पर्यटक संख्या असलेल्या देशातील पहिल्या दहा राज्यांमध्ये समावेश होतो. औरंगाबादला महाराष्ट्राच्या पर्यटन राजधानीचा मान मिळाला आहे, तर सिंधुदुर्ग जिल्ह्याची पर्यटन जिल्हा म्हणून ओळख आहे.

## पर्यटनक्षमता

मुंबई देशाची आर्थिक राजधानी तसेच अत्याधुनिक सुविधांनीयुक्त शहर म्हणून जागतिक नकाशावर सुस्थापित असल्याचा नैसर्गिक फायदा मुंबई आणि महाराष्ट्राला मिळत आला आहे. देशभरात पर्यटनाच्यादृष्टीने उपलब्ध सोयीसुविधा, आरामदायी प्रवास यांचा विचार करता सर्वाधिक पर्यटनक्षमता असणाऱ्या राज्यांमध्ये महाराष्ट्र राज्याचा पहिला क्रमांक असल्याचे 'वर्ल्ड ट्रॅव्हल ॲण्ड टुरिझम कौन्सिल'ने 'एचव्हीएस' या संस्थेच्या मदतीने केलेल्या सर्वेक्षणातून सिद्ध झाले आहे. देशभरातील सर्व राज्यांचे पर्यटन उद्योगाच्या दृष्टीने आवश्यक असणारे अर्थकारण, त्यासाठीच्या पायाभूत सुविधा ज्यात निवासासाठी उपलब्ध असलेल्या हॉटेल्सपासून ते प्रवासी साधनांपर्यंत अनेक घटकांची पाहणी करून विश्लेषण केल्यानंतर महाराष्ट्रात सर्वात जास्त पर्यटनक्षमता दिसून आली आहे. अतिशय व्यावसायिक पद्धतीने पर्यटनाची आखणी करणाऱ्या पर्यटन संस्था महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर आहेत. पर्यटनाचा उद्देश, स्थळाची निवड, कालावधी, आर्थिक व सुट्यांचे नियोजन, सहल आराखडा, प्रवास-वाहन, निवास, आरक्षण इ. सर्व बाबतीत त्या पर्यटकांना मार्गदर्शन करण्यासाठी तत्पर असतात. उन्हाळ्यात सहलींसाठी थंड हवेच्या ठिकाणी, पावसाळ्यात जंगल, उंच डोंगररांगा, धबधबे, धरण या ठिकाणी तर हिवाळ्यातील समुद्र किनारे, तंबू, हाऊसबोट, रिसॉर्ट या ठिकाणी पर्यटकांची गर्दी असते.

महाराष्ट्रात पर्यटनाचे कोणकोणते पर्याय उपलब्ध आहेत, ते आता थोडक्यात बघू या.

## वारसा पर्यटन

**शिल्पे –** अजिंठा-वेरूळ, घारापुरी लेणी, गुंफा इ.

**स्थापत्य–** शिवकालीन किल्ले, ऐतिहासिक राजवाडे, दक्षिण मुंबईतील परिसरातील व्हिक्टोरियन गॉथिक पद्धतीच्या वास्तू व कलात्मक वास्तू (आर्ट डेको), बिबिका मकबरा, आगाखान पॅलेस इ.



**नैसर्गिक पर्यटन : सागरी किनारे, नद्या, सरोवरे, पर्वत व डोंगररांगा, दऱ्या, घळ्या, घाट, धबधबे, झरे, गरम पाण्याचे झरे, वने, वन्य प्राणिजीवन, अभयारण्ये, लोणार सरोवर, कास पठार इ.**

**ऐतिहासिक घटना-प्रसंगांच्या साक्षीदार वास्तू** – सेवाग्राम आश्रम, दीक्षाभूमी, चैत्यभूमी इ.

**हस्तकला** – सावंतवाडी खेळणी, पैठणची पैठणी, सोलापुरी चादरी इ.

**संगीत-नृत्य-नाट्य** – कालिदास महोत्सव, सवाई गंधर्व, महोत्सव, एलिफंटा, बाणगंगा, वेरूळ-अजिंठा महोत्सव, सारंगखेडा चेतक, लावणी, तमाशा, दशावतार, खडीगंमत महोत्सव इ.

**खाद्य भ्रमंती** – कोकणातील मासे, सांगलीची हळद, कोल्हापूरचा गूळ, नागपूरची संत्रा बर्फी, पुण्याची बाकरवडी, कोल्हापूरची मिसळ, नाशिकचा भडंग इ.

## धार्मिक पर्यटन

भारतातील एकूण बारा ज्योतिर्लिंगांपैकी औंढा नागनाथ, परळी-वैजनाथ, त्र्यंबकेश्वर, घृष्णेश्वर आणि भीमाशंकर ही पाच स्थाने, पंढरपूरची विठुमाउली, अहमदनगर जिल्ह्यातील शनिशिंगणापूर, पुण्याच्या आसपास अष्टविनायकांची मंदिरे, मुंबईची महालक्ष्मी, सिद्धिविनायक, मुंबादेवी, माऊंट मेरी, हाजी अली, कोल्हापूरची महालक्ष्मी, नरसोबाची वाडी, तुळजापूर, पैठण, देहू, गणपतीपुळे, आदासा, धापेवाडा, कोराडी, माहुर, आळंदी, शिर्डी, शेगाव, कारंजा, रामटेक, आंबेजोगाई, जेजूरी, नांदेडचे सचखंड गुरूद्वारा इ.

**यात्रा, जत्रा** – काळुबाई, मांढरदेवी, भराडीदेवी इ.

**सण, उत्सव** – गणेशोत्सव, दहीहंडी, रंगपंचमी, गुढीपाडवा, ख्रिसमस, नंदुरबार येथील आदिवासींची होळी इ.

## साहसी पर्यटन

वनभ्रमंती, गिरिभ्रमंती, उंच कातळ खडकांवर रॅपलिंग, रॉक क्लाईबिंग, व्हॅली क्रॉसिंग, पॅरासेलिंग, रिव्हर राफ्टिंग, बंजी जंपिंग इ.

## संकल्पना पर्यटन

चित्रनगरी, गोरेगाव (बॉलीवूड पर्यटन), नाशिक येथील वाईन पर्यटन, मुंबई शॉपिंग फेस्टिवल, एस्सेल वर्ल्ड, इमॅजिका इ.

## पर्यटनातील नवीन संकल्पना

**पर्यावरणपूरक पर्यटन (इको टूरिझम)** – निसर्ग संपन्न प्रदेशांमध्ये अथवा सांस्कृतिक वारसा असलेल्या जागी तिथल्या पर्यावरणाला कोणत्याही प्रकारचा धक्का न लागू देता, स्थानिक लोकांच्या मदतीने नैसर्गिक व स्थानिक सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात.

**कृषी पर्यटन** – लोकांना प्रदूषणमुक्त वातावरणात चार दिवस राहण्याची सुविधा कृषी पर्यटनातून प्राप्त होते. शेतीशी

तुटलेली नाळ यामधून जोडली जाण्यास, शेतकऱ्यांचे अवांतर उत्पन्न वाढण्यास व शहर-खेडे ऋणानुबंध निर्माण करण्यास कृषी पर्यटनातून मदत होते.

**आरोग्य पर्यटन –** प्रदूषणमुक्त, आल्हाददायक, स्वच्छ हवामानात प्रकृतीत सुधारणा करण्यासाठी हवापालट करणे म्हणजे आरोग्य पर्यटन. आरोग्याच्या उत्तम सोयी, योग्य आणि माफक दरात उपलब्ध निसर्गोपचार व जोडीला निसर्गसौंदर्य असल्यास आरोग्यावर सकारात्मक परिणाम होतो. म्हणूनच स्थानिक पर्यटक महाबळेश्वर, माथेरान, चिखलदरा, वाई, पाचगणी, इ. शांत निसर्ग संपन्न व सौंदर्याने नटलेल्या परिसरात हवापालटासाठी जातात व एका आठवड्यापासून ते तीन महिन्यापर्यंत वास्तव्य करतात.

**सामाजिक-प्रगतिशील पर्यटन –** पर्यटनाच्या या नव्या संकल्पनेमुळे दृष्टिकोन व्यापक होण्यास, जाणिवा समृद्ध होण्यास आणि समाजातील वंचित घटकांबद्दल सहवेदना वाढीस लागण्यास व अनुभवविश्वात मोलाची भर पडण्यास मदत होते. ज्यांच्या कार्यामुळे समाजाच्या तळागाळातूनच बदल घडवून आणले गेले आणि राष्ट्रबांधणीच्या महत्त्वाच्या कार्यात दूरगामी परिणाम घडून आले अशा काही व्यक्तींच्या गाठीभेटी या 'सामाजिक-प्रगतिशील पर्यटनातून' घेतल्या जातात आणि अशा काही प्रकल्पांना भेटीही देण्यात येतात.

**स्वावलंबी पर्यटन –** माहितीच्या स्फोटामुळे आज सर्वांनाच सर्व प्रकारची माहिती विनासायास मिळू लागली आहे. आपल्याला जेथे जायचे आहे, ती सर्व माहिती आधीच मिळवून पर्यटन संस्थेच्या सहायाने आपली सहल आखून घेण्याची पद्धत वाढली आहे. आपले बजेट ठरवायचे, आपल्याला काय पाहायचे आहे, कोठे राहायचे आहे हे नक्की करायचे आणि मग पर्यटन संस्थेच्या माध्यमातून आरक्षण करायचे, अशी ही किफायती पद्धत. तर आर्थिक परिस्थिती उत्तम असलेल्यांना खासगीपणा जपायचा असतो, त्यामुळे ते स्वतःच्या मर्जीनुसार अशा स्वावलंबी सहलीची आखणी करून घेतात.

## पर्यटन व निसर्गाची जपणूक

पर्यावरण हा पर्यटनाचाच नव्हे तर एकूणच मानवी जीवनाचा गाभा आहे. पर्यटन या नैसर्गिक आणि मानवनिर्मिती घटकांचा व कृतींचा 'पर्यटन' या सांघिक कृतीत समावेश होतो. त्यामुळे पर्यटनाला गेल्यानंतर आपल्या पर्यटनाचा तिथल्या पर्यावरणावर कोणताही विपरीत परिणाम होणार नाही, तिथलं पर्यावरण शाश्वत राहील, याची काळजी घेणे आवश्यक आहे; कारण जैवविविधता टिकवणे ही सृष्टीचे आणि पर्यायाने मानवाचे अस्तित्व टिकवण्यासाठीची मूलभूत बाब आहे. नैसर्गिक पर्यटनस्थळी कचरा करून नये, झाडेझुडपे नष्ट करू नये, गाड्यांमुळे ध्वनी व वायूप्रदूषण करू नये, सकारात्मक बदलाची सुरुवात प्रत्येकाने स्वतःपासून करून पर्यावरण रक्षणासोबतच स्थानिक संस्कृती, कला, खाद्यसंस्कृती यांच्या जपणुकीला हातभार लावला पाहिजे.

समर्थ रामदास स्वामींनी म्हटल्याप्रमाणे 'केल्याने देशाटन, मनुजा चातुर्य येतसे फार' हा अनुभव घ्यावा.

संपादक, महाराष्ट्र अहेड

भिलार गावाचा पुस्तक पर्यटनाचा नकाशा.




**साहित्यिक पर्यटन :**
**पुस्तकांचे गाव भिलार, कालिदास स्मारक, केशवसुत स्मारक,**



# फेसाळणारे समुद्रकिनारे

**पाहताच क्षणी प्रेमात पडावा असा अत्यंत रमणीय ७२० कि.मी. समुद्रकिनारा महाराष्ट्राला लाभला आहे. समुद्र किनाऱ्यावर फिरण्याची मौज काही औरच असते.**

## हर्णे-मुरुड (रत्नागिरी)

हर्णे हे एक अरबी समुद्रावरील प्राचीन बंदर आहे. हर्णे - मुरुड गावचा समुद्रकिनारा सुंदर आहेच आणि या गावांना ऐतिहासिक महत्त्वसुद्धा आहे. सुवर्णदुर्ग, कनकदुर्ग आणि गोवा अशा सागरी किल्ल्यांचे अस्तित्व या गावांना आहे. कनकदुर्ग किल्ला हा समुद्रात जमिनीचे टोक घुसले आहे, त्यावर बांधलेला आहे. हर्णेचा धक्का याच किल्ल्याच्या डाव्या अंगाला आहे. तर गोवा किल्ला हा समुद्राच्या किनाऱ्यावर बांधलेला आहे. परंतु सुवर्णदुर्ग हा संपूर्णपणे समुद्रात असलेला किल्ला आहे. तिथे जाण्यासाठी हर्णे बंदरावरून होडीने जावे लागते. अनेक बुरूज असलेली एक सलग तटबंदी या किल्ल्याला लाभलेली आहे. दोन दरवाजे असलेल्या या किल्ल्यात तटाच्या आतील बाजूस एक मोठा जलाशय बांधलेला दिसतो.

गर्द झाडीने बहरलेले मुरुड हे दापोली या तालुक्याच्या ठिकाणापासून जेमतेम १४ कि.मी.वर असलेले सुंदर टुमदार गाव. या गावच्या ग्रामदेवतेचे म्हणजेच दुर्गादिवीचे मंदिर विशेष पाहण्याजोगे आहे. या गावचे एक खास वैशिष्ट्य म्हणजे या गावाने दोन अशी नररत्ने या देशाला दिली की, त्यांनी या गावचे आणि देशाचेही नाव सुद्धा उज्ज्वल केले आहे. अण्णासाहेब उर्फ धोंडो केशव कर्वे आणि संस्कृतपंडित पांडुरंग वासुदेव काणे ही ती दोन थोर व्यक्तिमत्त्वे. यांना भारतरत्न हा सर्वोच्च नागरी सन्मान देऊन गौरवण्यात आले आहे.

### कसे जाल ?

जवळचा विमानतळ मुंबई येथे आहे. जवळचे रेल्वे स्थानक हे कोंकण रेल्वेवरील खेड हे आहे. मुंबई, पुणे आणि कोल्हापूरवरून राज्य परिवहनाच्या अनेक बसेस दापोलीसाठी उपलब्ध आहेत. दापोली ते हर्णे मुरुड हे अंतर १४ कि.मी. आहे. दापोलीहून तिथे जाण्यासाठी रिक्षा उपलब्ध असतात.

## रत्नागिरी

भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील अग्रणी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचे जन्मस्थान असणाऱ्या रत्नागिरी शहरात टिळक स्मारक म्हणून जतन केलेले टिळकांचे घर, पतितपावन मंदिर, थिबा पॅलेस, रत्नदुर्ग किल्ला, नारळ संशोधन केंद्र, भगवती बंदर, भाट्ये येथील समुद्र किनारा, मिऱ्या बंदर येथील सी-फूड प्रोसेसिंग सेंटर ही ठिकाणे आवर्जून पाहण्यासारखी आहेत.

## बोर्डी-डहाणू किनारा (मुंबई)

बोर्डी-डहाणू हा सागरी किनारा अस्सल ग्रामीण संस्कृतीचे दर्शन घडवतो. 'चिकू' म्हणजेच डहाणू आणि घोलवड असे घट्ट समीकरण आहे.

**कसे जाल?**

जवळचा विमानतळ मुंबई. मुंबई, सुरत आणि नाशिक या शहरांपासून बस आणि रेल्वेचे बरेच पर्याय उपलब्ध आहेत.

## दिवेआगर, हरिहरेश्वर, श्रीवर्धन

रायगड जिल्ह्यातील समुद्रकिनाऱ्यावर असलेली प्रसिद्ध तीन ठिकाणे म्हणजे दिवेआगर, हरिहरेश्वर आणि श्रीवर्धन. दिवेआगरला सुंदर समुद्रकिनारा आणि त्याचबरोबर रमणीय असे जीवनेश्वर मंदिर यासाठी प्रसिद्ध आहे. हरिहरेश्वरपासून ३६ किमी.वर असलेले सुंदर समुद्रकिनाऱ्याचे अजून एक निवांत गाव 'दिवेआगर'. तेराव्या शतकातील शिलाहार राजांच्या काळातील 'रूपनारायणाची'मूर्ती अतिशय सुरेख आहे.

श्रीवर्धनपासून हरिहरेश्वरची सफर ही अगदी सागरकिनाऱ्याला लागून असलेल्या रस्त्यावरून होते. समुद्राच्या लाटांच्या अखंड धडका बसून किनाऱ्यावरील खडकामध्ये छिद्रे पडली आणि त्यांचे स्वरूप हे मधमाश्यांच्या पोळ्यासारखे झाले आहे. नैसर्गिक सौंदर्य आणि आध्यात्मिक अनुभूतीचा सुरेख संगम म्हणजे 'दक्षिण काशी' या नावाने ओळखले जाणारे 'हरिहरेश्वर'. या गावाला समुद्रकिनाराही लाभला आहे.

श्रीवर्धन रोठा नावाने प्रसिद्ध असलेल्या सुपारीचे गाव अशी ओळख असलेले श्रीवर्धन. लाल कौलारू छपरे असलेली टुमदार कोकणी घरे आणि त्यांच्या परसामध्ये समुद्रकिनाऱ्याच्या दिशेला असलेल्या सुपारीच्या वाड्या यामुळे हे गाव पर्यटकांचे कायमच आवडीचे ठिकाण राहिले आहे..

**कसे जाल?**

जवळचा विमानतळ मुंबई आहे. कोकण रेल्वेवरील रोहा स्थानक हे जवळचे रेल्वे स्थानक आहे. मुंबईहून किंवा मुरुडपर्यंत राज्य परिवहनच्या बसेस उपलब्ध आहेत. गेट वे ऑफ इंडियापासून मांडवा बंदरापर्यंत फेरीबोट सेवा उपलब्ध आहे. अलिबागपर्यंत मोटारबोट आणि तिथून पुढे नियमित ये-जा करणारी बस उपलब्ध आहे.

## गुहागर

वासिष्ठी आणि जयगड खाड्यांमध्ये वसलेले गुहागर हे अत्यंत टुमदार असे छोटेसे गाव असून सुरूचे बन असलेला समुद्रकिनारा लाभलेला आहे. गुहागर हे आंबा, फणस, काजू, सुपारी आणि नारळ या फळांसाठी सुप्रसिद्ध आहे. मुंबईपासून अंतर २८० कि.मी.

**कसे जाल?**

जवळचा विमानतळ मुंबई, जवळचे रेल्वे स्थानक चिपळूण.

## दाभोळ

गुहागरच्या उत्तरेला वासिष्ठी नदीच्या दक्षिण तीरावर असलेले अंजनवेल गाव, याच्याच समोर खाडीच्या दुसऱ्या तीरावर वसले आहे ऐतिहासिक टुमदार गाव दाभोळ.

## वेळणेश्वर

गुहागरपासून जेमतेम १५ कि.मी. वर पर्यटकांची फारशी वर्दळ नसलेला, तरीसुद्धा पर्यटनासाठी आवश्यक असलेल्या सर्व सुखसोयी उपलब्ध असलेला, सागरकिनारा म्हणजेच वेळणेश्वर होय.

**कसे जाल?**

कोकण रेल्वे मार्गावरून धावणाऱ्या

## वेळास

रत्नागिरी जिल्ह्यात मंडणगड तालुक्यात वसलेले हे वेळास गाव तीन बाजूंनी डोंगरांनी वेढलेले दिसते. केवळ अंडी घालण्यासाठी मोठ्या संख्येने येणाऱ्या Olive Ridley या प्रकारच्या कासवांमुळे अमाप प्रसिद्धी मिळालेले कोकणातील हे छोटेसे गाव - वेळास. किनाऱ्यावर अंड्यातून बाहेर पडणारी कासवांची छोटी पिल्ले जेव्हा अरबी समुद्राची वाट धरतात तेव्हा ते दृश्य अत्यंत नेत्रसुखद असते. हा सोहळा पाहण्यासाठी जगभरातून लोक येथे हजेरी लावतात.



**कसे जाल?**

जवळचा विमानतळ मुंबई आहे. मुंबई-गोवा- महामार्गाने - राष्ट्रीय महामार्ग १७ ने गोरेगावला पोहोचून उजवीकडे वळले की वेळासकडे जाता येते. वेळासला जाण्यासाठी महाराष्ट्र राज्य परिवहनाच्या बसगाड्या उपलब्ध आहेत.



जवळजवळ सर्व गाड्या चिपळूण स्थानकावर थांबतात. चिपळूणपासून वेळणेश्वरचे अंतर ५० कि.मी. इतके आहे.

## किहीम

मुंबईजवळ असलेल्या आणि खूप मोठा समुद्रकिनारा लाभलेल्या किहीमला वर्षभर पर्यटकांची वर्दळ असते. अलिबागच्या खूप जवळ असलेले हे ठिकाण आहे.

### कसे जाल?

जवळचा विमानतळ मुंबई असून कोकण रेल्वेवरील रोहा आणि पेण ही दोन्ही स्थानके किहीमपासून जवळ आहेत. अलिबागमार्गे मुंबईहून राज्य परिवहनाच्या बस चोंढीपर्यंत जातात. तिथून पुढे रिक्षा उपलब्ध असतात. गेट वे ऑफ इंडिया पासून मांडवा बंदरापर्यंत कॅटामरान सेवा उपलब्ध असते.

## तारकर्ली

उबदार शुभ्र रेती, नितांतसुंदर किनारा आणि नितळ पाणी ही तारकर्लीची खरी ओळख. नोव्हेंबर ते मे-जून या कालावधीत स्नोर्केलिंगसारख्या सागरी खेळांची मजा येथे घेता येते. डॉल्फिन्स बघायला मिळतात.

शिवाजी महाराजांनी बांधलेला सिंधुदुर्ग हा बुलंद सागरी किल्ला. समुद्रामार्गे होडीने येथे जाता येते. विशेष म्हणजे शिवाजी महाराजांची मूर्ती असलेले एकमेव मंदिर या किल्ल्यावर आहे.

### कसे जाल?

जवळचा विमानतळ गोवा आहे. कुडाळ येथे जवळचा रेल्वे स्थानक आहे. येथे येण्यासाठी महाराष्ट्र राज्य परिवहनाच्या बसेस उपलब्ध आहेत.

## शिरोडा

सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या दक्षिणेला असलेला शिरोडा समुद्रकिनारा नयनरम्य आहे.

### कसे जाल?

जवळचा विमानतळ गोवा (दाबोलीम) येथे आहे. जवळचे रेल्वे स्थानक कोकण रेल्वेवरचे सावंतवाडी हे आहे. वेंगुर्ले आणि सावंतवाडीपासून शिरोड्याला जाण्यासाठी राज्य परिवहनच्या बस उपलब्ध आहेत.

## वेंगुर्ला

वेंगुर्ला म्हणजे सिंधुदुर्ग जिल्ह्याचा मेरुमणी आहे. वेंगुर्ल्याजवळ समुद्रात बंदरा किंवा Burnt rocks नावाचे काही खडक आहेत. ते खडक वेंगुर्ला रॉक्स नावाने प्रसिद्ध आहेत. या बेटांवर इडिबल नेस्ट स्विफलेट्स नावाच्या पाकोळ्या या पक्षांच्या वसाहती निर्माण झाल्या आहेत. वेंगुर्ला हे दशावतार या पारंपरिक लोककलेसाठी सुद्धा प्रसिद्ध आहे. स्वच्छ सूर्यप्रकाश, अथांग सागर, मऊशार वाळू या गोष्टींची मजा अनुभवायची असेल तर वायंगणी, मोचेमाड, कोंडुरावाडी, भोगावे, आरोंदे इथल्या रम्य सागरकिनाऱ्यावर जावे.सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दक्षिणेला असलेले ठिकाण म्हणजे वेंगुर्ला.

### कसे जाल?

जवळचा विमानतळ गोव्यामधील दाबोलीम हा आहे. कुडाळ आणि सावंतवाडी रोड ही दोन्ही रेल्वे स्थानके वेंगुर्ल्याहून ३० कि.मी. अंतरावर आहेत. राज्य परिवहनाच्या बस पुणे, मुंबई, कुडाळ आणि सावंतवाडीवरून उपलब्ध असतात.

## गणपतीपुळे

शांत, स्वच्छ आणि निर्मळ असा गणपतीपुळ्याचा समुद्र गणेशभक्तांना आणि पर्यटकांना नेहमीच भुरळ घालतो. चमचमणाऱ्या रुपेरी वाळूचा दूरपर्यंत पसरलेला स्वच्छ समुद्रकिनारा, निळ्याशार समुद्राची गाज, अस्सल कोकणी बाज जपणारं टुमदार गाव यामुळे पर्यटकांची पावले सुट्यांमध्ये आपोआपच गणपतीपुळ्याकडे वळतात. सुमारे ४०० वर्षे जुनं असलेलं हे गणेशाचं स्वयंभू स्थान आहे. येथे वेगवेगळ्या प्रकारचे साहसी जलक्रीडा प्रकार उपलब्ध करून देण्यात आले आहेत.रोइंग बोट, मोटरबोट, एरोबोट, पेडलबोट यांसारख्या अनेक प्रकारांचा समावेश त्यात आहे. पॅराग्लायडिंगचीही सोय उपलब्ध आहे.

### कसे जाल?

कोल्हापूर येथे सर्वात जवळचा विमानतळ आहे. कोकण रेल्वे मार्गावरील भोके (३५ कि.मी.) हे सर्वात जवळचे रेल्वे स्थानक आहे.




भाजे लेणी

**संपूर्ण भारतात सर्वांत जास्त गुंफा महाराष्ट्रात आहेत. उत्तुंग, भव्य अशा सह्याद्रीच्या पर्वतरांगांना बिलगून असणाऱ्या विविधरंगी, विविध आकारांच्या आणि प्रकारांच्या या गुंफा आहेत. डोंगरातून कोरून काढलेल्या प्राचीन गुंफांपासून ते विविध देवतांना आपल्या गर्भगृहांत मिरवणारा आणि कलात्मक कलाकृतींनी नटलेला हा कालातीत प्राचीन पुरातत्त्वीय वारसा महाराष्ट्राचे वैभव आहे.**

# कलात्मक वारसा

## भाजे-बेडसे-कार्ले लेणी (पुणे)

भारतातील शैलगृहांपैकी सर्वात जास्त आणि सुंदर लेणी महाराष्ट्रात आहेत आणि त्यातही भाजे, कार्ले आणि बेडसे या तीन बौद्ध लेणी आहेत.

### भाजे लेणी

पुण्याच्या वायव्येला मावळ तालुक्यात कोरलेल्या आहेत. हा एक २५ बौद्ध लेण्यांचा समूह आहे. यापैकी फक्त एक चैत्यगृह (ज्यामध्ये स्तूप असतो असे प्रार्थनास्थळ) असून बाकीचे सर्व विहार आहेत. महाराष्ट्रातील अगदी प्राचीन चैत्यगृहांपैकी हे एक आहे. या ठिकाणी पवित्र भिक्षूंच्या स्मरणासाठी दगडामधून १४ स्तूप कोरलेले आहेत. भाज्याला दोन थरात विहार कोरलेले दिसतात. येथे काही दुमजली विहारसुद्धा आहेत.

### बेडसे लेणी

पुण्याच्या वायव्येला मावळ तालुक्यामध्ये या लेणी आहेत. या लेण्यांच्या निर्मितीचा काळ हा इ.स.पूर्व पहिले शतक हा आहे. येथे दोन पूर्ण आणि

द ा ` न अपूर्ण अशा बौद्ध लेणी असून काही खडकात खोदलेली पाण्याची टाकी आणि एक स्मारक स्तूप अशा गोष्टी आहेत बेडसे इथला विहार त्याच्या चापाकृती विधान आणि गजपृष्ठाकृती छप्पर या रचनेमुळे अगदी निराळा आणि वैशिष्ट्यपूर्ण झाला आहे. बौद्ध लयन स्थापत्याच्या विकसनामधील एक महत्त्वाची पायरी म्हणून बेडसे लेण्यांकडे पाहिले जाते.

### कार्ला लेणी

कार्ला लेणीसुद्धा मावळ तालुक्यातच असून त्या पुणे-मुंबई महामार्गाजवळ आणि भाजे लेण्यांपासून फक्त ८ कि.मी. अंतरावर आहेत. या लेण्यांच्या निर्मितीचा काळ इ.स.चे पहिले ते पाचवे-सहावे शतक असा आहे. जरी येथे फक्त १५ बौद्ध लेणी असली तरीसुद्धा भारतातील बौद्ध लेण्यांमध्ये यांना अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. मुख्य चैत्यगृह हे भारतातील सर्वात मोठे चैत्यगृह असून ते स्थापत्य, मूर्तिकला आणि अभिलेख या सर्व दृष्टीने अत्यंत संपन्न आणि महत्त्वाचे आहे.

### कसे जाल?

जवळचा विमानतळ पुणे येथे आहे. मळवली हे रेल्वे स्थानक आहे. परंतु इथून १० किलोमीटरवर असलेले लोणावळा हे भाजे-बेडसे-कार्ले लेण्यांना जाण्यासाठी जास्त उपयुक्त रेल्वे स्थानक आहे. पुणे-मुंबई महामार्गावर पुण्यापासून ४० कि.मी. अंतरावर कार्ले आणि भाजे लेणी आहेत. पुणे मुंबई महामार्गावर कामशेत इथून फाटा आहे. तिथून ८ कि.मी. दक्षिणेला बेडसे लेणी आहेत.

### अजिंठा– वेरूळ लेणी (औरंगाबाद)

औरंगाबाद जवळच्या अजिंठा आणि वेरूळ येथील लेणी म्हणजे बौद्ध, जैन आणि हिंदू शैलीच्या वैभवशाली स्थापत्यकलेचा आविष्कार असून यांना युनेस्कोने जागतिक वारसास्थळांच्या यादीत स्थान दिले आहे. प्राचीन भारतीय कलेचा, विशेषतः चित्रकलेचा, उपलब्ध असणारा सर्वोत्कृष्ट नमुना म्हणजे अजिंठा येथील चित्रे व शिल्पे होत. या ठिकाणी असणाऱ्या कोरीव गुंफा दोन भागात विभागता येतात. पहिल्या विभागात इ.स.पू. दुसऱ्या शतकापासून इ.स. पहिल्या शतकापर्यंत कोरली गेलेली प्राचीन बौद्ध लेणी येतात तर दुसऱ्या विभागात इ.स. पाचव्या शतकातील महायान बौद्ध लेणी येतात.

अजिंठ्यापासून सुमारे १०० कि.मी. अंतरावर वेरूळ चरणाद्रीच्या उभ्या डोंगरावर कोरून काढलेल्या ३४ गुंफा आपल्याला एकाच ठिकाणी बौद्ध, हिंदू आणि जैन धार्मिक लेण्यांचे एकत्रित दर्शन घडवतात.

### कसे जाल?

जवळचा विमानतळ औरंगाबाद येथे आहे. जवळचे रेल्वे स्थानक ६० कि.मी. वरील जळगाव हे आहे. पुणे, मुंबई, औरंगाबादवरून राज्य परिवहनच्या बसेसची नियमित सेवा उपलब्ध आहे.

### कुडा (रायगड)

मुरुड-जंजिऱ्यापासून जवळच असणाऱ्या कुडा येथील लेणी वैशिष्ट्यपूर्ण स्थापत्यशैलीमुळे आकर्षित करतात. येथे समुद्रकिनाऱ्याजवळ असणाऱ्या एका


### मांगी तुंगी टेकड्या (नाशिक)


पश्चिम घाटाच्या मनोहर अशा सेलबरी डोंगररांगांमध्ये मांगी-तुंगीच्या जुळ्या टेकड्या आहेत. त्या टेकड्यांवर जैन गुंफा आहेत. सिद्धक्षेत्र या दुसऱ्या नावानेही ते ओळखले जाते.

मांगी टेकडीच्या दक्षिण बाजूला असलेल्या १५० मीटर उंचीवरील दोन जैन गुंफा येथे साधारणपणे ८० च्या आसपास प्रतिमा आहेत. मांगी शिखराच्या पायथ्याशी ५ गुंफा आणि साधारण १३५ प्रतिमा थेट दगडावर कोरलेल्या आहेत. तुंगी शिखराच्या पायथ्याशी पोहोचता, जिथे २ गुंफा आणि ८ थेट दगडावर कोरलेल्या प्रतिमा आहेत.

### कसे जाल?

तहाराबादपासून मांगी - तुंगीपर्यंत सतत बससेवा उपलब्ध आहे.





**कान्हेरी :** कान्हेरी गुंफा बोरीवली येथे संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात आहेत. कान्हेरीच्या गुंफांमध्ये बुद्धाची दक्षिण भारतातली सर्वात प्राचीन मूर्ती दिसते. येथील सर्वात मोठे आकर्षण म्हणजे ३ नंबरच्या गुंफेत असणारी २२-२३ फूट उंचीची बुद्धाची मूर्ती, ४१ नंबरच्या गुंफेतील अकरा डोक्यांच्या अवलोकितेश्वराची मूर्ती, आणि २, ४१ आणि ९० नंबरच्या गुंफांमधील बोधिसत्त्व अवलोकितेश्वराचा पट.

**मंडपेश्वर :** बोरिवलीच्या शैव गुंफा येतात. मंडपेश्वर म्हणून प्रसिद्ध असणाऱ्या ह्या गुंफा.

**जीवदानी :** जीवदानी लेणी विरार येथे आहेत. **मागाठणे :** मागाठणे लेणी ह्या बोरिवलीच्या कान्हेरी गुंफांच्या पश्चिमेला अवघ्या ६ किलोमीटरवर आहेत. **महाकाली :** महाकाली गुंफांना कोंडीवते गुंफा ह्या नावांनी ओळखले जाते. ह्या अंधेरीला आहेत. **जोगेश्वरी :** जोगेश्वरीच्या लेणी जोगेश्वरी (पूर्व) येथे महाकाली गुंफांच्या अगदी जवळ आहेत.

**कसे जाल?**

या लेण्या मुंबई परिसरात असल्याने येथे पोहोचण्यासाठी रेल्वे, बसेस उपलब्ध आहेत.

टेकडीमध्ये २६ कोरीव गुंफांचा समूह आहे. इ.स. तिसऱ्या शतकात निर्माण केलेल्या काही निवडक बौद्ध लेण्यांमध्ये कुड्याचा समावेश केला जातो. कुड्याच्या २६ गुंफांपैकी ४ चैत्यगृहे आहेत.

**कसे जाल?**

सर्वात जवळचा विमानतळ मुंबई, रेल्वे स्थानक रोहा. महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाच्या बस मुरुडपर्यंत दररोज जातात, जे कुड्यापासून सुमारे २४ कि.मी. अंतरावर आहे.

## एलिफंटा लेणी

मुंबईपासून केवळ १० कि.मी. अंतरावर या लेण्या असून हे जागतिक वारसा स्थळ आहे. हे घारापुरी द्वीप म्हणजे ताड, आंबा आणि चिंच यांची बने जणू निसर्गाने मुक्तहस्ताने दिलेली देणगी आणि दगडात कोरलेल्या प्राचीन गुंफा यांचा संगम आहे.

येथेच सहाव्या शतकाच्या मध्यात पाच शैव गुंफा कोरलेल्या आढळतात तोफांच्या टेकडीवरची मुख्य गुंफा ही कला व स्थापत्याचा उत्कृष्ट नमुना आहे. स्तूपाच्या टेकडीवर केवळ बौद्ध स्तूप आहे. हा स्तूप पूर्णपणे मातीने आच्छादलेला आहे. घारापुरी गुंफांच्या भिंतीवरील शिल्प संन्याशाच्या आयुष्याचे पाच टप्पे सूचित करतात.

**कसे जाल?**

गेट वे ऑफ इंडियापासून मोटारबोट उपलब्ध आहेत. ही नौकासेवा जून ते ऑगस्ट या ऋतूत बंद असते.

## पितळखोरे (औरंगाबाद)

पितळखोरे औरंगाबादपासून केवळ ८० कि.मी.वर वसलेले आहे. या परिसरातील गुंफा क्रमांक तीनमध्ये मुख्य चैत्य आहे. गुंफा क्रमांक चारमध्ये विहार, स्तंभ, छोटे खांब, जाळीदार खिडक्या आणि भिंतीवर इतर सजावट असा तपशीलवार कोरलेला आहे.

**कसे जाल?**

औरंगाबाद सर्वात जवळचा विमानतळ. औरंगाबादपासून राज्य परिवहन मंडळाच्या बस उपलब्ध.



**निसर्गाचे वरदान लाभलेल्या सह्याद्रीच्या उंचच उंच डोंगररांगांमधील पश्चिम घाटात अनेक दऱ्या, खोरी आणि घळ्या लपलेल्या आहेत. याच डोंगरांवर थंड हवेसाठी प्रसिद्ध अशी ठिकाणे आहेत.**

# दऱ्याखोऱ्यांतील सौंदर्य



पाचगणी (सातारा)

## महाबळेश्वर (सातारा)

महाराष्ट्राचे थंड हवेचे अत्यंत लोकप्रिय ठिकाण म्हणजे महाबळेश्वर. समुद्रसपाटीपासून ४७१० फूट उंच पठारावर वसलेल्या या महाबळेश्वरला सर्वबाजूंनी जणु हिरव्यागार टेकड्यांनी वेढा घातला आहे. महाबळेश्वरची सफर म्हणजे इथली विविध निसर्गरम्य स्थळे (पॉइंट्स) बघणे. वर्षाऋतुत लिंगमाळा आणि धोबी हे दोन्ही धबधबे डोंगरावरून कोसळत असतात. संध्याकाळच्या वेळी वेण्णा तलावाच्या शांत नितळ पाण्यातून होडीने फेरफटका मारणे, स्ट्रॉबेरीच्या हंगामात महाबळेश्वरात स्ट्रॉबेरी महोत्सवाचे आयोजन केले जाते.

## पाचगणी (सातारा)

महाबळेश्वरच्या सान्निध्यात सह्याद्रीच्या कुशीत विसावलेले, वर्षातील कोणत्याही महिन्यात आल्हाददायक हवा असलेले, प्रकृती स्वास्थ्यासाठी, हवा पालटासाठी सुप्रसिद्ध नितांतरम्य, थंड हवेचे ठिकाण म्हणजे पाचगणी. येथील टेबल टॉप, सिडने पॉइंट, पारशी पॉइंट आणि डेव्हिल्स किचन पॉइंट येथे आहेत.

### कसे जाल?

जवळचा विमानतळ पुणे आहे. जवळचे रेल्वे स्थानक सातारा येथे आहे, महाराष्ट्र राज्य परिवहनाच्या बसेसही उपलब्ध आहेत.

## म्हैसमाळ (औरंगाबाद)

म्हैसमाळ हे थंड हवेचे ठिकाण आहे. सह्याद्री पर्वतरांगांचा सर्वात पूर्वेकडचा भाग एका पठारावर आहे. मनोहर स्थळे, हिरव्यागार दऱ्या, प्रसन्न हवा, आजूबाजूचा वनाचा भाग अशा अमूर्त सौंदर्यामुळे म्हैसमाळ हे पर्यटकांचे महाराष्ट्रातील आवडते ठिकाण झाले आहे.

### कसे जाल?

औरंगाबाद हा जवळचा विमानतळ व रेल्वे स्थानक आहे. म्हैसमाळ हे औरंगाबादपासून अवघ्या ३७ कि.मी.वर आहे.

## भीमाशंकर (पुणे)

महाराष्ट्राच्या राज्यप्राण्याचे शेकरुचे माहेरघर भीमाशंकर! घनदाट वनश्रीने नटलेले, धबधब्यांनी सजलेले, छोट्या मोठ्या टेकड्यांनी राखलेल्या अभयारण्याचे भीमाशंकर !! बारा ज्योतिर्लिंगांपैकी सहावे स्थान असलेले सुप्रसिद्ध भीमाशंकर !

### कसे जाल ?

पुणे येथील विमानतळ आणि रेल्वे स्थानक जवळचे आहे. शिवाजीनगर बस स्थानकापासून ठरावीक वेळेच्या अंतराने बस उपलब्ध आहेत.

## लोणावळा – खंडाळा (पुणे)

उंच डोंगरमाथ्यावर वसलेली लोणावळा-खंडाळा ही जुळी थंड हवेची ठिकाणे, अत्यंत आल्हाददायक थंड हवामान आणि पावसाळ्यामध्ये पांघरणाऱ्या हिरव्यागार गालिच्यांसाठी सुप्रसिद्ध आहेत. पावसाळ्यात तयार होणारे येथील पाण्याचे काही प्रवाह शांतपणे डोंगरावरून खाली येतात तर काही धबधबे डोंगरावरून अक्षरश: कोसळत खाली येतात. निसर्गातील अनेक सुंदर ठिकाणे, दऱ्याखोऱ्यांचा विहंगम देखावा आणि दऱ्याखोऱ्यांमध्ये वसलेली लहानशी खेडी, गावे पाहायला मिळतात.

### कसे जाल ?

जवळचा विमानतळ पुणे, मुंबईपासून लोणावळा २.३० तासांवर आहे. राज्य परिवहन महामंडळाच्या आणि एशियाड बसेस लोणावळ्याला थांबतात.

## ताम्हिणी घाट (पुणे)

मुंबई गोवा महामार्गावर कोलाड आणि मुळशी धरणाच्या मधल्या भागात हा ताम्हिणी घाट आहे. पावसाळ्यातील निसर्ग सौंदर्य भरभरून अनुभवायचे असेल तर आवर्जून भेट द्यायला हवी ती ताम्हिणी घाटाला.

ताम्हिणी घाटात जाण्यासाठी थोड्या चढावरून पुढे गेले की, लांबच लांब पसरलेले हिरवेगार मखमली गालिचे, ओथंबून खाली आलेले काळे ढग, खळाळणारे निर्झर आणि मधूनच डोकावणारे धबधबे पाहताना डोळ्यांचे पारणे फिटते.

ताम्हिणी घाटातून मुळशी धरणाकडे जाणारा रस्ताच आपल्याला पळसे येथील मोठ्या धबधब्यापर्यंत घेऊन जातो. तिथूनच पुढे कोलाड येथे कुंडलिका नदीत साहसी खेळांची मजा लुटता येते. पांढऱ्या शुभ्र फेसाळणाऱ्या पाण्यामधील हे खेळ महाराष्ट्रात फक्त येथेच अनुभवता येतात.

### कसे जाल ?

सर्वात जवळचे रेल्वे स्थानक लोणावळा आणि कासारवाडी.

## पन्हाळा (कोल्हापूर)

महाराष्ट्राच्या इतिहासात अत्यंत महत्त्वाचे स्थान असणारा पन्हाळा, थंड हवेचे ठिकाण म्हणूनही लोकप्रिय आहे.

कोल्हापूरपासून २० कि.मी. वर असणारा हा दुर्ग अनेक राजकीय घडामोडी आणि युद्धांचा साक्षीदार आहे. किल्ल्याला वर्षभर कधीही भेट देऊ शकतो पण पावसामुळे खुलणारी दाट हिरवाई आणि दाट धुक्यामुळे निर्माण होणारे गूढ, रोमांचक वातावरण अनुभवण्यासाठी पावसाळ्यात नक्कीच भेट द्यायला हवी.

### कसे जाल ?

सर्वात जवळचा विमानतळ आणि जवळचे रेल्वे स्थानक कोल्हापूर. कोल्हापूरला जाण्यासाठी राज्यमार्ग परिवहन बसेसची सेवा उपलब्ध आहे.

## माळशेज घाट (पुणे)

माळशेज घाट म्हणजे निसर्गभटक्यांचे हक्काचे पावसाळी घरच होय. पावसाचे

## माथेरान (रायगड)

पायी अथवा घोड्यांवरून माथेरानला यावे लागते. समुद्रसपाटीपासून सुमारे ८०३ मी. उंचीवर डोंगराच्या माथ्यावर वसलेलं आणि हलके चढ-उतार असणारं माथेरान, सावली देणाऱ्या घनदाट वृक्षराजीने वेढलेलं आहे. छोट्या-छोट्या पायवाटांनी या जंगलात भटकत एका पॉइंटपासून दुसऱ्या पॉइंटकडे जात सभोवारच्या डोंगरदऱ्यांचे आणि शिखरांचे विहंगम दर्शन होते.



### कसे जाल ?

सर्वात जवळचा विमानतळ ११० कि.मी. वर मुंबई येथे आहे. नेरळ पासून माथेरान ८ कि.मी.वर असून नेरळहून भाड्याने टॅक्सी उपलब्ध आहेत.

**मिनीट्रेन :** नेरळपासून सुमारे दोन तासांच्या प्रवासाने २१ कि.मी. अंतरावरील माथेरान येथे मिनीट्रेनने पोहोचता येते. परंतु पावसाळ्यात ही सेवा बंद असल्याने जाण्यापूर्वी खात्री करून घ्यावी.

पाणी अंगावर घेऊन तरारून फुललेली इथली झाडे आणि त्या हिरव्यागार गालिच्याच्या सभोवार उभे असलेले सह्याद्रीचे राकट कडे असे डोळे तृप्त करणारे निसर्गसौंदर्य क्वचितच दुसरीकडे बघायला मिळते.

मुसळधार कोसळणारा पाऊस, पहाटेच्या वेळी संपूर्ण परिसरावर पसरलेली धुक्याची दुलई, हवेतील किंचित बोचरा गारवा आणि नजर पोहोचते तिथपर्यंत पसरलेला हिरवागार गालिचा ही इथल्या परिसराची काही ठळक वैशिष्ट्ये.

**कसे जाल?**

जवळचा विमानतळ मुंबई, रेल्वे स्थानक कल्याण.

## नाणे घाट

सह्यगिरीच्या दोन अजस्र कड्यांच्या मधून सुरेख असा नाणे घाट रस्ता जातो. घाटाच्या दोन्ही बाजूंना डोंगरात अनेक लहान-मोठी प्राचीन लेणी आहेत. इथून उत्तरेकडे पाहिल्यास कळसुबाईच्या उत्तुंग शिखराचे दर्शन घडते आणि दक्षिणेला भीमाशंकरचे दृश्य दिसते.

## तोरणमाळ (नंदुरबार)

सातपुड्याच्या तिसऱ्या आणि चौथ्या रांगेत, समुद्र सपाटीपासून ११५० मीटर (३७७० फूट) उंचीवर तोरणमाळ पसरलेला आहे. दोन डोंगरांच्या दरम्यान त्याचा आकार जणू काही एखाद्या बशीसारखा भासतो. तोरणमाळचे मुख्य आकर्षण म्हणजे येथील यशवंत तलाव. आरस्पानी सौंदर्य लाभलेल्या या तलावाच्या काठी अत्यंत शांत आणि आल्हाददायक वातावरणात आपण रमून जातो. कमाल तलावात फुललेले असंख्य कमळ पर्यटकांच्या डोळ्याचे पारणे फेडतात. तोरणमाळच्या परिसरात एका दरीत डोंगरावरून कोसळणारा सीताखाई धबधबा येथील सुंदरतेत अधिक बहार आणतो.

**कसे जाल?**

जवळचे रेल्वे स्थानक नंदुरबार आणि दोंडाई.

## भंडारदरा (अहमदनगर)

अहमदनगर जिल्ह्यात अकोले तालुक्यात असलेले, हिरव्यागर्द उंचच उंच टेकड्यांच्या पार्श्वभूमीवरचे काठोकाठ भरलेले भंडारदरा धरण. निळेभोर आकाश, वाऱ्यावर डोलणारे भात आणि भोवतीचे गच्च हिरवे वातावरण यात स्वत:ला हरवून घ्यावे असे वातावरण.

**कसे जाल?**

जवळचा विमानतळ पुणे आणि मुंबई, रेल्वे स्थानक इगतपुरी.

## आंबोली (सिंधुदुर्ग)

निसर्गरम्य आंबोलीला खरोखरच महाराष्ट्रातील थंड हवेच्या ठिकाणची राणी असं म्हटलं तर ते वावगं ठरणार नाही. जगप्रसिद्ध जैववैविध्य असलेले ठिकाण अशी त्याची आता ख्याती झालेली आहे. समुद्रसपाटीपासून ६९० मीटर उंचावर असलेले, शांत आणि निसर्गरम्य, वर्षातल्या कोणत्याही ऋतूमध्ये भेट द्यावे असे ठिकाण आहे. उंचावरून पडणारे धबधबे आंबोलीच्या सौंदर्यात अजूनच भर घालत असतात. वर्षाऋतूमध्ये होणारा ७५० सेंटीमीटर इतका प्रचंड पाऊस ऐन पावसाळ्यामध्ये आंबोलीला भेट देण्यासारखी दुसरी मजा नाही. रानडुकरे, बिबटे, चितळ, सांबर, भेकर, अस्वल, माकडं, मैना, बुलबुल, धनेश, धोबी, चांदोल, राघू यांचेही दर्शन सहज होते.

**कसे जाल?**


जवळचा विमानतळ दाबोलीम, गोवा तर रेल्वे स्थानक कोकण रेल्वेवरील सावंतवाडी रोड हे आहे.

## चिखलदरा (अमरावती)

समुद्रसपाटीपासून १,०८८ मी. वर असणारे विदर्भातील थंड हवेचे एकमेव ठिकाण आहे. उंचीवर असणाऱ्या चिखलदरा ह्या ठिकाणी भरपूर फुले, झाडे ,तिन्ही बाजूंनी असणाऱ्या मेळघाटातील व्याघ्रप्रकल्पामुळे सौंदर्यात खरी भर पडते. पंचबोळ पॉइंट, हरिकेण पॉइंट, मोझारी पॉइंट, देवी पॉइंट, सनसेट पॉइंट, प्रोस्पेक्ट पॉइंट, मंकी पॉइंट. सनसेट पॉइंटवरून दिसणारा वनाचा हिरवागार देखावा आवर्जून पाहण्यासारखा आहे.

**कसे जाल?**

सर्वात जवळचा विमानतळ नागपूर, रेल्वे स्थानक अमरावती.



गाविलगड, चिखलदरा



छायाचित्र : ऋता कळमणकर

**वन केवळ बघायचे नसते तर ते 'वाचायचे'सुद्धा असते. ज्याला हे शक्य होते, तोच वन पर्यटनाचा खरा आनंद घेऊ शकतो.**

# अरण्य वाचन

**प्र.सु.हिरुरकर**

जंगल म्हणजे काही एकटा 'वाघ' नाही. जंगल म्हणजे असंख्य सजीवांचे अस्तित्व असलेला एक जिवंत जिताजागता देह आहे. वाघ हा निसर्गातील अन्नसाखळीत सर्वोच्च ठिकाणी आहे. वाघामुळे अरण्यातील प्राण्यांचे संतुलन साधले जाते. वाघामुळे जंगल सुरक्षित राहते. याच जंगलाचे संरक्षण आणि संवर्धन झाले म्हणजे सजीवसृष्टीला जगण्यासाठी सर्वात आवश्यक असणारा प्राणवायू, पाणी, जैविकविविधता यांची वाढ होत राहते. कारण वाघ हा समृद्ध पर्यावरणाचे प्रतीक मानला जातो. अभयारण्य म्हणजे 'जीन बँका' आहेत, ते काही उगीच नाही.

## सृष्टिचक्र

जंगलामध्ये वाघाबरोबर राहतात असंख्य वन्यजीव, पक्षी आणि सूक्ष्म जीवसृष्टी. त्यांच्या कित्येक पिढ्या या जंगलात आपले जीवन जगत असतात. आपला वंश वाढवत असतात. या सर्व सजीवसृष्टीचे निरीक्षण आणि अभ्यास केला तर अनेक रहस्य उलगडत जातात. जसे कोळी (स्पायडर). दोन झुडपांच्या किंवा दोन फांद्यांच्या मदतीने मादी कोळी मुखावाटे विशिष्ट द्रव पदार्थ सोडून आपलं जाळं (घरटं) कसं तयार करते? घरटे तयार झाल्यावर नरासोबत मिलन होते. काही प्रजातीत त्यानंतर त्याच समागम करणाऱ्या नराला मादी खाऊन टाकते. पोटातील तयार होणारे अंडे आणि त्यातील जीव सुदृढ व्हावेत म्हणून!

## वारूळ

जंगल सफारीमध्ये रानवाटांवर वाळवीची मोठमोठी वारुळं दिसतात. शेकडो वर्षांपासून वाढणारी ही वारुळं दहा-बारा फूट उंचीचे असतात. याची रचना म्हणजे निसर्गाची अद्‌भुत किमया आहे. या वारुळात अनेक कप्पे तयार केलेले असतात. अन्नधान्याचे कोठार, मादीचे स्वतंत्र कोठार येथेच मादी अंडे देते. कामकरी वाळवी जे घरट्याची डागडुजी करतात, अन्नसाठा आणून ठेवतात. सुरक्षा रक्षक हे संकटकाळी सुरक्षा सांभाळतात. या वारुळाची बांधणी, सूर्यप्रकाश, हवा, पाणी आणि आतील उष्णतामान याचा समतोल कसा राहील, या दृष्टीने केलेली असते.

जंगल पर्यटनामध्ये सर्वात अगोदर सहजासहजी दृष्टीस पडतात ते पक्षी. पक्षांना निसर्गाने बहाल केलेले अनोखे रंगरूप, आवाज, त्यांची जीवनपद्धती इ. थक्क करून सोडणारे असते. जंगातील पशुपक्षी, वृक्षलता इ. च्या निरीक्षणाने राग, लोभ, द्वेष हे दुर्गुण मरून जातात आणि नि:स्वार्थपणा, निर्मळता, प्रेम, अध्यात्म इ. सज्ञनांसारखे गुण अंगी येतात.

## पर्यावरणवादी संत तुकाराम

वृक्षलता, पशुपक्ष्यांशी सोयरिक जोडणारे संतकवी तुकाराम महाराज हे खरे पर्यावरणवादी होते. जेव्हा ते एकांतवासात देहूच्या डोंगरावर जात असत तेव्हा ते त्या डोंगरावरील वनराई, पशुपक्ष्यांशी तादात्म्य पावत. वृक्षराजी, पशुपक्षी हे त्यांना बंधू, सखा, भगिनी, मातापिता वाटत असत. मनातील सुख-दु:ख त्यांच्याजवळ व्यक्त करत आणि मग निसर्गाच्या सहवासात त्यांना एकांतवासात जे परमसुख मिळे ते त्यांना मोक्षाचा आनंद देत असे.

सुप्रसिद्ध साहित्यिक श्रीमती दुर्गा भागवत म्हणतात - निसर्ग आहे तसाच आहे. परंतु आता आमचे मानवी जीवन शहरी झाले आहे. जीवनाचे उद्दिष्टही बदलू पाहते आहे. तरी पण एवढे खरे की, कुठे गवताचे पाते हलू दे, ते आमच्या डोळ्यांना रिझवते. वाऱ्याची झुळूक अपूर्व स्पर्शसुख देते. पावसाच्या सरी अजूनही कानात काळाचे अनादी गूढ कवन ओततात. वारे घो घो वाहताना झिजलेल्या काळ्या पहाडांच्या भीषण कहाण्या सांगतात. धो-धो वाहणाऱ्या नद्या दरवर्षी गाळाने सुपीक होणाऱ्या शेतांच्या कहाण्यांबरोबर आपल्या काठांवर फोफावलेल्या व विनाश पावलेल्या मानवी संस्कृतीची गूढ कथाही सांगत असतात.

**विभागीय माहिती कार्यालय,अमरावती.**


भंडारदरा धरण

**महाराष्ट्र हा विविधसरोवरे आणि धबधब्यांनी समृद्ध आहे. विशेषत: पावसाळ्यात वाहणारे असंख्य धबधबे आणि काठोकाठ भरणारी धरणे पर्यटनासाठी नेहमीच आकर्षणे ठरली आहेत. पावसाळ्यात कोसळणाऱ्या पाण्याखाली मनमुराद भिजण्यासाठी असंख्य धबधबे आपल्याला साद घालत असतात. महाराष्ट्रातील २३ सरोवरांमध्ये नौकाविहाराची सोय उपलब्ध आहे.**

# अनुभवा जलाशयांचा गारवा...

## भंडारदरा धरण

अहमदनगर जिल्ह्याच्या अकोले तालुक्यात भंडारदरा धरण आहे. भंडारदरा धरणाचे मूळ नाव विल्सन डॅम असून त्याच्या जलाशयास आर्थर लेक असे म्हटले जाते. हे प्रवरा नदीवर ब्रिटिशांच्या काळात बांधलेले धरण आहे. विल्सन डॅमवरच एक मोठा गोलाकार धबधबा असून त्याच्या छत्रीसारख्या वैशिष्ट्यपूर्ण आकारामुळे त्याला 'अम्ब्रेला फॉल' असे म्हणतात. रंधा या गावात एक विशाल धबधबा असून तो गावाच्या नावावरूनच रंधा फॉल म्हणून प्रसिद्ध आहे. सध्या हा धबधबा त्यावर असलेल्या जलविद्युत प्रकल्पामुळे फक्त पावसाळ्यातच पाहायला मिळतो. पावसाळ्यात हा धबधबा अतिशय रौद्र रूप धारण करतो. भंडारदऱ्याहून बोटिंगचा आनंद घेत रतनवाडी येथे जाता येते. रतनवाडी परीसरात अनेक धबधबे असून गळ्यातील हारासारखा दिसणारा 'नेकलेस फॉल' हा विशेष लोकप्रिय आहे . भंडारदरा धरणाच्या कडेकडेने घाटघरपर्यंत करावयाचा प्रवास अतिशय आनंददायी आहे. येथे अनेक धबधबे असून पावसाळ्यात हा संपूर्ण परिसर धुक्यात हरवलेला असतो.

## कोयना धरण (शिवसागर)

हे धरण सातारा जिल्ह्यात येते. 'कोयना धरण' महाराष्ट्रातील सगळ्यात मोठे धरण म्हणून प्रसिद्ध आहे या धरणाच्या पाण्याने विस्तीर्ण असा शिवसागर जलाशय निर्माण झाला आहे. शिवसागर जलाशयाच्या पाणलोट क्षेत्राला कोयना वन्यजीव अभयारण्य म्हणून ओळखले जाते. येथे अस्वल, बिबट्या, चितळ, शेकरू, हरीण एवढेच नाही, तर वाघदेखील आढळतात. जलाशयाच्या दक्षिणेकडे असलेल्या चांदोली वन्यजीव अभयारण्याला व कोयना वन्यजीव अभयारण्याला मे २००७ मध्ये राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाने व्याघ्र प्रकल्पाचा एक भाग म्हणून घोषित केले.

शिवसागर जलाशय न्याहाळण्यासाठी येथे बोट हा उत्तम पर्याय आहे. घनदाट झाडी असलेल्या पर्वतांनी वेढलेल्या विस्तीर्ण पाण्यात बोटीने फिरण्याचा आनंद घेता येतो. येथे काही वन्य प्राणी देखील

दिसू शकतात. बोटीची फेरी कोयना धरणाजवळील नेहरू पार्क या उद्यानापासून चालू होते. या उद्यानापासून धरण व जलाशयाचे विहंगम दृश्य दिसते. कोयना परिसरात आणखी काही पाहण्याची इच्छा असल्यास नवजा व ओझार्डे येथील धबधबे जवळच आहेत. या परिसरातून जाताना एका बाजूला जलाशयाची सोबत असते तर दुसऱ्या बाजूला पर्वत, जंगल, धबधबे आपल्या सोबतीला असतात. पुढील काही परिसरात अभयारण्यातील विशेष सुरक्षित भाग म्हणून प्रवेश निषिद्ध आहे.

## चांदोली धरण (वसंतसागर)

हे धरण सांगली जिल्ह्यातील शिराळा तालुक्यामध्ये येते. हे धरण सांगली, कोल्हापूर आणि रत्नागिरी जिल्ह्याच्या सीमेवर आहे. या धरणाच्या जलाशयास वसंतसागर म्हणून ओळखले जाते. या जलाशयासोबतच येथे चांदोली राष्ट्रीय अभयारण्य आणि सह्याद्री व्याघ्र प्रकल्पही पाहता येते. तसेच विद्युत निर्मिती प्रकल्पास भेट देता येते.



## आंबोली धबधबा (सिंधुदुर्ग)

निसर्गरम्य अंबोलीला खरोखरच महाराष्ट्रातील थंड हवेच्या ठिकाणची राणी असं म्हटलं तर ते वावगं ठरणार नाही. जगप्रसिद्ध जैववैविध्य असलेले ठिकाण अशी त्याची आता ख्याती झालेली आहे. समुद्रसपाटीपासून ६९० मीटर उंचावर असलेले अंबोली हे खरंच सुंदर आणि रमणीय ठिकाण आहे. सगळा परिसर हा अगदी घनदाट अरण्याचा आहे आणि तिथे आपल्याला बरेच धबधबे पाहायला मिळतात. ऐन पावसाळ्यामध्ये अंबोलीला भेट देण्यासारखी दुसरी मजा नाही. नागरतास धबधबा, हिरण्यकेशी, सी व्ह्यू पॉईंट, महादेवगड ही ठिकाणे पर्यटकांनी कायमच गजबजलेली असतात. हिरण्यकेशी नदीचा उगम हा खूप निसर्गसंपन्न आहे.

## भुशी धरण

भुशी धरण हे विशेषकरून पावसाळ्यातील लोणावळ्याला येणाऱ्या पर्यटकांचे अत्यंत लोकप्रिय स्थळ आहे. कारण पावसाळ्यामध्ये हा बंधारा दुथडी भरून वाहू लागतो. त्या स्थानाच्या सौंदर्यामध्ये भर घालतो. वळवण धरण ज्याच्या पायथ्याशी मोठे उद्यान आहे हे सुद्धा पर्यटकांचे एक आवडीचे ठिकाण आहे. टायगर्स लीपच्या जवळच पावसाळ्यात वाहू लागणारा एक छोटा धबधबा आहे.

## राधानगरी (दाजीपूर) धरण

कोल्हापूर जिल्ह्यातील राधानगरी हे धरण आहे. बारमाही आणि पावसाळ्यात वाहणारे पाण्याचे असंख्य प्रवाह येथे जागोजागी वाहत असतात. ते वाहत वाहत पाणलोट क्षेत्राकडे जातात. त्यांच्यामुळेच येथे भोगावती नदीवरचे राधानगरी व दूधगंगा नदीवरचे काळम्मावाडी अशी दोन धरणे आहेत. पाण्याचे हे दोन साठे आणि त्यांच्या बाजूचा वनाचा परिसर यांनी प्राणी, पक्षी, कीटक आणि सरपटणारे प्राणी या सर्वांना ह्या अभयारण्यात आपली वसतिस्थाने मिळवून दिली आहेत.

## माळशेज धबधबा (पुणे)

पुण्याच्या वायव्येला १५४ कि.मी. अंतरावर असलेला हा माळशेज घाट मुंबईपासून १६४ कि.मी. आणि ठाणे जिल्ह्यातील कल्याणपासून ८५ कि.मी. अंतरावर आहे. पावसाळ्यात मुसळधार कोसळणारे धबधबे तन-मन ओलेचिंब करते.

## धामापूर (सिंधुदुर्ग)

सिंधुदुर्ग जिल्ह्यात वसलेले एक छोटेसे गाव धामापूर म्हणजे एक मोठा नैसर्गिक तलाव आहे. जो त्याच्या स्फटिकासारख्या स्वच्छ पाण्यासाठी प्रसिद्ध आहे. हा तलाव साधारणतः १२५ एकरमध्ये पसरलेला आहे. कोकणातील सर्वात मोठ्या नैसर्गिक तलावांपैकी हा एक आहे. तलावात नौका विहारदेखील सुरू केले आहे.



**मनसोक्त संचार करणाऱ्या मगरी पाहायच्या आहेत? केरळच्या बॅकवॉटरचा आनंद कोकणात मिळवायचा आहे? रम्य खाडी, संथ पाणी, किनाऱ्यावरची किनारवर्ती गावे, त्याला बिलगलेले डोंगर, मध्येच पसरलेली छोटी-छोटी बेटे, त्यांचे पाण्यात पडलेले प्रतिबिंब, विविध प्रकारच्या पक्ष्यांचा किलबिलाट आणि तितकीच रम्य प्राचीनता अनुभवायची असेल तर चिपळूणमध्ये 'वाशिष्ठी बॅकवॉटर' हा सर्वोत्तम पर्याय उपलब्ध आहे.**

# वाशिष्ठीतील जलसफर

**धीरज वाटेकर**

वाशिष्ठी खाडीला निसर्गानं मुक्तहस्तानं सौंदर्य दिलं आहे. इतकी वर्षं हे सौंदर्य लोकांपुढे आलं नव्हतं. 'ग्लोबल चिपळूण पर्यटन' या चिपळूण पर्यटन विकासासाठी झटणाऱ्या संस्थेच्या सततच्या प्रयत्नाने आता येथे पर्यटकांची लगबग सुरू झाली आहे.

आपल्या देशात फक्त चेन्नईत क्रोकोडाईल पार्क आहे. महाराष्ट्रात काही ठिकाणी मगरी पाहता येतात. 'क्रोकोडाईल सफारी'चा वैविध्यपूर्ण अनुभव देणारा वाशिष्ठी बॅकवॉटर हा महाराष्ट्रातील एकमेव उपक्रम आहे. 'मगर' चिपळूणच्या पर्यटन विकासाचे मुख्य आकर्षण ठरू पाहत आहे,

मगरी ओहोटी दरम्यान वाशिष्ठी खाडीच्या किनाऱ्यावर पहुडलेल्या सहज नजरेस पडतात. अगदी ८-१० फुटाच्या अंतरावरून त्या पाहण्याचा आनंदही घेता येतो. विशेष म्हणजे त्यांना खाडीतील नैसर्गिक वातावरणात पाहता येते. सध्या इथल्या मगरी या चिपळूण पर्यटन व्यवसायाला आकार देण्याचे काम करत आहेत.

ओहोटीच्या वेळी खाडी किनाऱ्यावर शरीराचे तापमान नियंत्रित करण्याकरिता 'बास्किंग' करीत निवांत पहुडलेल्या, मॅनग्रोव्हमध्ये लपलेल्या, कातळावर बसलेल्या, चिखलात विसावलेल्या मगरी बोटीतून बघायला धमाल मज्जा येते. या बोट प्रवासात सुमारे आठ ते दहा फुट लांबीच्या मगरी पाहायला मिळतात. ओहोटीला जास्त संख्येने मगरी पाहायला मिळतात. या खाडी पट्ट्यात आजवर पक्ष्यांच्या ७० ते ८० जाती नोंदवल्या गेल्या आहेत.

उन्हाळी पर्यटन हंगामात सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत पर्यटन उपक्रम आयोजित केला जातो. चिपळूणसह रत्नागिरी जिल्ह्यातील हिरवेगार निसर्गवैभव, इथल्या रमणीय खाड्या-सागरकिनारे, गड-किल्ले, प्राचीन मंदिरे यांसह चिपळूण परिसरातील वाशिष्ठी खाडी, तिच्यातील छोटी-मोठी बेटे, सह्याद्रीच्या पर्वत रांगा, कोकणी खाद्यपदार्थ आणि येथील समृद्ध लोकजीवनाचा अनुभव पर्यटकांना मिळतो आहे.

### वैविध्यपूर्णता

खाडीत साधारणत: पाण्याच्या ठिकाणी आढळणारे पक्षी दिसतात, त्याचबरोबर वूली नेक्ड स्टॉर्क, ओरिएंटल हनी बझार्ड, पफ थ्रोटेड बॅब्लर, लिटिल रिंग प्लोव्हर, युरेशियन कॉलर्ड डव्ह, प्लेन प्रिनिया,

अॅशी प्रिनिया, लिटिल स्टिंट, मार्शलज आयोरा, कॉमन आयोरा, पाइड अॅव्होसेट, सिट्रिन वॅगटेल, युरेशियन स्पूनडिल, ब्लॅक हेडेड आयबीस, कॉमन रेडशॅक, चेंजेबल हॉक इगल, ब्राम्हिणी काईट, मोर, टेंटेड स्टॉर्क, जांभळी पाणकोंबडी, आयबीस, डार्टर, आल्बिनो किंगफिशर, हेरॉन आदी दुर्मीळ पक्ष्यांचे दर्शन येथे होते.

## वाशिष्ठी नदीचे खोरे

'क्रोकोडाईल सफारी'साठी सुशोभित आणि अद्ययावत बोटींची व्यवस्था आहे. वाशिष्ठी ही कोकणातली एक महत्त्वाची नदी आहे. तिची एकूण लांबी सुमारे ७० किलोमीटर आहे. ती पूर्णपणे रत्नागिरी जिल्ह्यातूनच वाहते. सह्याद्रीतल्या रत्नागिरी-सातारा जिल्हा सीमा जोडणाऱ्या कुंभार्ली घाटात, घाटमाथ्यावरील झोका दगडाला लागून असलेल्या खोल दरीत तिचा उगम आहे. वाशिष्ठी नदी चिपळूण, खेड, गुंफागर, दापोली तालुक्यांच्या सीमांतून वाहत दाभोळजवळ अरबी समुद्राला मिळते. खेडकडून येणारी जगबुडी ही वाशिष्ठीची प्रमुख उपनदी आहे. या वाशिष्ठीला नारिंगी, तांबी, धावती नदी, वैतरणा आणि शिवनदी येऊन मिळतात. कोयना अवजलमुळे वाशिष्ठी सदा भरलेली, वाहणारी असते. या वाशिष्ठीचे खोरे २२०० चौरस किलोमीटरचे आहे. अचाट वैविध्याची रेलचेल असलेल्या या खोऱ्यात वेगवेगळ्या प्रकारच्या विहिरी, बाव, तळी, पाणी वापराच्या इतर पारंपरिक पद्धती, झरे, धबधबे, छोटे ओहोळ, खारफुटीची जंगले, ससे, साळींदर, बिबटे, कोल्हे, रानगवे, अन्य प्राणिसंपदा असून ही सगळी वाशिष्ठीची जिवंत रूपे आहेत. फार पूर्वी शिवनदी हीच चिपळूणची जीवनवाहिनी होती. चिपळूण शहरातून वाहणाऱ्या शिवनदीचा उगम कामथे-कापसाळ परिसरात, डोंगरात होतो. शिवनदी शहराच्या मध्यभागातून वाहते. तिच्या प्रवाहामुळे शहराचे पूर्व आणि पश्चिम असे दोन भाग नैसर्गिकरीत्या निर्माण झाले आहेत. तिची शहरातली लांबी सुमारे दीड किलोमीटर आहे. या नदीवर कामथे आणि फणसवाडी असे दोन बंधारे आहेत. शिवनदीपात्रातून चिपळूणमधील पागमळ्यापर्यंत पूर्वी लहान होड्यांचा प्रवास चाले. मालवाहू-प्रवासी गलबते गोवळकोट बंदरातून, वाशिष्ठी नदीमार्गे बाजारपूल, बंदरनाका परिसरात येत. तिथे गलबतातील माल हा लहान नावात घालून शिवनदी पात्रातून पागमळा परिसरात चढ-उतारासाठी येत असे.



## गोपाळगड आणि गोवळकोट

अंजनवेलचा गोपाळगड किल्ला याच वाशिष्ठीच्या दाभोळ खाडीमुखावर वसलेला आहे. मराठी अमदानीत हे जिल्ह्याचे ठिकाण होते. किल्ला तीन बाजूंनी समुद्रवेष्टित व चवथ्या बाजूस खंदक आहे. भोवतालचा तट जाड दगड व चुन्याचा २० फूट उंच, ८ फूट रुंद व चांगला भक्कम आहे. खंदक १८ फूट रुंद व बराच खोल आहे. किल्ल्याला दोन दरवाजे (एक पूर्वेस व एक पश्चिमेस) आहेत. अंजनवेलचा गोपाळगड आणि गोवळकोटचा गोविंदगड हे दोन वाशिष्ठीचे पहारेकरी आहेत. गोविंदगड किल्ला जंजिऱ्याच्या हबशांनी बांधला. तो शिवाजी महाराजांनी १६७० साली जिंकून घेतला. एका छोट्या बेटावर वसलेल्या किल्ल्याचा परिसर २ एकर आहे. ह्या किल्ल्यात रेडजाई देवीचे मंदिर आहे. किल्ल्यावर पुरातन काळातील तोफा व पाण्याचा मोठा हौद असून ६ तोफांचे हल्लीच एकत्रित जतन केलेले पाहायला मिळते.

## पन्हाळेकाझी

दापोली तालुक्यातील पन्हाळेकाझी हे गाव कोरलेल्या लेण्यांसाठी प्रसिद्ध आहे. गावातील कोटजाई ही नदी पुढे वाशिष्ठी खाडीला जाऊन मिळते. या नदीच्या काठावर मोठा लेणी समूह आहे. इथल्या गुंफा ऐतिहासक आहेत.

चिपळूण तालुक्यातील गोंधळे येथील तांबी नदीच्या किनारी असलेले पेशवेकालीन हरिहरेश्वर मंदिर, परिसरातील इंग्रजी 'एल' आकाराची प्राचीन विहीर (घोडेबाव), शेकडो वर्षांपूर्वीचे वडाचे झाड पाहण्यासारखे आहे.

## कसे जाल?

जवळचे रेल्वे स्थानक : चिपळूण, विमानतळ : कोल्हापूर, पुणे, मुंबई, गोवा

बस : पुणे, मुंबई, गोवा येथून बसने जाता येते. कोल्हापूर, सोलापूरहून थेट बसेस उपलब्ध. पनवेल-पणजी या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वरील महत्त्वाचे ठिकाण आहे.

**पर्यटन अभ्यासक व मुक्त पत्रकार**
**संपर्क : ०९८६०३६०९४८**



# वाघोबांच्या साम्राज्यात...

**उन्हाळी पर्यटन म्हटले की, प्रत्येकाच्या डोळ्यापुढे काश्मीर, शिमला, कुलू-मनाली, तिबेट, लडाख वगैरे परिसर सहजच येतात. गर्भश्रीमंत असतील तर त्यांना युरोपियन देश खुणावतात. पण आता पर्यटनाचाही ट्रेंड बदलत चालला आहे. पर्यटनाच्या मुख्य धारेतला वनपर्यटन हा प्रवाह दिवसेंदिवस गतिमान होत आहे. या गतिमान प्रवाहाला व्याघ्रपर्यटनाची नवी सोनेरी झळाळती किनार मिळाली आहे. त्यामुळे आता उन्हाळ्यात पर्यटनासाठी निघणारी पावले, थंड हवेची ठिकाणे किंवा विदेश सोडून महाराष्ट्रातील व्याघ्र प्रकल्पांकडे वळत आहेत.**

**मिलिंद मधुकरराव उमरे**

विदर्भ आणि वाघ हे घट्ट समीकरण झालं आहे. हा लेख प्रकाशित होईल, तेव्हा चंद्रपूरच्या तापमानाचा पारा ४५ अंश सेल्सिअस पार गेलेला असेल. पण सूर्य असा आग ओकत असताना याच चंद्रपूर जिल्ह्यातील ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प देशविदेशी पर्यटकांनी ओसंडून वाहत असेल. हे चित्र केवळ येथेच दिसणार नाही तर महाराष्ट्रातील सारेच व्याघ्र प्रकल्प आणि राष्ट्रीय उद्याने,


छायाचित्र : ऋता कळमणकर

अभयारण्ये व जंगलांमध्ये दिसेल. आपल्या राज्यात तब्बल ५७ अभयारण्ये आणि ताडोबा-अंधारी, पेंच, मेळघाट, सह्याद्री, नवेगाव-नागझिरा, बोर असे सहा व्याघ्र प्रकल्प आहेत. महाराष्ट्रभूमीत सदाहरित, निम सदाहरित, उष्ण कटिबंधीय पानगळीची, शुष्क पानगळीची, खारफुटीची अशी अनेक प्रकारची वने आहे. पण त्यातही बहुतांश जंगल शुष्क पानगळीचं आहे. या रानाचं वैशिष्ट्य असं की, फेब्रुवारी महिना लागला की या रानातील वृक्षांचा पर्णसंभार गळून पडतो. जमिनीतील पाण्याची पातळी खाली गेल्याने वृक्षांना काटकसर करावी लागते. मग ते पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी पानं गाळतात. पानगळ झाल्यामुळे रान मोकळे होते. एरवी जंगलातील गर्द झाडांमुळे दहा फुटांवर बघणेही कठीण होते. पण पानगळ झाल्यावर नजर दूरपर्यंत जाते. दुसरी एक बाब म्हणजे तीव्र उष्णतेने रानातील पाणवठे, ओढे, तलाव असे जलस्रोत कोरडे होतात. केवळ काही मोजक्या ठिकाणी पाणी शिल्लक असते. येथे प्राण्यांना तृष्णातृप्तीसाठी येण्याशिवाय पर्याय नसतो. अशा पाण्याच्या जागा हेरून तुम्ही लपून बसलात, तर अनेक दुर्मीळ प्राणी, पक्षी सहज दिसतात.

वाघाला पाणी अतिशय प्रिय आहे. उन्हाळ्यात ते पाण्यात तासन्तास बसून असतात. म्हणूनच व्याघ्र प्रकल्पात उन्हाळ्यात पर्यटकांची संख्या वाढते. ही गर्दी वाघांसाठी होत असली तरी पर्यटकांनी केवळ वाघापुरतेच मर्यादित राहू नये. इतरही अनेक प्राणी, पक्षी, सरीसृप, फुलपाखरे, कीटक, वृक्ष, वनस्पती बघा. त्याबद्दल जाणून घ्या.

अनेकांना वाटतं की, उन्हाळ्यात रान वैराण होतं. पण तसं नसतं. पानगळ होत असतानाच केशरी साज घेऊन पळस फुलू लागतो. गुलाबी सुकुमार पुष्पांची सावर लक्ष वेधून घेते. मोहवृक्षाच्या कुच्यातून कलशासारखी दिसणारी रसरशीत श्वेतपिवळी मोहफुले गळू लागतात. कुसुम वृक्षावर गुलाबी, कुसुम्बी पानांचा साज चढू लागतो, पाणवठ्याजवळचा जांभूळवृक्ष तजेलदार पोपटी पानांनी सजू लागतो. इकडे सूर्य आग ओकत असताना त्याला वाकुल्या दाखवत बहावा आपल्या झुंबरासारख्या सोनपिवळ्या फुलांनी सुशोभित होतो. रात्री रानात फिरताना पर्णहीन वृक्षावर तारे उतरलेले दिसतात. सरोवराच्या शांत जळात पौर्णिमेचं टिपूर चांदणं तरंगत असतं. रान रात्री अंधारून असताना चमकदार पांढरा शुभ्र करू वृक्ष तो अंधारही सुशोभित करतो. जंगल दणाणून सोडणारी वाघाची डरकाळी, मोराच्या आर्त स्वरातल्या केका, रातव्याचा एकसुरी चक्कू चक्कूचा स्वर, दचकलेल्या सांबराचं पोंक करत पळ काढणं, धिप्पाड रानगव्याच्या पायाखाली मोडणाऱ्या बांबूचा आवाज, कोहर, कोहर अशी चितळांची जोडीदाराला दिलेली मिलनोत्सुक साद. असं सगळं मंतरलेलं वातावरण असतं रानात. रानात आंबटगोड चारं (जी चारोळी

आपण बासुंदी, श्रीखंडात वापरतो सुकामेवा म्हणून त्याचं फळ) पिकू लागतात. गोड खिरण्या झाडाला लदबदतात, चिकूपेक्षाही अधिक साखरगोडवा असलेली तेंदूफळे (टेम्भूर) तेंदू वृक्षातून डोकावू लागतात. आपल्या गोल कलशकुपीत साखरेच्या पाकासारखा रस दडवून बसलेली मोहफुले तोंडात टाकताच शरीर आणि मनाला तरतरी देतात.

आपल्या महाराष्ट्रात एकूण सहा व्याघ्र प्रकल्प आहेत. येथे तुम्ही उन्हाळी पर्यटनाचा मनसोक्त आनंद घेऊ शकता.

## मेळघाट व्याघ्र प्रकल्प

सातपुडा-मेकल पर्वतरांगांचा अविभाज्य भाग असलेला मेळघाट व्याघ्र प्रकल्प देशातील प्रचंड मोठ्या क्षेत्रफळाचा आहे. हा व्याघ्र प्रकल्प गुगामल राष्ट्रीय उद्यान, मेळघाट, वान, अंबाबरवा आणि नरनाळा या अभयारण्यापासून निर्माण झाला आहे. अमरावती, अकोला, बुलडाणा जिल्ह्याच्या सीमेत हा प्रकल्प असला तरी याचा सर्वाधिक भाग अमरावती जिल्ह्यात आहे. पूर्वेला जाफ्राबादमध्ये नरनाळा आणि पश्चिमेला तेल्यागड हे किल्ले आहेत. नरनाळा किल्ला अतिशय देखणा आहे. याचे क्षेत्रफळ ३९२ किमी आहे. किल्ल्याची भिंत तब्बल ३६ किमी लांब आहे. या प्रकल्पातही वाघ आहेत. या भागात ९० प्रकारच्या वृक्ष प्रजाती, ६६ प्रकारची झुडपे, ३१६ प्रकारच्या वनस्पती, ५६ प्रकारच्या वेली आणि गवताचे तब्बल ९९ प्रकार आहेत. मध्य प्रदेश राज्याच्या जवळच्या या जंगलात कोरकू आदिवासींच्या संपन्न संस्कृतीचे निरीक्षण तुम्हाला करता येईल. निसर्गालाच सर्वस्व मानून अतिशय कमी गरजांमध्ये तरीही आनंदात जगणाऱ्या या लोकांना बघून कदाचित डिजिटलच्या आभासी जगातून आपण खऱ्या जगात येऊ शकू. म्हणून या व्याघ्र प्रकल्पाला नक्की भेट द्यायला हवी.

**जायचे कसे ?** ■ हवाई मार्ग - डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळ, नागपूर २४० किमी आहे. ■ रेल्वे मार्ग - बडनेरा जंक्शन ११० किमी आहे. ■ रस्ता - परतवाडा मार्गे धारणी आणि बुऱ्हाणपूरवरून बसेस मिळतील.

## नवेगाव–नागझिरा व्याघ्र प्रकल्प

घनदाट वनांचा नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्प गोंदिया आणि भंडारा जिल्ह्यात वसला आहे. कधीकाळी येथे हत्ती होते. हत्तीला संस्कृत भाषेत नाग म्हणतात. त्यावरूनच याला नागझिरा नाव आहे. पूर्वी येथे बाराशिंगे, रानम्हशी, शेकरू असल्याचे निसर्गअभ्यासक सांगतात. आताही नागझिऱ्यात वाघ, बिबट, रानकुत्रे, रानगवे आणि असंख्य वन्यजीव आहेत. कोलू पाटलाने बांधलेला प्रचंड विस्ताराचा नवेगाव बांध तलाव, त्यातून दिसणारे मालडोंगरी, गम्फी, कोलेसूर पहाड, नवेगाव राष्ट्रीय उद्यानातील बोदराई अशी अनेक ठिकाणे बघण्यासारखी आहेत. नवेगाव बांध तलावावर अनेक स्थलांतरित पक्षी हिवाळ्यात येतात. संपूर्ण लाकडाने निर्मित संजयकुटीत मुक्काम करण्याची मज्जाही काही औरच. या परिसरात स्लेंडर लोरीस (लाजवंती माकड) या दुर्मीळ प्राण्याची नोंद झालेली आहे. भंडाऱ्यापासून २० किमी अंतरावर कोका अभयारण्यसुद्धा भेट देण्यास उत्तम आहे. या भागात वृक्ष वनस्पतींच्या ३६४ प्रजाती तर, सरीसृप ३६ प्रजापतीचे आहेत. शिवाय पक्षी १६६ प्रजाती आणि फुलपाखरे ४९ प्रजातीची आढळतात.





येथून जवळच इटियाडोहचा विस्तीर्ण जलाशय आहे. जवळची तिबेटीयन वस्तीही भेट देण्यासारखी आहे. या वस्तीत तिबेटीयन शैलीचे सुंदर बुद्धविहार आहे. येथे तुम्ही आलात की, तिबेटमधेच असल्याचा भास होतो. शिवाय ट्रेकिंग, हायकिंगचा आनंद घेण्यासाठी उंच प्रतापगड आहे. येथे वटवाघूळाच्या अनेक प्रजाती आहेत.

**जायचे कसे ?** हवाई मार्ग - नागपूर विमानतळ १२० किमी आहे. ■ रेल्वेमार्ग - भंडारा रेल्वेस्थानक ५० किमी, गोंदिया ५० किमी, सौन्दड २० किमी, तर तिरोडा रेल्वे स्थानक २० किमी आहे. ■ रस्ता - साकोलीपासून २२ किमी तर गोंदिया जिल्हा मुख्यालयापासून ६० किमी अंतर बसस्थानक आहे. नागपूर १२० किमी आहे.

## सह्याद्री व्याघ्रप्रकल्प

पश्चिम घाटातील अतिमहत्त्वपूर्ण जैवविविधता असलेला हा व्याघ्र प्रकल्प चांदोली राष्ट्रीय उद्यान आणि कोयना अभयारण्य मिळून तयार झाला आहे. सह्याद्री व्याघ्रप्रकल्प परिसरातून वारणा, कोयना नद्या वाहतात. कोयना आणि



चांदोली धरण याच नद्यांवर बांधले आहेत. येथे तब्बल १५०० प्रजापतीच्या वनस्पती आहेत. त्यात ३०० वनौषधी प्रजाती आहेत. कारवी, निर्गुडी, अडुळसा, शिकेकाई, रानचमेली, सर्पगन्धा, धायटी, ज्याची आंतरराष्ट्रीय तस्करीच्या बाजारात मोठी मागणी आहे, अशी नरक्या ही वनस्पती येथे आहे. येथे वाघासह ३६ प्रजातीचे प्राणी आहेत. राज्यप्राणी शेकरूसुद्धा आढळतो. हे निमसदाहरित आणि मिश्र पानगळीच जंगल आहे. येथे पक्षी प्रजाती २३० आहेत. त्यातही निलगिरी वूड पिजन हा दुर्मीळ पक्षी आहे. तसेच नदीसुरय पक्ष्याची वीण होते. १२५ प्रजातीची विविधरंगी फुलपाखरे आहेत. भारतातील सर्वात मोठे सदर्न बर्ड विंग आणि सर्वात लहान ग्रास ज्वेल ही फुलपाखरे येथे आढळतात. शिवाय येथे शिवसागर जलाशय, वासोटा किल्ला, नागेश्वर मंदिर, ओझर्डे धबधबा, कास पठार, चाळकेवाडी पठार, झोळंबी पठार बघण्यासारखे आहे.

**जायचे कसे ?** ■ कोयनानगर- कोल्हापूर १३०किमी ■ कराड- ५६किमी ■ सातारा ९० किमी, पाटण २० किमी, चिपळूण ४५ किमी, चांदोली- मुंबई ३८० किमी, पुणे २१० किमी, सांगली ९८ किमी, कोल्हापूर ८० किमी ■ रेल्वे स्थानक - सांगली ९८ किमी, मिरज जंक्शन ११०किमी, कोल्हापूर ८० किमी, कराड ६० किमी ■ विमानतळ - पुणे २१० किमी

## पेंच व्याघ प्रकल्प

उत्तर ते दक्षिण वाहणाऱ्या पेंच नदीवरून या प्रकल्पाला हे नाव पडले आहे. दोन समान भाग पूर्व पेंच आणि पश्चिम पेंच असे आहेत. १९७५ मध्ये महाराष्ट्र सरकारने पेंच राष्ट्रीय उद्यानाची घोषणा केली. १९९९ मध्ये प्रकल्पाचा दर्जा या वनाला मिळाला. नुकताच मानसिंगदेव अभयारण्याचा समावेश या प्रकल्पात करण्यात आला आहे. या व्याघ्र प्रकल्पात वाघासोबतच १६४ प्रजातीचे पक्षी आहेत. यातील मलबार पाईड हॉर्नबिल हा सुंदर धनेश पक्षी आणि व्हाईट रम्प्ड, लॉंग बिल्ड, व्हाईट स्क्हेजर, किंग व्हल्चर या चार गिधाडांच्या प्रजाती बघायला मिळतात. आंबाखोरी धबधबा बघण्यास उत्तम आहे. येथे रानगवे आणि इतर वन्यजीवही भरपूर आहेत. अनेक ठिकाणी इथल्या मातीत अभ्रक अधिक दिसत. त्यामुळे जंगलातील काही वाटा चमचमणाऱ्या वाटतात.

**जायचे कसे?** ■ हवाई मार्ग- जवळचा विमानतळ नागपूर ७० किमी. ■ रेल्वे मार्ग- जवळचे रेल्वे स्थानक नागपूर ७० किमी. ■ रस्ता - बस नागपूरवरून उपलब्ध.

## ताडोबा -अंधारी व्याघ्र प्रकल्प

टायगर आणि ताडोबा हे घट्ट समीकरण आहे. त्यामुळे वाघोबासाठी ताडोबाशिवाय पर्याय नाही. ताडोबा राष्ट्रीय उद्यान (११६.५५ चौ. किमी), अंधारी अभयारण्य (५०८.८५ चौ. किमी ) मिळून (६२५.४० चौ.किमी) चे हे व्याघ्र प्रकल्प आहे. ताडोबा राष्ट्रीय उद्यानाला 'तारू' या आदिवासींच्या देवावरून हे नाव मिळालं. तर, अंधारी अभयारण्याला घनदाट अंधाऱ्या जंगलातून वाहणाऱ्या अंधारी नदीवरून. येथे वृक्षांच्या १४१ प्रजाती आहेत. येथील सर्वात मोठे आकर्षण अर्थातच वाघ आहे. शिवाय २८० हून अधिक पक्षी प्रजाती आहेत. ७० प्रकारच्या फुलपाखरांच्या प्रजाती आहेत. चंद्रपूर जिल्ह्याला इतिहासाचा संपन्न वारसा आहे. या प्रकल्पाच्या सीमेवर रामदेगी आहे. पावसाळ्यात येथे सुंदर धबधबे, निर्झर वाहत असतात. पराक्रमी गोंडराणी हिराईने बांधलेले चंद्रपूरची कुलदेवता माता महाकालीचे मंदिर आहे. अचलेश्वर मंदिर, राणी हिराईने बांधलेली तिचा पती राजा बिरशहा याची भव्य समाधी मोगलकालीन शैलीची आठवण करून देते. भद्रावती तालुक्यात बौद्ध काळातील विजासन लेणी, जैनधर्माचे पार्श्वनाथ मंदिर, जिवती तालुक्यातील माणिकगड किल्ला हे सारे बघण्यासारखे आहे. पर्यटकांसाठी खास खबर म्हणजे या व्याघ्र प्रकल्पात रुड्यार्ड किपलिंगच्या मोगली पुस्तकातला बघिरा म्हणजे काळा बिबट आढळून आला आहे. अलीकडेच काही पर्यटकांना त्याने दर्शन दिलं आहे.

**जायचे कसे ?** ■ हवाई मार्ग - नागपूर विमानतळ १५५ किमी. ■ रेल्वे मार्ग -चंद्रपूर रेल्वे स्थानक ४५ किमी. ■ रस्ता चंद्रपूर बसस्थानक ४५ किमी.

## बोर व्याघ्र प्रकल्प

या प्रकल्पात वाघ तर आहेच. शिवाय १६० प्रजातीचे पक्षी, २६ प्रकारचे सरीसृप आणि अनेक वन्यजीव आहेत. निवांत बघण्यासारखा हा व्याघ्र प्रकल्प आहे.

बोर धरणाजवळ उंच डोंगरात वसलेले बुद्धविहार विलोभनीय आहे.

**(उर्वरित पृष्ठ ३२ वर)**

# आपली सात आश्चर्ये

**जून २०१३ मध्ये जगभरातून घेतलेल्या मतांच्या आधारावर महाराष्ट्रातील सात आश्चर्यांची निवड करण्यात आली. वेगवेगळ्या क्षेत्रातील मान्यवर सात ज्युरींनी सुमारे ४०० स्थळांमधून चौदा स्थळे निवडली. त्यानंतर मतदानाद्वारे अंतिम सात आश्चर्यांची निवड करण्यात आली.**

## छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस



■ आधीची नावे छत्रपती शिवाजी टर्मिनस (सीएसटी), व्हिक्टोरिया टर्मिनस (व्हीटी), बोरीबंदर ■ मुंबई शहरातील ऐतिहासिक व सर्वात मोठे रेल्वे स्थानक असून मध्य रेल्वेचे मुख्यालय ■ इमारतीचे बांधकाम गॉथिक शैलीचे ■ १८७८ मध्ये इमारत बांधकामास सुरुवात, १८८७ मध्ये बांधकाम पूर्ण ■ १८८७ साली व्हिक्टोरीया राणीच्या नावावरून बोरीबंदरचे 'व्हिक्टोरिया टर्मिनस' असे नामकरण ■ १९९६ मध्ये इमारतीचे छत्रपती शिवाजी टर्मिनस नामकरण तर २०१७ मध्ये 'महाराज' शब्द जोडण्यात आला ■ २००४ मध्ये युनेस्कोच्या जागतिक वारसा लाभलेल्या स्थळांच्या यादीत समावेश.

## ग्लोबल विपश्यना पॅगोडा

■ मुंबईतील गोराई येथे आशियातील सर्वात उंच दगडी बांधकाम असलेला स्तूप ■ विपश्यना ध्यान धारणेचे गुरू आचार्य एस.एन. गोएंका यांच्या प्रेरणेतून उभारणी ■ पॅगोडात गौतम बुद्धांच्या हाडांच्या काही अवशेषांचे जतन ■ खांबविरहित अशी जगातील सर्वात मोठी घुमटाकार वास्तू ■ मुख्य घुमटाखाली सुमारे ८०० जणांची ध्यानधारणेसाठी बसण्याची व्यवस्था



छाया : प्रज्ञेश कांबळी

## कास पठार

■ सह्याद्रीच्या कुशीत वसलेले कास पठार शहरी गजबजाटापासून २५ कि.मी. अंतरावर ■ २०१२ मध्ये 'फुलांचे पठार' युनेस्कोकडून जागतिक वारसास्थळ म्हणून घोषित ■ फुलांच्या स्थानिक प्रजाती जगभरात केवळ कास पठारावरच हे वैशिष्ट्य ■ जुलै ते सप्टेंबर दरम्यान सुरू असतो फुलांचा रंगोत्सव ■ विविध प्रकारच्या फुलांसह दुर्मीळ वनस्पतींचाही समावेश.





## लोणार सरोवर

■ बुलडाणा जिल्ह्यातले खाऱ्या पाण्याचे सरोवर. औरंगाबाद शहरापासून १५० कि.मी. अंतरावर ■ वेगवान उल्का आदळल्याने सरोवराची निर्मिती ■ बेसॉल्ट खडकातील एकमेव मोठे आघाती विवर ■ सरोवराच्या जतनासाठी 'लोणार विवर' हे वन्यजीव अभयारण्य म्हणून घोषित



## देवगिरी/दौलताबादचा किल्ला (औरंगाबाद)


■ दगडामध्ये खोदलेल्या गुंफा आणि दालने, एक सुंदर मंदिर, मोठा खंदक, संरक्षक तटबंदी, प्रशस्त राजवाडे, स्नानगृहे, निवासी संकुले, बाजार, पायऱ्या असलेली विहीर किल्ल्याची वैशिष्ट्ये ■ शंखाकृती आकाराच्या २०० मीटर उंचीच्या टेकडीवर किल्ल्याचे बांधकाम ■ इ.स.च्या ११ व्या शतकात यादव सम्राट भिल्लम पाचवा याने किल्ला बांधला ■ देवगिरी किल्ल्याचे मुघलांच्या ताब्यात गेल्यावर केले नामकरण ■ वेगवेगळ्या राजसत्ता नांदल्याने किल्ल्याच्या बांधकामात वैविध्य



## रायगड किल्ला

■ ६ जून १६७४ रोजी छत्रपती शिवाजी महाराजांचा रायगडावर राज्याभिषेक तसेच महाराजांची प्राणज्योतही येथेच मालवली. ■ महाड तालुक्यात समुद्रसपाटीपासून ८२० मीटर उंचावर ■ वेगवेगळ्या कालखंडात या किल्ल्याला मिळाली निरनिराळी नावे - तणस, रासिवटा, नंदादीप, रायरी ■ इ.स. १६५६ मध्ये किल्ला जिंकून शिवरायांनी केले नामकरण ■ हिरकणीचा बुरूज, टकमक टोक, श्री शिरकाई मंदिर, छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा मुख्य आकर्षण.

(माहिती स्रोत : एमटीडीसीचे संकेतस्थळ www.maharashtratourism.gov.in)



## अजिंठा लेणी (औरंगाबाद)

■ लेणी औरंगाबादपासून १०७ कि.मी. अंतरावर ■ स्थापत्यशैली, चैत्यगृहे, विहारांच्या भिंतींवर रंगवलेल्या चित्रकृती वैशिष्ट्यपूर्ण ■ बुद्धमूर्ती आणि जातक कथांच्या चित्रणाद्वारे बौद्ध धार्मिक कलेचे दर्शन ■ १९८३ मध्ये युनेस्कोने अजिंठा लेण्यांना दिला जागतिक वारसास्थळाचा दर्जा.

(पृष्ठ २९ वरून)

येथून जवळच वर्धा येथे महात्मा गांधीच्या सहवासाने पावन झालेले सेवाग्राम, आचार्य विनोबा भावेंचे पवनार आश्रम आहे. तसेच गीताई मंदिर, विश्वशांती स्तूप, मगन संग्रहालय अशी भेट देण्यासारखी अनेक ठिकाणे आहेत.

**जायचे कसे ?** ■ हवाईमार्ग - डॉ.बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळ, नागपूर ८० किमी आहे. ■ रेल्वेमार्ग - वर्धा रेल्वेस्थानक ३५ किमी आहे. ■ रस्ता- जवळचा हिंगणी बसस्थानक ५ किमी आहे.

वरील सहा व्याघ्र प्रकल्पांव्यतिरिक्त राज्यातील अन्य अभयारण्यांची थोडक्यात माहिती पुढीलप्रमाणे दिली आहे.

## भीमाशंकर अभयारण्य (पुणे)

महाराष्ट्राच्या राज्य प्राण्याचे, शेकरुचे माहेरघर घनदाट वनश्रीने नटलेले, धबधब्यांनी, छोट्या-मोठ्या टेकड्यांनी सजलेले, बारा ज्योतिर्लिंगांपैकी सहावे स्थान असलेले सुप्रसिद्ध भीमाशंकर !

### कसे जाल ?

पुणे येथील विमानतळ आणि रेल्वे स्थानक जवळचे आहे. शिवाजीनगर, पुणे येथून परिवहन महामंडळाच्या बसेस उपलब्ध आहेत. भीमाशंकरला जाणारी शेवटची बस येथून संध्याकाळी ५ वा. सुटते.

## राधानगरी (दाजीपूर) अभयारण्य (कोल्हापूर)

पश्चिम घाटातील जैवविविधतेने नटलेले, प्रामुख्याने गवा या प्राण्याचे वसतिस्थान म्हणून प्रसिद्ध. वाघ, चित्ते, आळशी अस्वले, शेकरू, रानगायी, भेकर इ. या प्राण्यांचा अधिवास. सस्तन प्राण्यांच्या ४७, सरपटणाऱ्या प्राण्यांच्या ५९, उभयचर प्राण्यांच्या २०, पक्ष्यांच्या २६४ आणि फुलपाखरांच्या ६६ प्रजाती येथे बघायला मिळतात.


घुबड


सारस पक्ष्यांची जोडी

## सागरेश्वर अभयारण्य (सांगली)

येथील जंगलात पानगळीचे वृक्ष, सूचिपर्णी वृक्ष यांचे मिश्रण आढळते. कीटक, पक्षी, अजगरासारखे सरपटणारे प्राणी, काळवीट, तरस, लांडगा, कोल्हा, ससा, बिबटे तसेच मोठ्या संख्येने मोरही येथे बघायला मिळतात. पर्यटनासाठी ऑगस्ट ते फेब्रुवारी हा चांगला काळ आहे.

### कसे जाल ?

जवळचा विमानतळ कोल्हापूर, जवळचे रेल्वे स्थानक सांगली.

## चिखलदरा (अमरावती)

शांत निसर्गाच्या, पानाफुलांच्या, झाडाझुडपांच्या सान्निध्यात घेऊन जाणारे, समुद्रसपाटीपासून १,०८८ मी. उंचीवर असणारे चिखलदरा हे एक थंड हवेचे ठिकाण आहे.

मेळघाटातील व्याघ्रप्रकल्पाच्या संरक्षित वन्य भागाने चिखलदऱ्याची दक्षिणेकडची संपूर्ण सीमा व काही अंशी पश्चिमेकडची सीमा व्यापून टाकली आहे. गुगमाळ राष्ट्रीय उद्यान चिखलदऱ्याच्या पूर्वेकडच्या सीमेवर व काही प्रमाणात वायव्येकडच्या सीमेवर आहे. अस्वल, ससे, वाघांसह अन्य वन्यप्राणी व वनस्पतींसाठी चिखलदरा ओळखले जाते. ऑक्टोबर ते जून हा काळ चिखलदऱ्याला जाण्यासाठी चांगला.

### कसे जाल ?

नागपूर हा सर्वात जवळचा विमानतळ. अमरावती हे सर्वात जवळचे रेल्वे स्थानक.

## रेहेकुरी अभयारण्य (अहमदनगर)

अहमदनगर जिल्ह्यातील कर्जत तालुक्यात असणाऱ्या या रेहेकुरी वन्यप्राणी अभयारण्यात काळवीट, चिंकारा, लांडगे आणि कोल्हे त्याचबरोबर पानगळीची, खुजी झाडं असणारं जंगल आपल्याला भ्रमंतीचा अनोखा आनंदही देतं.

### कसे जाल ?

कर्जतपर्यंत रेल्वेने जाऊन पुढे रस्त्याने रेहेकुरीला जावे.

## कर्नाळा पक्षी अभयारण्य (रायगड)

मुंबई-गोवा महामार्गावरून पनवेलपासून अगदी १२ किलोमीटर अंतरावर कर्नाळा पक्षी अभयारण्य आहे. हौशी पक्षी निरीक्षकांचे आणि पक्षिशास्त्राच्या अभ्यासकांचे हे अतिशय आवडते ठिकाण. स्थानिक पक्ष्यांच्या सुमारे १५० प्रजाती आणि थंडीत या अभयारण्यात येणाऱ्या स्थलांतरित पक्ष्यांच्या ३७ प्रजाती आहेत. ऑक्टोबर ते फेब्रुवारी हा येथे येण्याचा सर्वात चांगला काळ आहे.

### कसे जाल ?

छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ हा जवळचा विमानतळ आहे. पनवेल हे जवळचे रेल्वे स्थानक आहे. राज्य परिवहनाची मुंबई सेंट्रल ते कर्नाळा अशी नियमित बससेवा आहे. पनवेलहून पेणला जाणाऱ्या रिक्षाने किंवा टॅक्सीने वाटेत कर्नाळ्याला उतरता येते.

**वन्यजीव अभ्यासक,चंद्रपूर.**
**संपर्क : ०९४२३४२२३४८**









**शहरी माणसाला वाटते, कधी घटकाभर शेतात राहावे, पाण्यात मनसोक्त डुंबावे, बैलगाडीतून सैर करावी, लहानपण अनुभवत झाडांवर चढावे, छान गावरान चवीचं अन्न खावं, पक्ष्यांची किलबिल ऐकावी, कांदा कसा उगवतो यांसारख्या शेतीशी संबंधित गोष्टींची थेट ओळख करून घ्यावी. आतापर्यंत असे वाटणाऱ्या लोकांना ते सर्व अनुभवण्याची फारशी संधी मिळत नसते, पण आता ती कृषी पर्यटनाच्या माध्यमातून शहरी माणसांना हवा तसा 'चेंज' आणि ग्रामीण माणसांना तसेच शेतकऱ्यांना रोजगाराचे साधन उपलब्ध झाले आहे.**

# शेतातला आनंद

**पांडुरंग तावरे**

पळशी येथे बारामती कृषी पर्यटन प्रशिक्षण संशोधन व विकास केंद्र हे महाराष्ट्रातले सर्वात मोठे व प्रसिद्ध कृषी पर्यटन स्थळ समजले जाते. शेतात येणाऱ्या पर्यटकांना राहण्यासाठी त्या ठिकाणी २० खोल्या आहेत. एका वेळी १५० लोक राहू शकतात. या कृषी पर्यटन केंद्रातील ३० एकर शेतामध्ये फळबाग लागवड केली आहे. त्यामध्ये आवळा, चिक्कू, पेरू, सीताफळ, मोसंबी, लिंबू, आंबा, चिंच, बोर, नारळ अशा फळझाडांचा समावेश आहे. ग्रामीण जीवनाचा अस्सल अनुभव पर्यटकांना येथे घेता येतो. त्यामध्ये गाईचे दूध काढायलाही त्यांना शिकवले जाते. ग्रामीण खेळ खेळले जातात.

येथे येणाऱ्या पर्यटकांना गुऱ्हाळ, साखर कारखाना, डेअरी, वाईनरी या शेतीशी निगडित प्रकल्पांची भेट घडवली जाते. इतकंच नव्हे तर बैलगाडी आणि ट्रॅक्टरवरून रपेट मारली जाते. शिवारातल्या तळ्याला भेट दिली जाते. गुऱ्हाळात जाऊन शेतातल्या ऊसाचा रस प्यायला मिळतो. सायकल चालवण्याचा आनंद घेता येतो. शेळ्या-मेंढ्यांच्या कळपात जाऊन

त्याचबरोबर खेळायलाही मिळतं. 'बगळ्यांची माळ हवी तितका वेळ पाहता येते. दुर्मीळ पक्ष्यांचे दर्शन कॅमेऱ्यात टिपता येतं.

## कृषी तंत्राची ओळख

येथे शहरी लोकांना शेतीतंत्राची ओळख करून दिली जाते. ज्या हंगामात पर्यटक भेट देतील, त्या हंगामातील पिके व शेतीची कामे यांची माहिती पर्यटकांना करून घेता येते. येथील गाईड पर्यटकांना फिरून शेतीची माहिती देतात, पर्यटकांच्या मनातल्या शंका दूर करतात. पर्यटनाला आलेले पर्यटक स्वतः मातीत हात घालून सर्जनशीलतेचा आनंदही मिळवतात.

## हक्काची बाजारपेठ

या कृषी पर्यटनामुळे गावातल्या कित्येक कारागिरांच्या कलेला या माध्यमातून बाजारपेठ मिळाली आहे. टोपल्या बनवणारे कारागीर, बैलगाड्या बनवणारे कारागीर यांनाही त्याचा लाभ झाला आहे. त्यांच्या पर्यटन क्षेत्राला भेट देणारे कित्येक पर्यटक तिथल्या छोट्या आकर्षक बैलगाड्या घेऊन जातात. बारामती परिसरातल्या तब्बल १५०-१६० बचतगटांना त्याचा प्रत्यक्ष - अप्रत्यक्ष लाभ मिळालेला आहे.

वेगवेगळ्या कारागिरांबरोबरच लोककला सादर करणाऱ्या कलाकारांनाही कृषी पर्यटन केंद्राने प्रतिष्ठा मिळवून दिली आहे. पेरणीच्या काळात गेलं तर पेरणीचा अनुभव घेता येतो, काढणीच्या वेळी गेलं तर काढणी पाहता येते, उन्हाळ्यात आंबे, सप्टेंबरमध्ये आवळे, उसाच्या काळात गुऱ्हाळ, काकवी या गोष्टींचा आस्वाद घेता येतो.

## कृषी पर्यटनासंदर्भात प्रशिक्षण

महाराष्ट्रभरातल्या शेतकऱ्यांना कृषी पर्यटनासंदर्भात प्रशिक्षण दिले जाते. आतापर्यंत शंभरहून अधिक गावांमधल्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन दिलं आहे. जुन्नर, राजगुरुनगर, संगमनेर, सोलापूर, अकोला, वाशीम, नागपूर, कोल्हापूर, वर्धा, ठाणे आणि सातारा जिल्ह्यातील काही गावांचा यामध्ये समावेश आहे.

## शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट

शेतकऱ्यांचे उत्पन्न शाश्वतरीत्या वाढवण्यासाठी ॲग्री टुरिझम (कृषी पर्यटन) ही संकल्पना गेली १५ वर्षांपासून महाराष्ट्रात राबवण्यात येत आहे. २००४ सालापासून महाराष्ट्रात कृषी पर्यटन संकल्पना रुजली असून, सध्य स्थितीत महाराष्ट्र राज्यात ५३० कृषी पर्यटन केंद्रे यशस्वी सुरू आहेत. २०१७ ते २०१८ या कालावधीत ७ लाख पर्यटकांनी भेटी दिल्या असून ३० कोटी रुपयांचे अतिरिक्त उत्पन्न कृषी पर्यटन करणाऱ्या शेतकऱ्यांना मिळाले आहे.

## विविध उपक्रम

राज्यातील कृषी पर्यटन केंद्रांमध्ये उन्हाळ्यामध्ये विविध उपक्रम राबवले जातात. या कृषी पर्यटन केंद्रांमध्ये पर्यटकांसाठी आमरस पार्टीचे आयोजन करण्यात येते. त्याचबरोबर शिवार फेरी, बैलगाडी सफर, ट्रॅक्टरमधून सफर, सायकल चालवणे, बोटिंग, रेनडान्स, स्विमिंग, ग्रामीण खेळ, मुलांना खेळण्यासाठी विविध प्रकारच्या खेळणी, जादूचे प्रयोग, पक्षी निरीक्षण, झोके इ. अनेक गोष्टी पाहावयास व अनुभवण्यास मिळतात. अशाच काही कृषी पर्यटन केंद्रांची थोडक्यात माहिती पुढीलप्रमाणे दिली आहे.



**कृषी पर्यटन केंद्रात पर्यटक पिकांविषयी माहिती करून घेताना.**

### ■ मेहेर रिट्रीट कृषी पर्यटन केंद्र

हे कृषी पर्यटन केंद्र पुणे जिल्ह्यातील खुटबाव येथे हे ठिकाणी आहे.

**जवळील पर्यटन स्थळे** – भुलेश्वर मंदिर, खुटबाव डॅम इत्यादी.

**कसे जाल?**

हे ठिकाण पुण्यापासून ४५ कि. मी. असून या ठिकाणी पोहोचण्यासाठी पुण्यावरून व यवतवरून खुटबावपर्यंत पोहोचण्यासाठी एसटी बसेस उपलब्ध आहेत. तसेच रेल्वेने देखील खुटबावपर्यंत पोचू शकता, पुणे विमानतळावरून कृषी पर्यटन केंद्रावर पोहोचण्यासाठी वाहन व्यवस्था उपलब्ध असते.

### भुलेश्वर शेरू कृषी पर्यटन केंद्र

हे कृषी पर्यटन स्थळ पुणे जिल्ह्यातील दौंड तालुक्यामधील भरतगाव येथील भुलेश्वर मंदिर पायथ्याजवळील माळशिरस रोडजवळ १०० एकरमध्ये पसरले आहे.

**जवळील पर्यटन स्थळे** – भुलेश्वर मंदिर, नर्सरी इत्यादी.

**कसे जाल?**

हे ठिकाण पुण्यापासून ४० कि. मी. अंतरावर आहे. या ठिकाणी पोहोचण्यासाठी पुण्यावरून यवतला जाण्यासाठी एसटी बस व रेल्वे सेवा उपलब्ध आहे, यवतवरून खासगी वाहनाने कृषी पर्यटन केंद्रावर पोहोचता येते, पुणे विमानतळावरून कृषी पर्यटन केंद्रावर पोहोचण्यासाठी वाहन व्यवस्था उपलब्ध करून दिली जाते.

### बनेश्वर कृषी पर्यटन केंद्र

हे कृषी पर्यटन केंद्र पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यामधील नसरापूर येथील बनेश्वर मदिराजवळ असून ३५ एकर मध्ये विखुरले आहे. बनेश्वर मंदिरालगत असल्यामुळे

पर्यटकांची मोठी गर्दी या कृषी पर्यटन केंद्रावर असते.

**जवळील पर्यटन स्थळे –** बनेश्वर मंदिर, बनेश्वर गार्डन, प्रतिबालाजी (नारायणपूर), भाटघर धरण, भोर राजवाडा, नेकलेस पॉइंट इ. अनेक ठिकाणांना पर्यटक भेटी देऊ शकतात.

**कसे जाल?**

हे ठिकाण पुण्यापासून ३० कि. मी. अंतरावर असून या ठिकाणी पोहोचण्यासाठी पुण्यावरून नसरापूरपर्यंत एसटी बस आहे. पुणे विमानतळावरून व पुणे रेल्वे स्थानक वरून कृषी पर्यटन केंद्रावर पोहोचण्यासाठी वाहन व्यवस्था उपलब्ध असते.



नांगर चालवण्याचा आनंद उपभोगताना पर्यटक.

## लक्ष्मी कृषी पर्यटन केंद्र

हे कृषी पर्यटन केंद्र अहमदनगर जिल्ह्यातील श्रीरामपूर तालुक्यामधील शिरसगाव येथे १५ एकरमध्ये पसरले आहे. श्रीरामपूर तालुक्यात एकमेव कृषी पर्यटन असल्यामुळे परिसरातील पर्यटकांची मोठी गर्दी या ठिकाणी होते. या वर्षी पर्यटकांसाठी आमरस पार्टीचे आयोजन करण्यात आले आहे. कृषी पर्यटनासंबंधी बाबी या ठिकाणी पाहावयास व अनुभवयास मिळतात.

**जवळील पर्यटन स्थळे –** शिर्डी साईबाबा, शनी-शिंगणापूर, राहुरी कृषी विद्यापीठ, साखर कारखाना इत्यादी.

**कसे जाल?**

हे ठिकाण अहमदनगरपासून ७० कि. मी. व श्रीरामपूरपासून १० कि.मी. अंतरावर आहे. या ठिकाणी पोहोचण्यासाठी एसटी बस सेवा उपलब्ध आहे. श्रीरामपूरपासून खासगी वाहनाने कृषी पर्यटन केंद्रावर पोहोचता येते. शिर्डी विमानतळावरून व बेलापूर रेल्वे स्थानक वरून कृषी पर्यटन केंद्रावर खासगी वाहनाने पोहोचता येते.

## सृष्टी कृषी केंद्र

हे कृषी पर्यटन केंद्र औरंगाबाद जिल्ह्यातील गंगापूर तालुक्यामधील मिर्झापूर, जिकठाण फाटा येथे २० एकर परिसरामध्ये पसरले आहे. अहमदनगर-औरंगाबाद रोड लगत असल्यामुळे पर्यटकांची मोठी गर्दी या ठिकाणी पाहावयास मिळते. या वर्षी पर्यटकांसाठी आमरस पार्टीचे व पुरणपोळी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

**जवळील पर्यटन स्थळे –** शनी-शिंगणापूर, देवगड दत्त मंदिर, वेरूळ, औरंगाबाद दर्शन, अनेक ठिकाणांना पर्यटक भेटी देऊ शकतात.

**कसे जाल?**

औरंगाबादपासून १३ कि. मी. अंतरावर असून या ठिकाणी पोहोचण्यासाठी औरंगाबाद पासून एसटी बस सेवा उपलब्ध आहे. औरंगाबाद विमानतळावरून व औरंगाबाद रेल्वे स्थानकवरून कृषी पर्यटन केंद्रावर पोहोचण्यासाठी वाहन व्यवस्था उपलब्ध असते.

## आनंद कृषी पर्यटन केंद्र

हे कृषी पर्यटन केंद्र सातारा जिल्ह्यातील बोरगाव येथील आनंदराव शिंदे यांच्या पाच एकर शेतामध्ये विखुरले आहे. हे ठिकाण पुणे -सातारा- कोल्हापूर रोडपासून बोरगाव पोलीस स्थानकच्या मागे १ कि. मी. अंतरावर असल्यामुळे पर्यटकांची मोठी गर्दी असते. दरवर्षी आंबा महोत्सव व आमरस पार्टीचे आयोजन करण्यात येते.

**जवळील पर्यटन स्थळे –** अजिंक्य तारा किल्ला, कास पठार, धबधबा, साखर कारखाना, सूत गिरणी इ. अनेक ठिकाणांना पर्यटक भेटी देऊ शकतात,

**कसे जाल?**

सातारा पासून १३ कि. मी. अंतरावर असून या ठिकाणी ४० ते ५० पर्यटकांची निवास व्यवस्था उपलब्ध आहे. एसटी बस व खासगी वाहन व्यवस्था उपलब्ध आहे. पुणे विमानतळावरून व सातारा रेल्वे स्थानक वरून कृषी पर्यटन केंद्रावर पोहोचण्यासाठी खासगी वाहन व्यवस्था उपलब्ध आहेत.

## मधुबन कृषी पर्यटन केंद्र

हे कृषी पर्यटन केंद्र सातारा जिल्ह्यातील पाटण तालुक्यामधील मधुकर गायकवाड यांच्या तीन एकर शेतीमध्ये विकसित आहे. नेट क्रिकेट, इनडोअर गेम्स, आऊटडोअर गेम्स, थ्रीडी थिएटर, मुलांना खेळण्यासाठी विविध प्रकारची खेळणी इ. अनेक गोष्टी येथे पाहावयास व अनुभवयास मिळतात,

**कसे जाल?**

हे ठिकाण कराड शहरापासून २० कि. मी. अंतरावर आहे. येथे ३० ते ४० पर्यटकांची निवास व्यवस्था उपलब्ध आहे. या ठिकाणी पोहोचण्यासाठी सातारा व कराडपासून एसटी बस व खासगी वाहन व्यवस्था उपलब्ध आहे.

**व्यवस्थापकीय संचालक,**
**ॲग्री टुरिझम डेव्हलपमेंट कंपनी**
**संपर्क : ०९८२२०९०००५**


मोरजाई- मेगॅलिथिक फ्रेम


मोरजाई- सती शिळा


मोरजाई- लेणीतील मंदीर


रामलिंग मंदीर

# भूतकाळात डोकावताना...

**कोल्हापूरच्या पश्चिमेकडील गगनबावडा तालुका पुरातत्त्वीय व ऐतिहासिक ठेव्याच्या दृष्टीने समृद्ध आहे. रामलिंग येथील एकपाषाणी मंदिरे, आसळज येथील वीरगळसमूह, सांगशी येथील हालीदेवी राणीची स्मारकशिला, चालुक्य राजा मंगलेश याच्या साम्राज्याचे अवशेष, मोरजाई पठारावरील गुंफामंदिर आणि त्यातील सुमारे पाऊणशेच्या संख्येने असलेले सतीगळ, एकपाषाणी स्तंभद्वारे असा अचंबित करणारा ठेवा गगनबावडा परिसरात आहे.**

**सतीश लळीत**

कोल्हापूर जिल्हा हा अनेकविध वैशिष्ट्यांनी समृद्ध आहे. इतिहास, संस्कृती, कला, क्रीडा, साहित्य, चित्रपट, नृत्य, नाट्य, शिक्षण, समाजसुधारणा, एकोपा, कोणतेही क्षेत्र घ्या, कोल्हापूरची पताका उंच फडकत असते. कोल्हापूरचे आणखी एक फारसे परिचित नसलेले वैशिष्ट्य म्हणजे इथला समृद्ध पुरातत्त्व ठेवा. प्राचीन मंदिरे, गुंफा, शिल्पे, वीरगळ, सतीगळ, स्मारके अशी पुरातत्त्वदृष्ट्या अतिशय महत्त्वाची कितीतरी ठिकाणे कोल्हापूर जिल्ह्यात आहेत. जिल्ह्याच्या पश्चिमेकडील गगनबावडा तालुका तर याबाबतीत श्रीमंत म्हणावा असा आहे. रामलिंग येथील एकपाषाणी मंदिरे, आसळज येथील वीरगळसमूह, सांगशी येथील हालीदेवी राणीची स्मारकशिला, चालुक्य राजा मंगलेश याच्या साम्राज्याचे अवशेष, मोरजाई पठारावरील गुंफामंदिर आणि त्यातील सुमारे पाऊणशेच्या संख्येने असलेले सतीगळ, एकपाषाणी स्तंभद्वारे असा अचंबित करणारा पुरातत्त्व ठेवा

गगनबावडा परिसरात आहे. याबाबतीत हा भाग एवढा समृद्ध आहे की येथे एखादे 'पुरातत्त्वस्थाने व ऐतिहासिक पर्यटन सर्किट' (आर्किओलॉजिकल अ‍ॅण्ड हिस्टोरिकल सर्किट) तयार होऊन जिल्ह्याच्या पर्यटन विकासाला मोठा हातभार लागू शकेल.

## ग्रॅनाईटमधील रेखीव शिल्प

आपल्या लाडक्या राणीच्या स्मरणार्थ एखाद्या राजाने स्थापन केलेल्या शिलालेखाचे किंवा स्मारकाचे एकमेव उदाहरण असलेले हे शिल्प रेखीवपणे शेवाळी काळ्या रंगाच्या ग्रॅनाईट दगडात घडवलेले आहे. संपूर्ण शिळेचा आकार सुमारे चार फूट उंच आणि तीन फूट रुंद आहे. शिलालेखाच्या वरच्या बाजूस पेटिकाशीर्षक पद्धतीचा (**Box-headed**) लेख खोदलेला आहे. लेखाच्या खालील बाजूस एका राजस्त्रीच्या अंत्यविधीचे दृश्य ज्वाला, सेविका यांच्यासमवेत दिसते. संपूर्ण शिल्पाकृती अतिशय रेखीव, पॉलिश केलेली आहे.

लेखाची भाषा संस्कृत असून ती ब्रह्मी लिपीमध्ये लिहिलेली आहे. लेख शार्दूलविक्रीडित वृत्तामध्ये आहे. अज्ञात कारणांमुळे ही शिला चार तुकड्यांमध्ये दुभंगलेली असून ती नंतर जोडण्यात आली आहे.

या शिलालेखावर लिहिलेल्या मजकुराचा भावार्थ असा आहे : ओम श्री पृ(थ्वीधर) राजचिन्ह धारण करणाऱ्या राजाने आपल्या हालिदेवी नावाच्या अभूत अशा चारित्र्यवान पत्नीचे, जी आपल्या पतीचे जणू हृदयच होती - आपले पुण्य नाव रक्षण करीत तरुणपणीच स्वर्गात गेली, तिच्या स्मरणार्थ आपल्या उत्कट भावना व्यक्त करण्याकरिता राजाने स्वत: ही स्मारकशिला या देवळात विधिपूर्वक स्थापन केली.

## सांगशीची स्मारकशिला

गगनबावडा परिसरात राज्य करणाऱ्या चालुक्य वंशातील मंगलेश या राजाने आपली प्रिय पत्नी हालिदेवी हिच्या स्मरणार्थ स्थापन केलेली स्मारकशिला

## पत्नीप्रेमाचे अनोखे स्मारक

या स्मारकाचे वैशिष्ट्य असे की, एखाद्या राजाने आपल्या प्रिय पत्नीच्या स्मरणार्थ उभे केलेले याशिवाय अन्य स्मारक पाहण्यात अथवा वाचनात नाही.

शिलालेखाखाली असलेल्या शिल्पात खालच्या बाजूस एक स्त्री उजव्या कुशीवर झोपलेली दिसते. तिने आपला उजवा हात दुमडून उशीसारखा डोक्याखाली घेतलेला दिसतो. डावा हात अंगाबरोबर असून तो डाव्या मांडीवर विसावलेला आहे. या हातात कंकण आहे. दंडात वाकी, गळ्यात माळा, मंगळसूत्र आहे. पायात तोडे, कानात कुंडल आहे. डोक्यावर व्यवस्थित विंचरलेला कुरळा केशसंभार आहे. ही स्त्री अत्यंत तलम साडीसारखे वस्त्र अंगभर ल्यालेली आहे. तिचा देह प्रमाणबद्ध आहे. तिच्याभोवती भडकलेल्या ज्वाळा आहेत. (या ज्वाळांमुळेच ती सती असल्याचे मानले जाते). तिच्या पायाशी एक दासी बसलेली असून तिने राणीचे पाय आपल्या डाव्या मांडीवर घेतले आहेत व तिच्या डाव्या पायावर आपल्या हाताची बोटे गुंतवून कोपर तिच्या पायावर टेकवून ती बसलेली आहे.

शिल्पाच्या वरील बाजूस डावीकडे अलंकारित चक्री-पागोट्यांसह एका पुरुषाचा चेहरा कोरला आहे. पागोट्यावर शिरपेच असून चक्राकार पद्धतीचे हे पागोटे मोत्याच्या सरांनी वेढलेले आहे. दंडात राजचिन्हे आहेत. यावरुन ज्या राजाने हा शिलालेख खोदला, त्याचीच ती प्रतिमा असावी, असे मत संशोधकांनी मांडले आहे.

सांगशी शिल्प



ही या दाम्पत्याच्या अतूट प्रेमाचे दर्शन आपणाला घडवते. या स्मारकावरील शिलालेख आणि त्यावरील शिल्प यातून त्या काळात स्त्रियांनाही समाजात किती मान दिला जात होता, हे स्पष्ट होते आणि सहाव्या शतकात होऊन गेलेल्या या राजा-राणीच्या दिव्य प्रेमकथेसमोर आपण नतमस्तक होतो.

ही स्मारकशिला गगनबावडा गावाजवळच हमरस्त्यावर असलेल्या सांगशी गावात एका निर्जन, निसर्गरम्य परिसरात आहे. या भागात तिला सती सांगसाई म्हणून ओळखतात. हे एका सतीचे स्मारक असून ती गावची रक्षणकर्ती आहे, अशी येथील सर्वांची श्रद्धा आहे. संशोधनाअंती व शिलालेखाच्या वाचनानंतर ही सती-शिला नसून स्मारकशिला आहे, हे स्पष्ट झाले असले तरी येथील रहिवाशांचे भाविक मन ते मान्य करायला तयार नाही.

## पाचव्या शतकातील स्मारकशिल्प

या शिल्पाचे व शिलालेखाचे संशोधन सर्वप्रथम डॉ. जे. एफ. फ्लीट यांनी १८९३ साली केले. त्यानंतर पुणे येथील एच. डी. सांकलिया आणि एम. जी. दीक्षित या संशोधकांनी त्याचा बारकाईने अभ्यास करून ते सतीचे स्मारक असल्याचे १९४८च्या सुमारास प्रसिद्ध केले. डॉ. फ्लीट यांनी मात्र हे एका राजाने आपल्या राणीच्या स्मरणार्थ उभारलेले स्मारक आहे, असेच म्हटले होते. उटकमंडचे पी. बी. देसाई या संशोधकांनी या शिलालेखाचा फार बारकाईने अभ्यास केला. डॉ. बी. सी. छाब्रा आणि एन. लक्ष्मी नारायणराव यांच्या मताचा आधार घेऊन सांकलिया-दीक्षित यांचे मत साधार खोडून काढले आणि लिपिशास्त्राच्या आधारे हे स्मारक पाचव्या शतकातील असावे, असे अनुमान काढले.

डॉ. एच. एस. ठोसर यांनीही या शिलास्मारकाचा अभ्यास करून यासंबंधीचा लेख एपिग्राफिक्स सोसायटीच्या वार्षिक सभेत सादर केला.



आसळज वीरगळ

## आसळजचा वीरगळसमूह

गगनबावड्याच्या अलीकडे आसळज या गावी अगदी रस्त्यालगत वीरगळांचा मोठा समूह आपला अज्ञात इतिहास कवटाळून उभा आहे. आसळज गावातून एक रस्ता रामलिंगच्या एकपाषाणी मंदिरांकडे जातो. याच ठिकाणी हे वीरगळ आपले लक्ष वेधून घेतात. या ठिकाणी लहानमोठे मिळून सुमारे २० वीरगळ आहेत. विशेष म्हणजे यातील काही वीरगळ हे सहा फूट उंच असून त्यावर चारही बाजूंनी कोरीवकाम केलेले आहे. याशिवाय अनेक छोटे वीरगळ या ठिकाणी आहेत. ज्याअर्थी चारही बाजूंनी कोरीवकाम केलेले एवढे मोठे वीरगळ येथे आहेत, त्याअर्थी हे ठिकाण मोठी युद्धभूमी असली पाहिजे. मात्र वीरगळांवर कोणताही लेख कोरलेला नसल्याने या परिसरात कोणती लढाई झाली, तेथे कोणत्या वीरांना हौतात्म्य प्राप्त झाले, याबद्दल इतिहास मौन बाळगून आहे. सध्या हे वीरगळ अतिशय अस्ताव्यस्त अवस्थेत पडलेले असून, स्थानिकांना या ऐतिहासिक ठेव्याबद्दल काहीही माहिती नाही किंवा त्याबद्दल काही औत्सुक्यही नाही. अलीकडे तर या ठिकाणी अतिक्रमण करून एक बांधकामही करण्यात आले आहे. यामुळे या ऐतिहासिक ठेव्याला धोका निर्माण झाला आहे.

### वीरगळ आणि सतीगळ म्हणजे काय?

पुर्वीच्या काळी युद्धात वीरगती प्राप्त झालेल्यांच्या स्मृत्यर्थ दगडावर कोरलेले स्तंभ उभारले जात. त्यांना वीरगळ म्हणतात. हा शब्द कन्नडमधील 'वीरकल्लू' या शब्दापासून आला आहे. कन्‍न्डमध्ये कल्लू म्हणजे दगड. वीरगळामध्ये तीन पॅनेल असतात. सर्वात खालच्या पॅनेलमध्ये युद्धाचा प्रसंग कोरलेला असतो व त्यात वीर लढाई करताना किंवा धारातीर्थी पडलेला दाखवलेला असतो. दुसऱ्या पॅनेलमध्ये या वीराला यक्ष, गंधर्व किंवा अप्सरा कैलासावर घेऊन जाताना दाखवलेल्या असतात. तिसऱ्या पॅनेलमध्ये वीर कैलासावर पोचलेला असून शिवाची पूजा करताना दाखवतात. वरच्या बाजूला चंद्रसूर्याच्या प्रतिमा असतात. याचा अर्थ चंद्रसूर्य असेपर्यंत त्या वीराची कीर्ती राहील, असा असतो. याशिवाय सर्वात वर कलशही कोरलेला असतो. वीराच्या हौतात्म्यानंतर त्या काळात सती जाण्याची प्रथा होती. अशा सतीच्या स्मरणार्थ जी शिळा तयार केली जात असे, तिला 'सतीगळ' असे म्हणतात. यामध्ये सतीचा सौभाग्यअलंकृत हात असतो. तसेच ती शिवाची पूजा करताना दाखवलेली असते.

### कसे जाल? काय पाहाल?

कोल्हापूर ते गगनबावडा अंतर ६० किमी आहे. कोल्हापूरच्या रंकाळा तलावाच्या उजव्या बाजूने कोकणाला करुळ घाटमार्गे जोडणाऱ्या रस्त्याने ४५ कि.मी.वर आसळजचा वीरगळसमूह पाहता येतो. बसथांब्याजवळ अगदी रस्त्यालगत तो आहे. इथूनच रामलिंगच्या एकपाषाणी मंदिरांकडे जाणारा रस्ता आहे. हे अंतर ४ कि.मी आहे. इथून पुन्हा आसळजला हमरस्त्यावर येऊन गगनबाड्याच्या दिशेने ७ कि.मी.वर सांगशी गाव लागते. सांगशीचे स्मारकशिल्प पाहून झाल्यावर पुन्हा हमरस्ता सोडून बोरबेटला जाणारा रस्ता पकडावा. बोरबेट ८ कि.मी.वर आहे. बोरबेटहून मोरजाई डोंगर पायी चढावा लागतो. मोरजाई पठार व गुंफामंदिर पाहून झाल्यावर पुन्हा सांगशीला येऊन ५ कि.मी.वरच्या गगनबावड्याला जावे. येथे गगनगिरी महाराजांचा आश्रम आणि किल्ले गगनगड पाहता येतो. गगनबावड्यात राहण्या-जेवण्याची उत्तम सोय आहे.

यानंतर गगनबावडा जहागिरीचे जहागीरदार व रामचंद्रपंत अमात्यांचे वंशज (स्व.) भय्यासाहेब बावडेकर यांनी तसेच डॉ. एच. एस. रित्ती आणि अ. ब. करवीरकर या शिलास्मारकाचा विशेष अभ्यास केला. या सर्व संशोधकांच्या मतानुसार हे सतीचे नसून राणीचे स्मारक आहे.

या शिलालेखाबाबत सर्वात दुर्दैवाची गोष्ट म्हणजे हे स्मारक उभारणाऱ्या राजाचे नाव शिलाभंगामुळे वाचता येत नाही. शिवाय या लेखात कालनिर्देश केलेला दिसत नाही. परंतु संशोधकांनी अथक प्रयत्नांनी, अनेक अनुमाने मांडून हा राजा म्हणजे बदामीच्या चालुक्य वंशातील पहिला पुलकेशी याचा पराक्रमी पुत्र मंगलेश हाच असावा, असे म्हटले आहे. बदामीचे चालुक्य राजे विष्णुभक्त होते व ते श्रीवल्लभ, श्री पृथ्वीवल्लभ, वराहलांछनस्य अशा


सांगशी शिलालेख

बिरुदावल्या लावीत असत. त्यामुळे शार्दुलविक्रीडित वृत्ताच्या सोयीसाठी वराह लांछनस्य याऐवजी 'पृथ्वीधर लांछनस्य' असा शब्दप्रयोग केला गेला असावा, असे बावडेकर यांचे मत आहे. मंगलेश या पहिल्या पुलकेशीच्या मुलाचे राज्य त्या वेळी या भागावर होते, असे पुरावे आहेत. कारण गगनबावडा परिसर हा राजा मंगलेशाच्या आजोळच्या बटपुरा (बप्पुरा) घराण्याचा होता. पुलकेशीने या भागावर आपला पुत्र मंगलेशाची नेमणूक केली होती, असे उल्लेख आहेत.

## मोरजाई पठारावरील सतीगळ

सांगशी येथील हमरस्त्यावरील चौकातून एक रस्ता दक्षिणेकडे जातो. हा रस्ता कातळी गावावरून बोरबेटला जातो. सांगशी ते बोरबेट हे अंतर ८ किलोमीटर आहे. बोरबेट गावाच्या पश्चिमेला असलेल्या डोंगरावर मोरजाईचे विस्तीर्ण पठार पसरलेले आहे. अतिशय अद्भुत असे हे ऐतिहासिक ठिकाण आहे. बोरबेट गावाजवळ असलेल्या आश्रमशाळेला डाव्या हाताला सोडून एक पायवाट पश्चिमेकडे जाते, ती सरळ या डोंगराच्या पायथ्याशी जाते. येथे एक कमान उभारली असून वर जाण्यासाठी चिरेबंदी पायऱ्या बांधून काढल्या आहेत. साधारण अर्धा तास चढाई करून आपण या पठारावर येतो, तेव्हा त्याची विस्तीर्णता पाहून चकित होऊन जातो.

वर येताच सुरुवातीलाच एकपाषाणी स्तंभद्वार आपले स्वागत करते. दोन उभे दगड आणि त्यावर एक आडवा दगड अशी या स्तंभद्वारांची रचना आहे. अशी तीन स्तंभद्वारे ओलांडून आपण मोरजाईच्या गुंफा मंदिरापाशी पोहोचतो. हे मंदिर पूर्णत: गुहेत असून त्याचे शिखर गुहेच्यावर बांधून काढण्यात आले आहे. या गुंफामंदिरात एकूण ६२ प्रतिमा पाहायला मिळतात. त्यापैकी फक्त दोन वीरगळ असून ४४ सतीगळ आहेत. ९ मूर्तींवर युगुल प्रतिमा कोरल्या आहेत, तर ७ मूर्तींवर एकल प्रतिमा कोरल्या आहेत. मुख्य गुहेजवळच दुसरी एक छोटी गुंफा असून, त्यामध्ये सात सतीगळ आहेत. बाहेरच्या बाजूला तिसरी गुंफा असून त्यामध्ये देवीच्या चार मूर्ती आहेत. अशा प्रकारे एकाच ठिकाणी तब्बल ७३ मूर्ती असून, त्यापैकी ५१ सतीगळ आहेत. एवढ्या मोठ्या संख्येने एकाच ठिकाणी सतीगळ आढळण्याची ही विरळ घटना आहे. एवढे सतीगळ या ठिकाणी असण्याचे एक कारण असू शकते. ते म्हणजे या परिसरातील सती गेलेल्या स्त्रियांची स्मारके असलेले हे सतीगळ नष्ट होऊ नयेत, त्यांचे पावित्र्य भंगू नये, यासाठी ते या पठारावरील गुहेत आणून ठेवले असले पाहिजेत. पुढे केव्हातरी या गुहेत मंदिर तयार करून त्यात मोरजाई देवीची स्थापना करण्यात आली असावी. देवीच्या मूर्तीवरून ती तुलनेत अलीकडची असल्याचे स्पष्ट होते. पठाराच्या पश्चिमेला दगडांचे पाच उंच ढीग आपले लक्ष वेधून घेतात. याशिवाय मंदिराजवळच दोन समाधीही आहेत. बाजूलाच कातळामध्ये खोदून काढलेली एक टाकी आहे. पावसाळ्यात तीमध्ये पाणी साठते. पठारावरून परिसरातील दृश्य अतिशय रमणीय दिसते. प्रत्येकाने एकदा तरी या ठिकाणाला भेट द्यायलाच हवी.

## रामलिंगची एकपाषाणी मंदिरे

आसळजपासून अगदी जवळच रामलिंगची एकपाषाणी मंदिरे गेली कित्येक शतके ऊन, पाऊस, पाण्याचा मारा झेलत उभी आहेत. रामलिंगच्या डोंगरावरून वाहत येणाऱ्या ओढ्यामध्ये ही चालुक्य शैलीचा प्रभाव असलेली एकाच खडकात कोरून काढलेली तीन मंदिरे उभी आहेत. ध्यानमंदिर, यज्ञमंदिर व उपासनामंदिर अशी ही मंदिरे असावीत, असे तज्ज्ञांचे मत आहे. अगदी सुरुवातीलाच दिसणारे, थोडेसे कललेले उपासनामंदिर असावे. त्यामागे काही अंतरावर चार बाजूला खुले असलेले मंदिर आहे, ते यज्ञमंदिर असावे. कारण यज्ञाचा धूर बाहेर जावा, यासाठी चारही बाजू खुल्या ठेवण्यात आल्या आहेत. या मंदिराच्या जरा पुढे ध्यानमंदिर आहे. बाहेरच्या बाजूला छोटी ओवरी असून आत एक छोटी खोली असून ध्यानाला बसण्यासाठी कट्टा खोदलेला आहे.

ही मंदिरे ओढ्याच्या ऐन प्रवाहात खोदलेली असल्याने पावसाळ्यात तेथे पोचणे पाण्याच्या जोरदार प्रवाहामुळे केवळ अशक्य असते. मात्र पावसाळा व नंतरचे एकदोन महिने सोडले तर खडकांवर चढून ही मंदिरे पाहता येतात. यापैकी एकाही मंदिरात मूर्ती नाही.

अशा प्रकारे कोल्हापूरहून फक्त ६० किमीवर असलेल्या गगनबावडा परिसरात आपणाला विविध प्रकारची ऐतिहासिक, पुरातत्त्व ठिकाणे पाहायला मिळतात. स्वत:चे वाहन असेल तर एका दिवसात ही सर्व ठिकाणे पाहून आपण कोल्हापूरला परतू शकतो किंवा गगनबावड्यातही राहण्याची सोय आहे. हवी फक्त जिज्ञासा आणि आपल्या इतिहासाची आवड.

**(लेखक निवृत्त माहिती उपसंचालक असून पुरातत्त्वशास्त्राचे अभ्यासक आहेत. संपर्क : ०९४२२४१३८००)**

### शिवनेरी (पुणे)

छत्रपती शिवाजी महाराज यांचे हे जन्मस्थान. ऐतिहासिक ठिकाणची भटकंती, धाडसी पर्यटन आणि निसर्गाच्या सान्निध्यात फिरस्ती. मराठा साम्राज्याच्या इतिहासात या किल्ल्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे.

**कसे जाल?**

जवळचा विमानतळ व रेल्वे स्थानक पुणे.

### लोहगड विसापूर (पुणे)

लोहगड आणि विसापूर येथील किल्ल्यांना, तेथे घडलेल्या अनेक लष्करी घटनांमुळे मराठ्यांच्या इतिहासामध्ये अतिशय महत्त्वाचे असे स्थान आहे. कोकण आणि पश्चिम घाटाचा परिसर याच्या अचूक सीमारेषेवर हा प्रदेश वसलेला आहे. लोहगडाच्या शेजारीच असलेला विसापूरचा किल्ला त्यावर असणाऱ्या अखंड आणि खूप चांगल्या स्थितीमध्ये असणाऱ्या या तटबंदीसाठी प्रसिद्ध आहे.

**कसे जाल?**

जवळचा विमानतळ पुणे, रेल्वे स्थानक मळवली.

### राजमाची (पुणे)

सह्याद्रीच्या ऐन कड्यावर आणि खोल दरीकंदरांच्या सान्निध्यात पर्वताच्या कुशीत वसलेला राजमाची हा किल्ला, श्रीवर्धन आणि मनरंजन या जुळ्या बालेकिल्ल्यांमुळे पर्यटकांचे अगदी आवडीचे ठिकाण आहे.

ऐन पावसाळ्यामध्ये राजमाचीचा हा सारा परिसर जलधारांनी नखशिखांत न्हाऊन निघतो. असंख्य धबधबे, ओहोळ-निर्झर, हिरवेगार डोंगर, गवताळ पठार असा हा सारा आसमंत निसर्गसौंदर्याने नटलेला असतो.

**कसे जाल?**

जवळचा विमानतळ पुणे, रेल्वे स्थानक लोणावळा

### दौलताबाद (देवगिरी) किल्ला (औरंगाबाद)

शंखाकृती आकाराच्या टेकडीवर वसलेला दौलताबादचा किल्ला इ.स. च्या ११ व्या शतकामध्ये यादव सम्राट भिल्लम पाचवा याने बांधला. दगडामध्ये खोदलेल्या गुंफा आणि दालने, एक सुंदर असे मंदिर, मोठा खंदक, संरक्षक तटबंदी, प्रशस्त राजवाडे, उत्तम अशी स्नानगृहे, निवासी संकुले, बाजार, पायऱ्या असलेली विहीर अशा सगळ्या स्थापत्यगुणांनी समृद्ध असलेल्या किल्ल्याचा आपल्या भटकंतीमध्ये नक्की समावेश करा.

**कसे जाल?**


जवळचा विमानतळ आणि रेल्वे स्थानक औरंगाबाद.

### जंजिरा (रायगड)

राजपुरी खाडीच्या मुखाशी समुद्रामधील खडकाळ बेटावर बांधलेला हा दुर्गम जलदुर्ग जंजिरा स्थापत्याचा एक अजोड नमुना आहे. समुद्राच्या लाटा रात्रंदिवस सतत या किल्ल्याला सर्वबाजूंनी धडका देत असूनही या किल्ल्याची ४० फूट उंचीची बेलाग तटबंदी आजही या माऱ्याला तोंड देत ताठ मानेनं उभी आहे. किल्ल्याचे सगळे

**महाराष्ट्र हा गडकिल्ल्यांचा देश आहे. शतकानुशतके आपल्या जबरदस्त पाषाणी सामर्थ्याने जमीन आणि समुद्रावर दरारा निर्माण करणारे किल्ले हे मराठी साम्राज्याचे फार मोठे आधारस्तंभ होते. महाराष्ट्राची भूमी जवळजवळ ३५० हून अधिक किल्ल्यांनी समृद्ध आहे. भारताच्या कोणत्याही प्रांताला हे एवढे दुर्गवैभव लाभलेले नाही. एकेकाळचे मराठी साम्राज्याचे संरक्षक असलेले हे किल्ले आज आपल्या उज्ज्वल इतिहासाची मूक साक्ष देत अभिमानाने उभे आहेत. यात स्थळ अर्थात भुदुर्ग, जलदुर्ग आणि गिरिदुर्ग असे तिन्ही प्रकार आढळतात.**

# रम्य असे अपुला इतिहास...



मुरुड-जंजिरा



सिंधुदुर्ग किल्ला

## सिंधुदुर्ग किल्ला (सिंधुदुर्ग)

मालवणपासून समुद्रात २ किलोमीटरवर असलेल्या एका खडकाळ बेटावर हा किल्ला छत्रपती शिवाजी महाराजांनी बांधला. याच्या आजूबाजूला समुद्रात इतस्ततः विखुरलेल्या खडकांमुळे या किल्ल्याला नैसर्गिक संरक्षण लाभलेले आहे. या किल्ल्याचे रांगडे सौंदर्य आणि याचे ऐतिहासिक महत्त्व या गोष्टी तर आहेतच, परंतु येथून दिसणारा निसर्गरम्य आसमंत आणि साहसी खेळांचे विविध पर्याय हेसुद्धा पर्यटकांना येथे आकर्षित करतात. सिंधुदुर्गाच्या आसपास समुद्रात सर्जेकोट, राजकोट आणि पदमगड असे अजून काही छोटे किल्ले आहेत.

**कसे जाल?**

जवळची रेल्वे स्थानके: कुडाळ आणि कणकवली.

गोलाकार बुरूज आजही उत्तम स्थितीत आहेत.

किल्ल्याच्या उत्तर दिशेला अजून एक जलदुर्ग दिसतो. हा किल्ला म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांनी बांधलेला पद्मदुर्ग किंवा प्रदुर्ग होय. स्थानिक लोक यालाच कांसा किल्ला असे म्हणतात.

**कसे जाल?**

जवळचा विमानतळ मुंबई, रेल्वे स्थानक रोहा. गेट वे ऑफ इंडियापासून मांडवा बंदरापर्यंत फेरी बोट सेवा उपलब्ध आहे. अलिबागपर्यंत मोटारबोट आणि तिथून पुढे नियमित ये-जा करणारी बस उपलब्ध आहे.

## कोर्लई किल्ला (रायगड)

एका टुमदार बेटावर बांधलेल्या या कोर्लई किल्ल्यावर उभे राहिले की अथांग सागराच्या लाटा अविरतपणे तटबंदीवर धडका देताना दिसतात, आणि सर्वत्र चहूबाजूंना दिसणारी निसर्गाची विविध प्रेक्षणीय रूपे आपल्याला मंत्रमुग्ध करून टाकतात. पोर्तुगिजांनी कोर्लई नावाच्याच गावात बांधलेला हा तटबंदीयुक्त किल्ला रेवदंडा खाडीच्या रक्षणासाठी बांधला होता. तत्कालीन शासकांना एखाद्या प्रदेशावर टेहेळणी करण्यासाठी या अशा किल्ल्यांची किती नितांत गरज होती याची जाणीव या किल्ल्याचे भौगोलिक स्थान पाहून लक्षात येते.

कोर्लई किल्ला हा 'ओ मोर्रो दे चौल' या खडकाळ धारेवर बांधला असून त्याला निजामशाही-पोर्तुगीज पद्धतीची तटबंदी आहे. कोर्लई किल्ल्याला ४ प्रवेशद्वारे आणि ८ बुरूज आहेत. इथली तटबंदी खास वैशिष्ट्यपूर्ण आहे.

**कसे जाल?**

जवळचा विमानतळ मुंबई, रेल्वे स्थानक रोहा.

## प्रतापगड (महाबळेश्वर)

मराठ्यांच्या इतिहासात छत्रपती शिवाजी महाराजांच्या वैभवाची साक्ष असणाऱ्या ३६० किल्ल्यांपैकी प्रतापगडाचे स्थान फार महत्त्वाचे आहे. विजापूरच्या आदिलशहाचा पराक्रमी सरदार अफझलखान याचा त्यांनी प्रतापगडावर केलेला वध हा त्यांच्या व मराठ्यांच्या इतिहासातील निर्णायक क्षण ठरला. या किल्ल्यावरून जावळीचा निसर्गरम्य परिसर फारच रमणीय दिसतो.

पर्वतरांगांनी व खोल दऱ्यांनी वेढलेला प्रतापगड महाबळेश्वर या थंड हवेच्या ठिकाणाजवळ आहे.

**कसे जाल?**

जवळचा विमानतळ पुणे, रेल्वे स्थानक हे वीर दासगाव.

## पन्हाळा किल्ला (कोल्हापूर)

इ.स.१२व्या शतकात कोल्हापूर येथे राज्य करणाऱ्या शिलाहार राजांनी पन्हाळा या किल्ल्याची उभारणी केली.इ.स.च्या १७व्या शतकापासून ते १८व्या शतकापर्यंत हा किल्ला मराठ्यांच्या आधिपत्याखाली राहिला. छत्रपती शिवाजी महाराजांनी या किल्ल्यावर बराच काळ व्यतीत केला होता. हा दुर्ग अनेक राजकीय घडामोडी आणि युद्धांचा साक्षीदार आहे. कोकण व उर्वरित महाराष्ट्र यांना जोडणाऱ्या रस्त्यावरील खिंडीचा नयनरम्य देखावा पन्हाळा येथून फारच छान दिसतो.

## माहुली किल्ला (मुंबई)

ठाणे जिल्ह्यात शहापूर तालुक्यात अनेक सुळके असलेला लांबलचक असा हा डोंगर माहुली नावाने ओळखला जातो. माहुलीचे दोन खोगिरांमुळे तीन भाग पडले आहेत उत्तरेचा पळसगड, मधला माहुलीगड आणि दक्षिणेचा भंडारगड. या तीन गडांमुळे माहुलीचे ठाणे अभेद्य झाले होते. त्यामुळेच निजामशाही वाचवण्यासाठी शहाजी महाराजांनी माहुली गडाचाच आधार घेतला.

## विजयदुर्ग (सिंधुदुर्ग)

विजयदुर्ग हा जलदुर्ग जो सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सर्वात पुरातन किल्ला आहे आणि अगदी बेलाग आहे. तीनही बाजूंनी अरबी समुद्राने वेढलेला हा किल्ला केवळ अजिंक्य होता. शिवाजी महाराजांनी हा किल्ला आदिलशाहकडून १६५३ मध्ये जिंकून घेतला. त्याचे नाव विजयदुर्ग असे ठेवले. मराठा आरमाराचे सरखेल कान्होजी आंग्रे यांचा हा एक मुख्य नाविकतळ होता. या किल्ल्याला २७ बुरूज असून त्यातले तीन बुरूज हे तिमजली आहेत. किल्ल्याला दोन भुयारी मार्ग आहेत.

**कसे जाल ? –** गोव्यामधील दाबोलीम विमानतळ, रेल्वे स्थानक कणकवली.



**कसे जाल ?**

जवळचा विमानतळ आणि रेल्वे स्थानक कोल्हापूर.

## सुवर्णदुर्ग किल्ला (रत्नागिरी)

हर्णे बंदराच्या रक्षणासाठी समुद्रातील बेटावर बांधण्यात आलेला सूवर्णदुर्ग मुख्य किल्ला व त्याचे रक्षण करण्यासाठी बांधण्यात आलेले उपकिल्ले कनकदुर्ग, गोवाकिल्ला व फत्तेगड हे होत. कान्होजींची कारकिर्द याच सुवर्णदुर्गावर चालू झाली.

**कसे जाल ?**

मुंबईहून दापोलीमार्गे १५ किमीवरील मुरुड हर्णेला जाता येते. हर्णे किनाऱ्यावरून किल्ल्यावर जाण्यासाठी होड्या मिळतात, जवळचे रेल्वे स्थानक खेड आहे.

## वसई किल्ला (मुंबई)

मुंबई जवळील साष्टी म्हणजे 'सहासष्टी' नावाचा प्रदेश होता. त्यावर लक्ष ठेवण्यासाठी भौगोलिकदृष्ट्या वसईचा किल्ला फार महत्त्वाचा होता.

**कसे जाल ?**

जवळचा विमानतळ छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ, रेल्वे स्थानक वसई, विरार.

## अर्नाळा किल्ला (मुंबई)

चारही बाजूंनी पाण्याने वेढलेला अर्नाळा नावाच्या लहानशा बेटाच्या वायव्य दिशेस हा जलदुर्ग बांधला आहे. उत्तर कोकणातील वैतरणा नदी या किल्ल्याजवळ समुद्राला मिळत असल्यामुळे खाडीच्या सर्वच प्रदेशावर या जलदुर्गावरून नजर ठेवता येत असे.

**कसे जाल ?**

जवळचा छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ, उपनगरीय रेल्वे सेवेचे विरार रेल्वे स्थानक.

## सायनचा किल्ला (मुंबई)

माहीम खाडीच्या पूर्वेकडील मुखावरील टेकडीवर इंग्रजांनी शीवचा किल्ला बांधला. सायन किल्ल्याच्या पायथ्याशी जवाहरलाल नेहरू उद्यान आहे. किल्ल्याच्या मध्यभागी असलेल्या बुरुजावरून माहीमची खाडी व आजूबाजूच्या विस्तृत प्रदेशाचे दृश्य दिसते.

**कसे जाल ?**

जवळचा विमानतळ छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ, रेल्वे स्थानक सायन (शीव).

## रायगड किल्ला (रायगड)

समुद्रसपाटीपासून ८२० मीटर उंच महाड तालुक्यामध्ये वसलेला रायगड किल्ला पर्यटकांचे लाडके ठिकाण तर आहेच, परंतु हा आपल्या दुर्गमतेमुळे गिर्यारोहकांचे देखील आकर्षण ठरलेला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक याच रायगड किल्ल्यावर झाला.

रायगडचा नैसर्गिक आकार, त्याचे ताशीव कडे, त्याची दुर्गमता, ज्यामुळे शत्रूला आक्रमण करणे आणि किल्ला जिंकून घेणे केवळ अशक्यप्राय होते. म्हणूनच

राजांच्या मनात राजधानीसाठी हाच किल्ला भरला. दगडी बांधणीची धान्य साठवण्याची कोठारे, रत्नशाळा, एकाच रांगेत असलेली ४३ स्थापत्यरचनेची नगरपेठ या आणि अशा विविध गोष्टींची निर्मिती रायगडवर केली गेली. किल्ल्यावर एक भाग हिरकणी बुरूज नावाने प्रसिद्ध आहे. किल्ल्याच्या पायथ्याशी एक नैसर्गिक गुंफा असून, त्याचे नाव 'वाघबीळ' असे आहे. या गुहेमध्ये आदिमानवाची दगडी हत्यारे सापडल्यामुळे तिचा संबंध पुरातत्त्वीयदृष्ट्या थेट पाषाणयुगापर्यंत जातो.

**कसे जाल?**

जवळचा विमानतळ मुंबई, रेल्वे स्थानक वीर.

## तळगड (रायगड)

रोह्याच्या आजूबाजूला पसरलेल्या डोंगररांगावर तळगड हा किल्ला कुंडलिका नदी समुद्राला जेथे मिळते त्या मांदाड खाडीवर नजर ठेवण्यासाठी बांधण्यात आला होता.

इ.स.१६४८ मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी तळगड आदिलशहाकडून जिंकून घेतला. पुरंदरच्या तहामध्ये महाराजांनी १२ किल्ले स्वत:कडे ठेवले. त्यामध्ये तळगड हा एक होता. यावरूनच या किल्ल्याचे महत्त्व आपणास समजते.

## अवचितगड (रायगड)

कुंडलिका नदीच्या तीरावर रोहा गावाच्या आजूबाजूला पसरलेल्या डोंगररांगांमध्ये गर्द रानाने वेढलेला अवचितगड पाहणे हा एक रम्य अनुभव ठरतो. सर्व बाजूंनी तटांनी आणि बुरुजांनी वेढलेला हा किल्ला कुंडलिका नदीच्या (खाडीच्या) संरक्षणाच्या दृष्टीने महत्त्वाचा होता. पावसाळ्यानंतरचे येथील निसर्गसौंदर्य पाहण्यासारखे असते.

## घोसाळगड (रायगड)

रोहा शहराजवळ, अवचितगड व घोसाळगड हे किल्ले आहेत. घोसाळगड हा किल्ला डोंगरावर वसलेला आहे. शिवपूर्वकाळात अस्तित्वात असलेला हा किल्ला ताम्हण घाटमार्गे होणाऱ्या व्यापारावर लक्ष ठेवण्यासाठी बांधला असावा. जंजिरा, तळगड, घोसाळगड, ताम्हणघाट, घनगड असा तो व्यापारी मार्ग होता. या मार्गे कोकणातील बंदरावर उतरणारा माल घाटमाथ्यावर नेला जात असे. छत्रपती शिवाजी महाराजांनी हा गड जिंकून घेतल्यावर त्याचे नाव बदलून 'वीरगड' असे ठेवले. पुरंदरच्या तहामध्ये शिवरायांनी जे १२ किल्ले स्वत:कडे ठेवले त्यात 'घोसाळगड' हा किल्ला होता. त्यावरून या गडाचे तत्कालीन महत्व लक्षात येते.

**कसे जाल?**

मुंबईहून रोह्याला जावे. रोहा - भालगाव - मुरुड असा रस्ता आहे. या रस्त्यावर रोह्यापासून १० कि.मीवर घोसाळे हे किल्ल्याच्या पायथ्याचे गाव आहे.

## नरनाळा (अमरावती)

डोंगरी किल्ला आणि त्याच्या सभोवताली सर्वत्र मोठ्या प्रमाणावर वन्यजीवन या दोन्ही गोष्टी येथे पाहायला मिळतात. अकोल्याजवळ समुद्रसपाटीपासून ९४० मीटर उंचीवर. ऐतिहासिक पुराव्यांनुसार हा किल्ला गोंड राजांनी बांधल्याचे समजते. या किल्ल्याचे जलव्यवस्थापन फारच उच्चकोटीचे आहे. यामध्ये बंधारे, तलाव आणि जलाशय यांचा मोठा वापर केलेला आढळतो. अभयारण्यात जाण्यासाठी शहानूर हे प्रवेशद्वार ७ कि.मी. अंतरावर आहे

**कसे जाल?**

जवळचा विमानतळ नागपूर, रेल्वे स्थानक अकोला.

# राज्य संरक्षित किल्ले

## परांडा (सोलापूर)

महाराष्ट्राच्या उस्मानाबाद जिल्ह्यात सीना आणि दुधना नद्यांचा खोऱ्यात असलेल्या परांडा किल्ला शस्त्रास्त्रांचे कोठार म्हणूनच वापरला गेला असावा. परांडा किल्ला म्हणजे भूदुर्ग किंवा जमिनीवरील किल्ल्याचे एक अप्रतिम उदाहरण आहे.
हा किल्ला एक मोठ्या खंदकाने वेढलेला आहे.

मध्ययुगीन स्थापत्यकलेचा एक अजोड नमुना म्हणून परांडा किल्ल्याकडे पाहावे लागेल. येथे काही तोफा आणि जवळजवळ ३०० तोफगोळे यांचे जतन करून ठेवले आहे.

**कसे जाल?**

रेल्वे स्थानक कुर्डुवाडी, बार्शी.

## सिंहगड (पुणे)

पुण्यापासून नैऋत्येला सह्याद्रीच्या भुलेश्वर रांगेमधील एका सुट्ट्या झालेल्या उंच डोंगरावर समुद्रसपाटीपासून १३१२ मीटर उंचीवर हा किल्ला बांधलेला आहे. किल्ल्याची प्रचंड उंची आणि सरळ ताशीव कडे यामुळे किल्ल्याला एक प्रकारचे नैसर्गिक संरक्षण लाभलेले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील एक महत्त्वाचे लष्करी ठाणे अशी सिंहगडची ओळख होती. याचे मूळ नाव कोंढाणा असे असून अनेक ऐतिहासिक लढाया या किल्ल्यावर झालेल्या आहेत.

झुंजार शिलेदार तानाजी मालुसरे सिंहगडचा एक बेलाग कडा यशवंती नावाच्या घोरपडीच्या मदतीने चढून गेला, दुर्दैवाने या किल्ल्यावरील लढाईत तानाजीला आपले प्राण गमवावे लागले. तानाजीच्या मृत्यूच्या बातमीने शिवाजी महाराजांना अपार दु:ख झाले आणि ते म्हणाले की, 'गड आला पण माझा सिंह गेला,' आणि त्यानंतर या किल्ल्याचे नाव सिंहगड असे पडले.

किल्ल्यावरून दिसणारा आजूबाजूचा रमणीय परिसर, सह्याद्रीच्या रांगा हे तर येथे येण्यामागचे आकर्षण आहे.

**कसे जाल?**

जवळचा विमानतळ पुणे, रेल्वे स्थानक पुणे.

## राजगड (पुणे)

जिंकण्यास अत्यंत कठिण, दुर्गम आणि अभेद्य समजला जाणारा राजगड नीरा, येळवंडी, गुंजवणी आणि कानंद या नद्यांच्या खोऱ्यात समुद्रसपाटीपासून सुमारे १३९५ मी. उंचीवर वसला आहे. याला पूर्वी मुरुंबदेवाचा डोंगर म्हणून ओळखत असत. राजगडावर महाराजांनी आपल्या जीवनातील सुमारे २४ वर्षे वास्तव्य केले. स्वराज्याच्या पहिल्या राजधानीचा मान राजगडला मिळाला.

वैशिष्ट्यपूर्ण दुर्गस्थापत्याचा नमुना म्हणून राजगड ओळखला जातो. गडाला संजीवनी, सुवेळा आणि पद्मावती अशा तीन माच्या आहेत. संरक्षणाच्या दृष्टिकोनातून गडाच्या सर्वोच्च शिखरावर बालेकिल्ल्याची रचना केली आहे. राजधानीचे ठिकाण असल्याने पिण्याच्या पाण्याचा वर्षभर मुबलक पुरवठा होईल अशी सोय गडावर करण्यात आली आहे. आजही गडावर येणाऱ्या पर्यटकांना, गिर्यारोहकांना तेथे असणाऱ्या दोन मोठ्या पाण्याच्या टाक्या स्वच्छ पाणी पुरवतात.

महाराजांचे जीवन अनेक ऐतिहासिक,रोमांचक व थरारक घटनांनी, प्रसंगांनी भरलेले होते. राजगड ह्या घटनांचा मूक साक्षीदार आहे. राजगडावरून दिसणाऱ्या नयनरम्य सृष्टिसौंदर्यामुळे आणि सह्याद्रीच्या रांगांच्या होणारया भव्य, विहंगम दर्शनामुळे अनेक पर्यटक आणि गिर्यारोहकांचे राजगड हे आवडीचे ठिकाण आहे

### कसे जाल ?

जवळचा विमानतळ व रेल्वे स्थानक पुणे

## विशाळगड (कोल्हापूर)

देश आणि कोकण यांना जोडणाऱ्या आंबा घाटाजवळ, कोल्हापूर जिल्ह्यातील शाहूवाडी तालुक्यामध्ये असलेला विशाळगड सह्याद्रीच्या मुख्य रांगेला लागूनच समुद्रसपाटीपासून १०२१ मीटर उंचीवर आहे. शिवकालीन इतिहासामधे विशाळगडाला महत्त्वाचे स्थान मिळालेले आहे. विशाळगड हा खेळणा, खिलगिला, खिलकिला, सक्करलाना अशा वेगवेगळ्या नावाने ओळखला जातो. विस्तृतमाथा असलेला विशाळगड सह्याद्रीच्या पाताळवेरी दऱ्यांनी वेढलेला असल्यामुळे बेलाग झालेला आहे.

### कसे जाल ?

जवळचा विमानतळ व रेल्वे स्थानक कोल्हापूर.

## तोरणा किल्ला (पुणे)



पुणे जिल्ह्याच्या वेल्हा तालुक्यातून असलेल्या सह्याद्रीच्या रांगेत तोरणा वसलेला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी सुरुवातीच्या काळात जे काही किल्ले घेतले. त्यापैकी एक किल्ला तोरणा. गडावर तोरण जातीची पुष्कळ झाडी असल्यामुळे गडाचे नाव तोरणा पडले. महाराजांनी गडाची पाहाणी करताना याच्या प्रचंड विस्तारामुळे याचे 'प्रचंडगड' असे नाव ठेवले.

पुरंदरच्या तहात जे किल्ले मोगलांना दिले. त्यामध्ये तोरणा महारजांकडेच राहिला. विशेष म्हणजे औरंगजेब बादशहाने लढाई करून जिंकलेला असा हा मराठ्यांचा एकमेव किल्ला होय.

### कसे जाल ?

**जवळचा विमानतळ आणि रेल्वे स्थानक पुणे.**

## नगरधन (नागपूर)

नागपूरपासून ५० किमी अंतरावर व रामटेकपासून ७ किमी अंतरावर नगरधन नावाचा सुंदर भुईकोट किल्ला आहे. पेशव्यांच्या काळात नागपूरकर भोसल्यांनी या किल्ल्याची डागडुजी करून नवीन बांधकामे केली

### कसे जाल ?

नागपूर ते रामटेक एसटीची बससेवा आहे. रामटेक गावातून उजव्या हाताचा रस्ता ७ किमीवरील नगरधन गावात जातो.

## वरळी किल्ला (मुंबई)

मुंबईच्या वरळी बेटाच्या भूशिरावर असलेल्या छोट्याशा टेकडीवर इंग्रजांनी 'वरळीचा किल्ला' बांधला. या किल्ल्याचा उपयोग समुद्रीमार्गाने होणाऱ्या व्यापारावर लक्ष ठेवण्यासाठी व संरक्षणासाठी केला गेला. छोट्या दरवाज्याने किल्ल्यात प्रवेश केल्यावर त्या दरवाज्याच्या माथ्यावर घंटा बांधायचा छोटा टॉवर आहे. किल्ल्यात पाण्याची विहीर असून, त्याच्या बाजूला अलीकडे बांधलेले छोटे मंदिर व व्यायामशाळा आहे.

### कसे जाल ?

छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस हे जवळचे रेल्वे स्थानक आहे.

## पारोळा किल्ला (धुळे)

१७ व्या शतकाच्या उत्तरार्धात पारोळा हा जळगाव जिल्ह्यातील सर्वात सुंदर व मोठा भुईकोट आहे. १५७.५ मीटर लांब व १३०.५ मीटर रुंद असलेला हा किल्ला जहागिरदार हरी सदाशिव दामोदर याने इ.स १७२७ मध्ये बांधला. इ.स १८५७ च्या उठावात झाशीच्या राणीला मदत केलेच्या आरोपावरून इंग्रजांनी जहागिरदारांची सर्व संपत्ती जप्त केली.

### कसे जाल ?

पारोळा हे जळगाव जिल्ह्यातील



## कंधार किल्ला (नांदेड)

नांदेडपासून ५५ किलोमीटर अंतरावर मन्याड नदीच्या काठावर बांधलेला कंधार किल्ला लष्करी डावपेचांच्या दृष्टिकोनातून बांधलेला असून त्याची तटबंदी आजही शाबूत आहे.

उत्तर. दक्षिण व पश्चिम अशा तीन दिशांना निसर्गतः असणाऱ्या टेकड्या आणि पूर्वेला वाहणारी नदी हे किल्ल्याचे खरे सौंदर्य आहे. त्यामुळेच किल्ल्याला आपोआप नैसर्गिक संरक्षण मिळाले आहे.येथील जिंसी व मछली ह्या दरवाज्यांना पूर्वी शत्रूला चकवण्यासाठी फसव्या भिंती होत्या.

**कसे जाल?**

जवळचे रेल्वे स्थानक नांदेड.

महत्त्वाचे शहर रस्त्याने देशाशी जोडलेल आहे.

## शिरगावचा किल्ला (पालघर)

पालघर गावापासून ५ किमी वर शिरगाव हे निसर्गरम्य गाव आहे. या गावात मुख्य रस्त्याला लागून शिरगावचा किल्ला अतिशय दिमाखाने उभा आहे. पश्चिमेकडे समुद्र व तीन बाजूला जमीन असलेला हा किल्ला आजही सुस्थितीत उभा आहे. किल्ल्याचे सर्व भाग, बुरूज, तटबंदी, फांजी, जंग्या, जिने, कोठ्या, हौद इत्यादी एकाच ठिकाणी या शिरगावाच्या दुर्गात पाहता येतात. याशिवाय इतर किल्ल्यांवर न आढळणारे टेहळणीचे मनोरे व रावणमाड नावाचे दुर्मीळ झाड हे या किल्ल्याचे प्रमुख आकर्षण आहे.

**कसे जाल? – रेल्वेने पालघरला.**

## नळदुर्ग (सोलापूर)

नळदुर्ग हा महाराष्ट्रातील भूदुर्गांमधील सर्वात मोठा किल्ला आहे. या किल्ल्याची तटबंदी जवळजवळ ३ किमी लांब आहे. या तटबंदीमध्ये ११४ बुरूज आहेत. या किल्ल्यातील सर्वात आकर्षक वास्तू म्हणजे 'पाणीमहाल'. पावसाळ्यात बोरी नदीचे पाणी या पाणीमहालाच्या वरतून पडते, तेव्हा महालाच्या गवाक्षात उभे राहून समोरचा पाण्याचा पडदा पाहताना एक वेगळीच मजा येते.

**कसे जाल?**

सोलापूरपासून नळदुर्ग हा ५० किमी, तुळजापूरपासून ३५ किमी अंतरावर, तर उस्मानाबादपासून ५० किमी अंतरावर आहे.

## शिवडी किल्ला (मुंबई)

मुंबई शहरात सध्या सर्वात चांगल्या अवस्थेत असलेल्या शिवडीचा किल्ला. किल्ल्याकडे जाण्यासाठी गर्द झाडीतून जाणारा पायऱ्यांचा मार्ग आहे. किल्ल्याच्या काटकोनात वळणाऱ्या प्रवेशद्वाराने आत गेल्यावर अर्धवर्तुळाकार छताच्या दोन लांबलचक इमारती दिसतात. ह्याच इमारतींचा वापर तुरुंग व त्यानंतर गोडावून म्हणून केला गेला. किल्ल्याच्या चारीबाजूंना असणारी तटबंदी अजून शाबूत आहे. किल्ल्याचे वैशिष्ट्य म्हणजे त्रिकोणाकृती बुरूज येथे पाहायला मिळतात.

**कसे जाल?**

छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि छत्रपती शिवाजी टर्मिनस हे जवळचे रेल्वे स्थानक आहे.

## माहीमचा किल्ला (मुंबई)

मुंबईत असलेल्या किल्ल्यामध्ये सर्वात पुरातन किल्ला म्हणजे माहीमचा किल्ला होय. मुंबईच्या पूर्व-पश्चिम किनाऱ्यांना जोडणाऱ्या व माहीमच्या खाडीचे रक्षण करणाऱ्या या किल्ल्याला जलमार्गाचा द्वाररक्षक म्हणून ओळखले जात असे.

## भुदरगड (कोल्हापूर)

भुदरगड हा अजूनही चांगल्या स्थितीत असलेला गड, शिलाहार राजा भोज (दुसरा) यांने बांधला होता. गडाची उत्तर तटबंदी उत्तम स्थितीत आहे. तटातील दगडी जिन्याने तटावर चढले असता, आपणास गडपायथ्याच्या पेठ शिवापूर गावचे सुंदर दर्शन होते.

**कसे जाल?**

कोल्हापूर हे जवळचे रेल्वे स्थानक आहे.

### बाणकोट किल्ला (रत्नागिरी)

महाबळेश्वरी उगम पावणारी सावित्री नदी अरबी समुद्राला जिथे मिळते, त्या बाणकोट खाडीचे रक्षण करत बाणकोटचा किल्ला शतकानुशतके उभा आहे. अनेक राजवटी पाहिलेला बाणकोटचा किल्ला हिम्मतगड आणि फोर्ट व्हिक्टोरिया या नावांनीही ओळखला जातो.

**कसे जाल?**

जवळचे रेल्वे स्थानक रत्नागिरी.

### उंदेरी (रायगड)

थळ जवळील खांदेरी बेट व खुबलढा किल्ला (थळचा किल्ला) यांच्या दरम्यान उंदेरी बेटावर दक्षिणोत्तर पसरलेला आहे. पावसाळी पाणी साठवण्यासाठी ३ हौद आहेत. त्यापैकी तिसऱ्या हौदात उतरण्यासाठी कमान व पायऱ्या आहेत. हौदांच्या पुढे राजवाड्याचे अवशेष आहेत.

**कसे जाल? – जवळचा विमानतळ पुणे, रेल्वे स्थानक पेण.**

### भरतगड किल्ला (सिंधुदुर्ग)

मालवण तालुक्यातील कालावल खाडीच्या दक्षिण व उत्तर काठावर भरतगड व भगवंतगड हे दोन किल्ले उभे आहेत. भरतगड मसुरे गावातील टेकडीवर उभा आहे. गडावर जाण्यासाठी चिरेबंदी पायऱ्या बांधलेल्या आहेत.

**कसे जाल?**

जवळचा विमानतळ पुणे, रेल्वे स्थानक कुडाळ.

### साल्हेर किल्ला (नाशिक)

गडकिल्ल्यांमध्ये सर्वाधिक उंचीचा मान साल्हेर किल्ल्याचा आहे. साल्हेर गडाचा घेरा साधारणपणे ११ किमी असून व्यापलेले क्षेत्र ६०० हेक्टर आहे. हा गड डांग - गुजरात आणि बागलाण यांना जोडणाऱ्या व्यापारी मार्गावर असल्याने संरक्षणदृष्ट्या महत्त्वाचा होता.

साल्हेर गड हा परशुरामाची तपोभूमी म्हणून प्रसिद्ध आहे. साल्हेर जिंकल्यावर त्यासमोरील मुल्हेर किल्ला मराठ्यांनी जिंकला आणि संपूर्ण बागलाण प्रांतावर त्यांनी आपली मजबूत पकड बसवली.

**कसे जाल?**

साल्हेरला जाण्यासाठी नाशिक - सटाणामार्गे ताहराबाद गाठावे. गुजरातमधून यायचे झाल्यास डांग जिल्ह्यातून ताहराबादला जाण्यास रस्ता आहे.



### बांद्र्याचा किल्ला (मुंबई)

साष्टी बेटाच्या समुद्रात शिरलेल्या भूशिरावर पोर्तुगिजांनी बांद्र्याचा किल्ला बांधून या भागाच्या रक्षणाचा कायमचा बंदोबस्त केला. किल्ल्याच्या प्रवेशद्वारावर पोर्तुगीज शिलालेख कोरलेला आहे. प्रवेशद्वारापासून किल्ल्यात जाण्यासाठी पायऱ्या आहेत. किल्ल्यात बाग तयार केली आहे.

### लळिंग (धुळे)

लळिंग किल्ला हा धुळे - मालेगाव रस्त्यावर धुळ्यापासून ८ किमी अंतरावर आहे.

### कोरीगड (पुणे)

लोणावळा आणि पाली यांच्यामध्ये असणाऱ्या सव्वाष्णी घाटाच्या माथ्यावर कोरीगड आहे. हा किल्ला प्रसिद्ध आहे, तो त्याच्या सद्य:स्थितीत असलेल्या अखंड तटबंदीमुळे. या किल्ल्याला कोरीगड, कोराईगड या नावाने ही ओळखतात. तर या गडाच्या पायथ्याशी असलेल्या पेठ शहापूर या गावामुळे या किल्ल्याला शहागड या नावानेही ओळखतात. या कोरीगड, घनगड, सुधागड आणि सरसगड यासारखा सुंदर ट्रेकही या भागात आपल्याला करता येतो. सद्य:स्थितीला गडावर जाण्यासाठी दोन वाटा अस्तित्वात आहेत. तेव्हा अशा सुंदरमय कोरीगडला अवश्य भेट द्या.

### वेताळवाडी गड (औरंगाबाद)

औरंगाबाद जिल्ह्यातील सोयगाव तालुक्यात वेताळगड ऊर्फ वसईचा किल्ला या नावाचा सुंदर किल्ला आहे. या किल्ल्याची भव्य तटबंदी, बुरूज व यावरील इमारती आजही शाबूत आहेत. वेताळगडजवळच्या डोंगरात असलेली रुद्रेश्वर लेणीही पाहण्यासारखी आहेत.

**कसे जाल?**

जवळचे रेल्वे स्थानक औरंगाबाद.


भाऊ दाजी लाड वस्तूसंग्रहालय, मुंबई

**'पर्यटन आणि संग्रहालय' या दोन बाबी म्हणजे आनंद-ज्ञान आणि जिज्ञासारूपी नाण्याच्या दोन बाजू ठरतात.. 'पर्यटना'चा जवळपास पूर्ण भार हा आताच्या निरीक्षणांनुसार 'संग्रहालयांवर' अवलंबून आहे, आजच्या सर्वच प्रकारच्या जागतिक पर्यटनात संग्रहालयाला भेट दिली जाते. ही संग्रहालये पर्यटकांना वेगळी अनुभूती देत असतात.**

# वेगळी अनुभूती

**गजानन शेपाळ**

मनाला जर तणावरहित ठेवायचं असेल आणि जर त्यामुळे शरिरप्रकृती सुदृढ बनणार असेल तर निसर्गाच्या सान्निध्यात अधिकाधिक राहायला पाहिजे असं सर्वच प्रकारच्या वैद्यकीय शाखा आणि पॅथी सांगतात. मोकळी हवा, निर्सगाचा सहवास आणि नैसर्गिक आहार-विहार घेता आला तर, दीर्घायुषी व्हायला कुणी सांगायला पाहिजे असं काही नसतं, ती व्यक्ती दीर्घायुष्यासह सुदृढ आणि ठणठणीतच राहते.

आपल्या ध्यानात येईल की, शहरी वातावरणाच्या तुलनेने ग्रामीण वातावरणांत राहणाऱ्या व्यक्ती या अधिक काटक, अधिक सुदृढ आणि अधिक निरोगी असतात. ही निरीक्षणे अनेक ठिकाणी नोंदवलेलीही आहेत. ही प्रस्तावना एवढ्याचसाठी की, 'पर्यटन' वा आपण राहतो त्याऐवजी हवापालट म्हणून जेव्हा आपण दुसऱ्या परिसरांत जाऊन पून्हा मूळ जागी येतो, तेव्हा आपण पूर्वीच्या तुलनेने अधिक ताजेतवाने होतो, उत्साही बनतो. याच भावनेतून जगात सर्वप्रथम 'चीन' या राष्ट्राने जगभर पर्यटने केली. अनेक व्यक्ती ज्या, चिनी वंशाच्या आढळतील त्यांनी लिहून ठेवलेली 'प्रवास वर्णने' ही त्या त्या राष्ट्रांच्या 'लिखित इतिहासाची संदर्भ ठरली.

'पर्यटन' त्यानंतर 'प्रवास वर्णन' त्यानंतर 'संदर्भ लिखाण' आणि नंतर 'अभ्यास वा अध्ययन' अशा क्रमाने 'पर्यटन' हा विषय, अनेक वर्षांपूर्वी जीवन जगण्याचा एक प्रभावी स्थायिभाव या भावनेने स्वीकारला गेला. अगदी आपल्याच भारत देशात, आपल्याच महाराष्ट्रात आणि आपल्याच 'वाशिम' या शहराच्या प्राचीन इतिहासाच्या नोंदींमध्ये 'वत्स्यगुल्म' अर्थात 'वाशिम' असा उल्लेख असून, इ.स. पूर्व ३ च्यादरम्यान भारतातून जे पर्यटन व्हायचे उल्लेख आहेत त्यात 'वत्स्यगुल्म' अर्थात वाशिमच्या 'जयवर्मन' या तरुणाने पर्यटन करून बालीबेटांवरील नागवंशाच्या 'सोमा' या राणीशी (तिच्या मर्जीनेच) विवाह केला. वाशिमचा जयवर्मन हा बालीबेटाचा 'राजा' झाला... 'पर्यटना'मुळे (असंच मृणा ना....).

सर्वसाधारणपणे पूर्वीच्या संदर्भानुसार पर्यटन हे एकंदर चार स्तरांतील लोक करायचे.

■ **व्यापारी :** त्यांचा माल विकणे वा नवीन माल खरेदी करणे. ■ **ब्राह्मण व भिख्खू :** धर्म प्रचारासाठी. ■ **सैनिक वा रक्षणकर्ते :** व्यापारी लोक अतिक्रमणांना शह देण्यासाठी म्हणून त्यांची शिपाई फौज बरोबर बाळगायचे ■ **हौशी तरुण :** वरील तीनही उद्देश नसलेले मात्र मैत्रीला पोषक असलेले अनेक हौशी तरुणदेखील या व्यापाऱ्यांबरोबर पर्यटनाला जायचे (वर उल्लेख केलेला जयवर्मन हा याच प्रकारचा पर्यटक)

एका विशिष्ट विषयाला वाहिलेल्या वस्तूंचा सुव्यवस्थित संग्रह आणि त्या संग्रहाची प्रदर्शनी मूल्ये जपणारी मांडणी अर्थात आशयगर्भ रचनात्मक प्रदर्शन करणारी संस्था म्हणजे 'म्युझियम' वा 'संग्रहालय' होय. महाराष्ट्रात, भारतात आणि विदेशात अशा प्रकारची अनेक संग्रहालये आहेत की, ज्यांना आधुनिक पर्यटनाचा दर्जा प्राप्त झालेला आहे. मग ही संग्रहालये बंदिस्त असो वा निसर्गाच्या

सान्निध्यात बसवलेली असो. ती आजच्या पर्यटनाचा केंद्रबिंदू बनलेली दिसतात.

या संग्रहालयातील वस्तु या विशिष्ट कारणांसाठीच प्रदर्शित केलेल्या असतात आणि ती कारणे सर्वसामान्य नसतात. मग त्या वस्तूंना ऐतिहासिक वारसा असतो, परंपरा असते, त्या वस्तू निर्माणकाळाची पुरातन सांस्कृतिक पार्श्वभूमी असते. अशा नानाविध वस्तू, एकत्रित सुसंबद्ध रचनाविष्कारासह पूर्ण काळजी घेऊन मांडलेल्या असतात.

आता तर अनेक संग्रहालये, अनेक कलादालने ही रचनात्मक अध्ययनासाठी तसेच संशोधनपर अभ्यासासाठी, शिक्षणक्रमाचा महत्त्वाचा दुवा ठरलेली पाहायला मिळतात. काही संग्रहालये तर समाजशिक्षणासाठी निर्माण करण्यात आलेल्या रचना आहेत. ज्ञानात भर, दृष्टीची व्यापकता आणि माहिती संग्रह वाढवणे या त्रिसूत्रींमुळे अनेक संग्रहालये वा कलादालने 'अभ्यासकेंद्रे' बनलेली आहेत. म्हणून अशा अभ्यासकेंद्रांना ध्यानात घ्यायला पाहिजे की, 'म्युझियम पर्यटन ' हा एक अत्यंत महत्त्वाचा, जिज्ञासा वाढवणारा आणि संशोधनासाठीचा महत्त्वाचा दुवा ठरलेला आहे.

जगात युरोपियन राष्ट्रांनी तर या विषयाला अनन्यसाधारण महत्त्व दिले आहे. आपण आपल्या महाराष्ट्र राज्याचाच विचार केला, तर महाराष्ट्रात विविध प्रकारची म्युझियम्स व कलादालने आहेत. शासकीय आणि खासगी स्तरावरील अनेक संग्रहालये ही 'पर्यटना'ची आयकॉन्स बनलेली आहेत.

## संग्रहालयाचा उगम

संग्रहालयाचा उगम कसा झाला? हे पाहणे ही माहिती पूर्ण ठरेल.. इ.स.पूर्व २८० या कालावधीत पहिल्या टोलेमीने, इजिप्तमधील अनेक्झांड्रिया या शहरात पहिले वस्तूसंग्रहालय स्थापन केले. मूळ संग्रहालयाची कल्पना जरी ग्रीस देशात उदयास आली असे बोलले जात असले, उपलब्ध पुराव्यांधारे तरी आपल्या भारतदेशातही संग्रहालयांसंदर्भात संशोधन सुरू आहे. वीरपुरूषांचे पुतळे, शूर संस्थानिक, पंडित आदी व्यक्तींचे पुतळे, शल्यक्रियेची उपकरणे, विविध ग्रंथ, नैसर्गिक मात्र चमत्कारिक वस्तू, प्राण्याचे सांगाडे पशुपक्षी अशा विविध विषयांची संग्रहालये तेव्हापासूनच गर्दी खेचत होती, पुढे वैयक्तिक वा खासगी स्वरूपांची संग्रहालयेदेखील वाढत गेली, संग्रहालय ही वास्तुपर्यटनाची एक मनोरंजन करणारी वास्तू अशा ओळखीने प्रचारात आली.

भारतातील पहिले अद्ययावत संग्रहालय दोन शास्त्रज्ञांच्या पुढाकाराने स्थापन झाले. डॉ. वॉलिस आणि डॅनिश या शास्त्रज्ञांची मूळ कल्पना होती. पुढे १८५० साली मद्रासमध्ये दुसरे अद्ययावत मुझियम सुरू झाले. इ.स. १८८७ मध्ये व्हिक्टोरिया कारकिर्दीचा अर्धशतसांवत्सरिक उत्सव झाला. त्या वेळी मुंबईसह इतरही ठिकाणी संग्रहालय सुरू करण्यात आले.

पुढे पुढे संग्रहालयांचे पुढीलप्रमाणे प्रकार पडले गेले. इतिहास संग्रहालय, उत्क्रांती इतिहास संग्रहालय, सजीव संग्रहालय (मिश्र), विशेष संग्रहालय, पक्षिसंग्रहालय, प्राणिसंग्रहालय, फुलपाखरांचे संग्रहालय, शस्त्र संग्रहालय, समुद्रीजीव संग्रहालय, शीळा संग्रहालय (दगड), विविध अभयारण्ये आणि स्वैर प्राणी संग्रहालय, वनस्पती संग्रहालय, आंतरजालावरील संग्रहालय.



**छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय, मुंबई येथील प्राचीन मूर्ती.**

## संग्रहालयांना भेटी

चाळीसगावचे जगप्रसिद्ध छायाचित्रकार केकी मूस यांच्या छायाचित्राचे (म्हणजे त्यांनी छायाचित्रकार केलेल्या टेबल टॉप्सचे) चाळीसगावलाच संग्रहालय आहे. तर अलिबागजवळ जगप्रसिद्ध शिल्पकार करमकर यांचे त्यांचे निवासातच सासवणे येथे शिल्प प्रदर्शन संग्रहालय आहे.

मुंबईहून पुण्याला जाताना लोणवळ्याला लंडनच्या धर्तीवर मेणाचे हुबेहूब पुतळे बनवून संग्रहालय बनवले आहे. तर प्रधान डाक कार्यालय, फोर्ट, मुंबई येथे पोस्टाच्या तिकिटांचे अत्यंत अभ्यासपूर्ण असे संग्रहालय आहे. पनवेल पेण रस्त्यावरील कर्नाळा-पक्षी अभयारण्य असो की, डहाणूचे प्राणिसंग्रहालय आहे. मुंबईच्या जे.जे. कला महाविद्यालयातून निवृत्त झालेल्या दिवंगत प्राध्यापक अरविंद नागवेकर यांनी तर त्यांच्या ३४ वर्षाच्या सेवेत जगभरातील सुमारे २०० (दोनशे) राष्ट्रांची चलने, नाणी इ. जमाकरून सुंदर संग्रहालय बनवले असून सुमारे एक हजार

हिंदू संस्थानिकांच्या वंशाच्या सनावळ्या व चित्र यांचाही एक सुंदर संग्रह लोकांना उपलब्ध करून दिला आहे. येवल्याचे व्यंगचित्रकार प्रभाकर झळके यांनीही त्यांच्या राहत्या घरातच पुराणवस्तूंचा संग्रह केलेला आहे. दहावी - बारावीच्या विद्यार्थ्यांपासून पदवी पदव्युत्तर पदवी अभ्यास मुलांपर्यत सर्वच विद्यार्थांना म्युझियम पर्यटन हा विषय करिअरसाठीही मैलाचा दगड ठरेल.

## छत्रपती शिवाजी महाराज संग्रहालय, मुंबई

येथे भारत, चीन, जपान आणि युरोप मधील कलांचे विविध नमुने पाहायला तर मिळतात, शिवाय निसर्ग इतिहासाचेही काही नमुने पाहता येतात. पाकिस्तानात असलेल्या गांधार प्रदेशातील बौद्धमठातील काही पुराणवस्तू तसेच हडप्पा आणि मोहेंजोदडो येथील उत्खननात आढळलेल्या सुमारे इ.स.पू. ३००० वर्षांपूर्वीचा इतिहास सांगणारी मातीची भांडी व खापरे आहेत. या संग्रहालयात प्रामुख्याने महाराष्ट्र, कर्नाटक, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, गुजरात आणि काश्मीर येथील शिल्पांचे संकलन आहे. काही इतर दालनांमध्ये चित्रांच्या लघुकृती, लाकडी, पाचूचे, हस्तिदंती, इ. विविध सजावटीचे साहित्य प्रदर्शित केलेले आहे. व्यापक वस्तूसंग्रहामुळे हे संग्रहालय अतिशय चित्तवेधक ठरते.

### कसे जाल?

संग्रहालय छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (मध्य रेल्वे) आणि चर्चगेट (पश्चिम रेल्वे) या दोन्ही प्रमुख रेल्वे स्थानकांपासून पायी २० मिनिटे अंतरावर आहे.

## भारतीय रिझर्व्ह बँकेचे मुद्रा संग्रहालय (मुंबई)

भारतीय चलनाचे अनेक वैशिष्ट्यपूर्ण आयाम जाणून घेण्याची उत्कृष्ट व्यवस्था रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या मुंबई येथील मुद्रा संग्रहालयाने केली आहे. प्राचीन सम्राटांच्या सोन्याच्या नाण्यांपासून ते अगदी सध्या प्रचलित असणाऱ्या ई-चलनापर्यंतच्या मुद्राजगताच्या मनोवेधक इतिहासाची झलक हे वस्तुसंग्रहालय आपल्याला यशस्वीपणे दाखवते.

मुद्रा संग्रहालय अनेक भागांमध्ये विभागलेले असून खरी नाणी, नोटा आणि तत्सम इतर चलन-प्रकारांच्या स्थिर आणि फिरत्या प्रदर्शनाद्वारे ते आपल्यासमोर सुमारे २,५०० वर्षांचा इतिहास जिवंत करते.

**वेळ:** सकाळी १०.४५ ते सायं. ५.१५. संग्रहालय सोमवार आणि बँकेच्या सुट्टीच्या दिवशी बंद असते. **प्रवेश:** सर्वांना मोफत.

### कसे जाल?

हे वस्तुसंग्रहालय मुंबईच्या मध्यवर्ती भागात आहे. रस्ता आणि रेल्वेमार्गाने येथे पोहोचणे सुकर आहे.

## केंद्रीय वस्तुसंग्रहालय (नागपूर)

१८६२ साली स्थापन झालेल्या या संग्रहालयात मध्यप्रदेश, छत्तीसगढ, विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्रातील काही भागात सापडलेल्या वस्तूंचा संग्रह करण्यात आलेला आहे. यामध्ये शिल्प, सतीची स्मारके, त्याबरोबरच प्रातिनिधिक स्वरूपात काही जीवाश्म, खनिजे, प्रागैतिहासिक आणि पूर्वेतिहासिक काळातील धातूची हत्यारे, मातीची भांडी, मणी, नाणी, कोरीव लेख, मानववंशशास्त्रीय वस्तू, स्थापत्याचे अवशेष, हस्तलिखिते, चित्रे, इ. चा समावेश होतो. हे वस्तुसंग्रहालय एकूण ११ दालनांमध्ये विषयवार विभागलेले आहे. एक विशेष दालन नागपूर शहराचा इतिहास प्रदर्शित करते. स्थानिक लोक या स्थळाला 'अजब बंगला' किंवा 'अजायब घर' म्हणून ओळखतात. केंद्रीय वस्तुसंग्रहालय नागपूर विधानभवनाच्या जवळ आहे. भेटीची वेळ सकाळी १० ते सायं. ५ वाजेपर्यंत असून ते सोमवारी आणि सार्वजनिक सुटीच्या दिवशी बंद असते.

### कसे जाल?

जवळचा विमानतळ आणि रेल्वे स्थानक नागपूर.

## राजा दिनकर केळकर वस्तूसंग्रहालय (पुणे)

कोणाच्याही मदतीशिवाय एकट्याने उभारलेल्या जगातील सर्वात मोठ्या वस्तुसंग्रहालयांपैकी एक म्हणून पुण्यातील राजा दिनकर केळकर वस्तुसंग्रहालय प्रसिद्ध आहे. या ठिकाणी नाजूक कशिदाकाम केलेल्या वस्त्रांपासून ते शिल्पांपर्यंत आणि तांब्याच्या प्राचीन भांड्यांपासून ते पेशव्यांच्या तलवारींपर्यंत कलेचे अनेक महत्त्वपूर्ण नमुने जतन करून ठेवण्यात आले आहेत. हे वस्तुसंग्रहालय प्रेक्षकांसाठी वर्षभर खुले असते.


### कसे जाल?

जवळचा विमानतळ आणि रेल्वे स्थानक पुणे.



राजा दिनकर केळकर वस्तुसंग्रहालय (पुणे)

वरिष्ठ अधिव्याख्याता, सर ज.ज.उपयोजित कला महाविद्यालय, मुंबई




**महाराष्ट्रात अनेक संस्थांनी प्रचंड काम करून ठेवले आहे. आदिवासी, अपंग, निराधार, एड्सग्रस्त, मूकबधिर, पीडित महिलांसाठी झटणारे हजारो हात आहेत ; परंतु त्यांचे काम सर्वांपर्यंत पोहोचत नाही. सामाजिक पर्यटनाच्या माध्यमातून अशा कर्तबगार व्यक्ती, संस्थांची नोंद घेता येऊ शकते. पर्यटक म्हणून अशा संस्थांचे काम जवळून पाहिले पाहिजे.**

# प्रेरणेची ऊर्जा

**डॉ. संभाजी खराट**

अलीकडे मोठ्या प्रमाणात पर्यटन व्यवसाय वाढीस लागला आहे. वर्षभरात कुठेतरी नवीन ठिकाणी कुटुंबासह जावे आणि काहीतरी वेगळे पाहिल्याचे समाधान मिळवावे, अशी भावना समाजात रुजू लागली आहे. फार पूर्वी पर्यटन म्हणजे उतारवयात तीर्थक्षेत्री जाऊन, आयुष्याचे सार्थक झाले असे समजणारी पिढी होती. परंतु आता पर्यटन घडवून आणणाऱ्या अनेक ट्रॅव्हल्स एजन्सीज निघाल्या आहेत. त्या वेगवेगळ्या देशी-विदेशी टूर आयोजित करून लोकांमध्ये पर्यटनाची आवड निर्माण करीत आहेत. खरे तर इलेक्ट्रॉनिक मीडियामुळे जग जवळ आले आहे. डिस्कव्हरी, स्टारवर्ल्ड, ॲनिमल प्लॅनेट, हिस्ट्री, ट्रॅव्हल्स वर्ल्ड आदी चॅनलच्या माध्यमांतून जगभरची ठिकाणे, अभयारण्ये, तेथील अद्‌भुत गोष्टी, परदेशातील खानपान, तेथील रूढी परंपरा, समाजजीवन घरबसल्या पाहायला मिळत आहे. विविध वृत्तपत्रे, मासिकांतून पर्यटनावर माहिती मिळत असते. बाजारात हजारो पुस्तके उपलब्ध आहेत. त्यामुळे पर्यटनाची आवड निर्माण होत आहे.

साधारणत: पर्यटनाला स्वत: किंवा टूर्स ट्रॅव्हल्समार्फत गेले की, धार्मिक स्थळे, गडकिल्ले, समुद्र किनारे दाखवले जातात. मात्र त्यापेक्षा आणखीही खूप

गोष्टी आपल्या आजूबाजूला असतात. त्या पाहण्याची गरज असते. काही संस्था अनेक समाजोपयोगी कामे करीत असतात. समाजातील गोरगरीब जनतेला आधार देत असतात. त्यांचे काम पाहणेही अगत्याचे ठरते. म्हणूनच अशा समाजसेवकांची ओळख करून घेणे, त्यांना मदत करणेही गरजेचे आहे. त्यासाठी जरा हटके, असे वेगळे सामाजिक पर्यटन करण्यास काय हरकत आहे. त्यामुळे समाजासाठी आजूबाजूस कोण काय करतेय हेही समजू शकेल. तर काहींना आपणही असे काहीतरी केले पाहिजे अशी प्रेरणाही मिळू शकेल.

## जागतिक पर्यटन संघटना

जागतिक पर्यटन संघटनेने धार्मिक पर्यटन, वन पर्यटन, वैद्यकीय पर्यटन, सांस्कृतिक पर्यटन, ऐतिहासिक पर्यटन, साहसी पर्यटन, इको पर्यटन, शैक्षणिक पर्यटन, आदी पर्यटन प्रकारांना मान्यता देऊन त्या संदर्भात काही मार्गदर्शक तत्त्वे प्रसृत केली आहेत. त्यामुळे जगभर या पर्यटन प्रकाराविषयी जनजागृती होऊन पर्यटनाला चांगले दिवस आले आहेत. परंतु आता त्यात आणखी एका पर्यटनाची भर पडली आहे. ते म्हणजे सामाजिक पर्यटन !

या विषयाकडे जागतिक पर्यटन संघटनेने अधिक लक्ष केंद्रित केले आहे. त्यामुळे येत्या काही वर्षात जगभर या सामाजिक पर्यटनाला महत्त्व प्राप्त होणार आहे. समाजातील ज्या लोकांना समाजकार्याची आवड आहे, समाजासाठी काहीतरी करण्याची इच्छा आहे अशांसाठी सामाजिक पर्यटन हा पर्याय निश्चितच खुला आहे. आपल्या महाराष्ट्रात अनेक ठिकाणी छोट्या-मोठ्या संस्था समाजासाठी काम करीत आहेत. समाजाच्या पाठिंब्यावरच त्यांची वाटचाल सुरू आहे. कुष्ठरोगी, अपंग मूकबधिर, एड्सबाधित स्त्रिया, मुले, अनाथ मुले, यांना आधार देणाऱ्या तसेच पीडित महिला, परित्यक्ता, कुपोषित बालके यांना सांभाळणाऱ्या संस्था आहेत. व्यसनमुक्ती केंद्रे, मोफत वसतिगृहे आहेत. अशा अनेक क्षेत्रात काम करणारी मंडळी आपल्या आजूबाजूला आहेत. त्यांचीही दखल या सामाजिक पर्यटनाच्या निमित्ताने घेता येऊ शकते.

महाराष्ट्राला थोर संतांची, समाजसुधारकांची, लेखक-कलावंतांची परंपरा आहे. लहानपणी शाळेत या थोरामोठ्यांच्या गोष्टी आपण वाचल्या. त्यांनी केलेले सामाजिक काम समजून घेतले. महाराष्ट्रातील प्रत्येक भागात या साऱ्या थोर व्यक्ती होऊन गेल्या. त्यांनी केलेले कार्य सर्वांनाच प्रेरणादायी आहे. या सामाजिक पर्यटनाच्या निमित्ताने त्यांच्याही गावाला, घराला स्मृतिस्थळाला, स्मारकाला भेट द्यायला काय हरकत आहे!

मुंबईत ऑगस्ट क्रांती मैदान, हुतात्मा स्मारक, मणीभवन, चैत्यभूमी हे तर पाहिलेच पाहिजे. त्याशिवाय युवक बिरादरी, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, गोरे ट्रस्ट आदींचे कामही समजून घेतले पाहिजे. नाशिकला गेलात तर दादासाहेब फाळके स्मारक, सावरकरांचे भगूर येथील स्मारक, कुसुमाग्रज प्रतिष्ठानला भेट दिली पाहिजे. तेथे चाललेले काम, उपक्रम समजून घेतले पाहिजेत. रायगड जिल्ह्यातील महाड येथे उभारलेले डॉ. आंबेडकर यांचे स्मारक, चवदार तळे पाहिले म्हणजे तत्कालीन इतिहास नजरेसमोर उभा राहतो. रत्नागिरी जिल्ह्यात गणपतीपुळ्याजवळ एक सुंदर खेडेगाव उभे केले आहे. प्राचीन कोकण असं त्याचं नाव. तेथे कोकणातील घरे, बलुतेदारी पद्धत, पारंपरिक व्यवसाय, लोककला हे सारे पाहिले म्हणजे कोकणच्या संस्कृतीची ओळख होते.

दापोलीमध्ये कृषी विद्यापीठामार्फत शेतकरी, बेरोजगारांसाठी अनेक उपक्रम सुरू केले आहेत. दापोलीजवळच मुरुड गाव आहे. तिथे स्त्रीशिक्षणाचे पुरस्कर्ते महर्षी कर्वे यांचे स्मारक आहे. 'जुने जाऊ द्या मरणा लागूनी' म्हणणारे, कवी केशवसुत यांचे घर मालगुंडमध्ये आहे, रत्नागिरीत टिळकांचे घर, सावरकरांची कोठडी आहे, अविष्कार नावाची मूकबधिरांसाठी काम करणारी संस्था आहे.

दाभोळ बंदर येथे आण्णासाहेब शिरगांवकर यांची शैक्षणिक आणि सामाजिक कार्य करणारी संस्था आहे. पर्यटक म्हणून तिथल्या संस्थाचे काम समजून घेतले पाहिजे. देवरूख इथल्या मातृमंदिर संस्थेने उभे केलेले खूप मोठे सामाजिक काम आहे. ज्यात मोठ्या प्रमाणात बचतगट स्थापन केलेले आहेत.




**बापू कुटी, सेवाग्राम, वर्धा**




ग्रामविकासाच्या अनेक योजना त्यांनी राबवून स्वयंपूर्ण खेडे करण्याकडे आपले लक्ष केंद्रित केले आहे. या संस्थेचे काम एक पर्यटक म्हणून पाहिलेच पाहिजे. दांडेकर कुटुंबाने केलेले कार्यही उल्लेखनीय आहे. चिपळूणच्या काटदरेंची कासव संवर्धन मोहीम, लांजाचा तेंडुलकर महिलाश्रम, डॉ. म्हसकरांचे कॅन्सर फाऊंडेशन, हे सारे प्रकल्प कोकणात गेल्यावर आवर्जून पाहिले पाहिजेत. पुण्यात गेल्यावर तिथे सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या अनेक संस्था आहेत. मुक्तांगणसारखी संस्था कित्येक वर्ष व्यसनमुक्तीचे काम करतेय. सकाळ फाऊंडेशनने अनेक सामाजिक उपक्रम सुरू केले, ते समजून घेता येतील. त्याचबरोबर लोकमान्य टिळक यांचा केसरी वाडा, महात्मा फुले यांचे राष्ट्रीय स्मारक, कर्वेंची हिंगणे येथील महिलांसाठीची संस्था, वनराई, यशदाचे विविध उपक्रम, अशा कितीतरी संस्था व स्मारके आपल्याला काम करण्याची नवी ऊर्मी व ऊर्जा देऊन जातात.

## स्मारकांचा खानदेश

खानदेश परिसरात अनेक महत्त्वपूर्ण संस्था, स्मारके आहेत. धुळ्यात राजवाडे संशोधन मंडळ आहे. नंदुरबारमध्ये शिरिषकुमार यांचे स्मारक, आसोदे येथे कवयित्री बहिणाबाई चौधरी यांचे स्मारक, अमळनेरमध्ये सानेगुरुजींचे स्मारक, तर धरणगाव येथे बालकवी ठोंबरे यांचे स्मारकही पाहता येते. औरंगाबाद ही मराठवाड्याची राजधानी. आशिया खंडातील वेगाने वाढणारे शहर म्हणून परिचित झाले आहे. या परिसरात कृषिभूषण विजयअण्णा बोराडे यांनी शेतकऱ्यांसाठी खूप चांगले काम उभे केले आहे. तसेच पाणलोट क्षेत्रात दिलासा संस्थेने केलेले काम पाहता येईल. अजिंठ्याजवळ पळसखेडा येथे निसर्ग कवी ना.धों.महानोर यांनी शेतीत केलेले विविध प्रयोग पाहण्यासारखे आहेत. अंबाजोगाई येथे मानवलोक संस्थेचे काम उल्लेखनीय आहे. अहमदनगर जिल्ह्यात अनेक सामाजिक उपक्रम सुरू आहेत. समाजसेवक अण्णा हजारे यांचे राळेगणसिद्धी हे तर देशातील एक 'मॉडेल' व्हिलेज बनले आहे. अण्णांनी पाणलोट क्षेत्रात, माहितीचा अधिकार, आदी क्षेत्रात केलेल्या कामाची दखल आंतरराष्ट्रीय पातळीवर घेण्यात आली आहे. याच जिल्ह्यात हिवरेबाजारचे पोपट पवार यांचे पाणलोट क्षेत्रातील कामही उल्लेखनीय आहे. हे काम प्रत्यक्ष जाऊन पाहिले पाहिजे. तसेच पारनेर येथील सेनापती बापट यांचे स्मारक, नेवासेजवळ तरवडीच्या मुकुंदराव पाटील स्मारक समितीचे कामही पाहता येते. पंढरपूरमध्ये एड्सग्रस्त मुलांसाठी काम करणाऱ्या प्रभा-हिरा प्रतिष्ठानचे काम उल्लेखनीय आहे. बार्शी तालुक्यात पन्नालाल सुराणा यांनी आपल्या संस्थेमार्फत शेतकऱ्यांसाठी विविध उपक्रम राबवले आहेत. तसेच अकलूजची आधुनिक पद्धतीने काम करणारी ग्रामपंचायत आहे. सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थांच्या प्रतिनिधींनी याकडे पर्यटन केंद्र म्हणून पाहिले पाहिजे.

## पश्चिम महाराष्ट्र अग्रेसर

कोल्हापूर तर अनेक सुधारणावाद्यांना, सामाजिक काम करणाऱ्यांना प्रेरणास्थान असलेले ठिकाण. छत्रपती शाहू महाराजांच्या विचारांचा अनेक सामाजिक संस्थांवर प्रभाव आहे. येथे महिलांच्या प्रश्नांवर, सामाजिक विषयांवर काम करणारी दिलासा संस्था, एड्सबाधित महिला व मुलांच्या पुनर्वसनासाठी काम करणारी झाडबुकेंची संवेदना संस्था आहे. शेतकरी, दूध संघाचे काम, वारणा वाईल्ड व्हिलेज आदी संस्थांनी उभे केलेले काम हे उल्लेखनीय आहे. सातारा जिल्ह्यात कर्मवीर भाऊराव पाटलांनी उभे केलेले सामाजिक काम, रयत शिक्षण संस्थेचे काम हे ऐतिहासिक कार्य आहे. कराडला महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांचे प्रीतिसंगमावर समाधिस्थळ आहे. नायगावला सावित्रीबाई फुले यांचे स्मारक, वाई येथे रा.ना.चव्हाण यांचे स्मारक, तर्कतीर्थ लक्ष्मण शास्त्री जोशींची प्राज्ञ पाठशाळा, यमुनाबाई वाईकर यांचे घर, विश्वकोश निर्मिती कार्यालय ही सारी



हेमलकसा, गडचिरोली

ठिकाणे पाहण्यासारखी आहेत. सांगली जिल्ह्यात माडगूळ गावी असलेले कवी ग. दि. माडगूळकरांचे स्मारक, वाटेगावचे शाहीर अण्णाभाऊ साठेंचे स्मारक पाहता येते. अमरावती मध्ये संत गाडगे महाराजांची समाधी, मोझरी येथे राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची समाधी, हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ हे सारे पाहिले म्हणजे या थोर महात्म्यांनी केलेल्या सामाजिक कामांची उजळणी होते. आपल्याला प्रेरणा मिळते. वर्धा जिल्ह्यात सेवाग्राम येथील बापू कुटी, पवनार येथील विनोबा भावे यांचा आश्रम, त्यांनी केलेले भूदान चळवळीतील कार्य लगेच लक्षात येते. तसेच वर्धा येथील राष्ट्रभाषा प्रचार समितीचे केंद्र आवर्जून पाहिले पाहिजे. मेळघाटमध्ये कोल्हे दाम्पत्यांनी केलेले काम आवर्जून पाहिले पाहिजे.

नागपूरमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लाखो दलित बांधवांना बौद्ध धर्माची दीक्षा ज्या ठिकाणी दिली ते दीक्षाभूमी ठिकाण, रामटेकचे कवी कालिदास संस्कृत विद्यापीठ आवर्जून पाहिले पाहिजे. पुढे चंद्रपूर जिल्ह्यात समाजसेवक बाबा आमटेंनी उभे केलेले



मराठी विश्वकोश कार्यालय, वाई



हिवरे बाजार

आनंदवन, मूल येथील सोमनाथ प्रकल्प, गडचिरोली जिल्ह्यातील हेमलकसा येथे डॉ. प्रकाश आमटेंनी सुरू केलेले विविध प्रकल्प, याच जिल्ह्यात डॉ. अभय बंग आणि डॉ. राणी बंग यांनी आदिवासींसाठी सुरू केलेले सर्च संस्थेचे काम हे समाजासाठी उपयुक्त आहे. त्यांच्या शोधग्रामला भेट देता येईल. गोंदिया जिल्ह्यातील धाबेपवनी येथील मारोती चितमपल्ली आणि माधवराव पाटील यांनी साकारलेले अभिनव असे निसर्ग वाचन केंद्र पर्यटकांनी जरूर पाहावे. म्हणूनच पर्यटन करताना ज्या जिल्ह्यात, तालुक्यात, गावांत आपण जाणार आहोत. तिथली माहिती घेतली पाहिजे. तेथे कोणते उपक्रम सुरू आहेत हे समजून घेऊन भेट दिली पाहिजे. त्याचा उपयोग हा सामाजिक कामाच्या वाढीस नक्कीच होतो. संस्थेच्या कार्यकर्त्यांनाही आपण केलेल्या कामाची नोंद कुणीतरी घेत आहे, लोकांच्या गाठीभेटी होत आहेत हे पाहून, काम करण्याचा हुरूप येतो.

## पॅकेज टूर्स

महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात, वाड्यावस्तींवर, डोंगर दऱ्याखोऱ्यात अनेक शेतकरी, कार्यकर्ते नवनवीन प्रयोग करीत आहेत. तेथे छोट्या छोट्या संस्था अनेक उपक्रम राबवून समाजाच्या विकासासाठी झटत आहेत. कुठे एखाद्या सामाजिक प्रश्नावर सर्वेक्षणाचे काम सुरू आहे, तर कुठे शेतकरी, बेरोजगारांसाठी कार्यशाळा सातत्याने सुरू आहेत. कुठे ना कुठे संस्था झटत आहेत. त्या प्रत्येकाचीच दखल घेणे विस्तार भयास्तव टाळले आहे. खरे तर त्यांचे हे काम सर्वदूर गेले पाहिजे. अशा अनेक संस्था उभ्या राहिल्या तर समाजाचा विकास झपाट्याने होईल. म्हणूनच पर्यटन संस्था, एजन्सीज यांनी इतर सहली बरोबरच सामाजिक संस्थांना भेटी देण्यासाठी 'पॅकेज टूर्स' सुरू केल्या पाहिजेत. पर्यटकांना कुठे काय उपक्रम सुरू आहेत. हे सांगितले पाहिजे. लिखित स्वरूपात घडीपत्रिका, पुस्तिका, पॅम्पलेटच्या स्वरूपात पर्यटकांना माहिती दिली पाहिजे. तरच अशा सामाजिक पर्यटनाला चांगले दिवस येतील. सामाजिक पर्यटनाची आवड निर्माण होईल. त्यासाठी समाजकार्याची आवड असणारे अनेकजण छोट्या छोट्या ग्रुपने एकत्र येऊन सहज फिरू शकतात. संस्थेचे कामकाज, माहिती समजून घेऊ शकतात. त्यामुळे आपापसात देवाणघेवाण वाढून एक चांगले नेटवर्क तयार होऊ शकेल. म्हणूनच आता सामाजिक पर्यटनाची गरज मोठ्या प्रमाणात निर्माण झाली आहे. (पुनर्मुद्रण : लोकराज्य २००९)

**उपसंचालक, प्रकाशने**

**मुलाने डॉक्टर व्हावे हे वडिलांचे स्वप्न... थोरला भाऊ डॉक्टर आणि बहिणी शिक्षिका... अशा सुशिक्षित आणि अनुकूल वातावरणात वाढलेल्या प्रसाद हनुमंतराव वरवंटकर यांनी एमबीबीएस केले. पण, त्यांच्यातील निर्णयक्षमता आणि स्वत:च्या क्षमतेला वाव करून देण्याच्या इच्छाशक्तीने त्यांना प्रशासनात आणले. यूपीएससीत पहिल्याच प्रयत्नात त्यांनी ३१६ व्या रँकसह भारतीय राजस्व सेवा (आयआरएस) मिळवली. प्रशिक्षणानंतर त्यांनी अहमदाबाद येथे दोन वर्षे सहायक आयुक्त (वस्तू व सेवा कर) म्हणून काम पाहिले. सध्या ते सुरत येथील हजीरा पोर्ट येथे उपायुक्त म्हणून कार्यरत आहेत.**

# स्वत:ची क्षमता ओळखा...

महाविद्यालयीन शिक्षण व डॉक्टर होईपर्यंत आपण पुढील करीअरची वेगळी वाट तुडवून काढू असे वाटले नव्हते. सर्वसामान्य विद्यार्थ्यांप्रमाणे मीदेखील वडिलांच्या इच्छेप्रमाणे सोलापूर येथील वैशंपायन वैद्यकीय महाविद्यालयातून २०१२ मध्ये एमबीबीएस पूर्ण केले. २०१२ ते २०१३ दरम्यान सिव्हिल हॉस्पिटलमध्ये मेडिकल ऑफिसर म्हणून नोकरी केली. त्यादरम्यान प्रशासनाशी जवळून संबंध आला. प्रशासनाच्या भूमिका, जबाबदाऱ्या आणि अधिकारांची जाणीव व ओळख झाली.



**प्रसाद वरवंटकर**
रँक- ३१६, भारतीय राजस्व सेवा

## टर्निंग पॉइंट

वैद्यकीय सेवेपेक्षा आपण प्रशासकीय सेवेत आलो तर जनतेची अनेक प्रकारे आणि व्यापक स्वरूपात सेवा करता येऊ शकते हे कळल्यानंतर मी यूपीएससीकडे वळलो. वैद्यकीय अधिकारी म्हणून काम पाहत असताना जिल्ह्यात एक मोठा अपघात झाला होता. अनेक जण जखमी झाले तर काहींना प्राण गमवावा लागला. तेव्हा जिल्हाधिकारी, पोलीस अधिकाऱ्यांनी रुग्णालयात धाव घेतली होती. त्यांची कमिटमेंट, निर्णय आदींबाबत मी भारावून गेलो. खरं तर हाच माझ्या वेगळ्या वाटेसाठी टर्निंग पॉइंट ठरला. प्रशासकीय सेवेत येऊन आपल्या क्षमतांचा अधिक वापर करून खूप काही करता येते, असा विश्वास मनात जागृत झाला आणि बस्स! प्रशासकीय सेवेत येण्याचा निर्णय पक्का केला. मी डॉक्टरकीच करावी, पुढील पदव्युत्तर शिक्षण घ्यावे, अशी आईवडिलांची इच्छा होती. तरी त्यांनी माझ्यावर विश्वास दाखवून मला या नव्या ध्येयासाठी प्रोत्साहन दिले.

## अभ्यासातील सातत्य

केंद्रीय लोकसेवा आयोगाची परीक्षा देण्याचा निर्णय पक्का झाल्यानंतर वैद्यकीय सेवेत असतानाच म्हणजे जानेवारी २०१३ पासून मी अभ्यास सुरू केला. नोकरी व अभ्यास यातील ताळमेळ मी साधून मे २०१३ मध्ये यूपीएससीची पूर्वपरीक्षा दिली. नोकरी करून अभ्यास केल्यामुळे माझी आर्थिक निकड भागली. योग्य नियोजन करून अभ्यासात सातत्य ठेवल्याने पूर्वपरीक्षा चांगली गेली.

## स्वावलंबी शिक्षण

आपला खर्च आपण स्वत: कमावून भागवायचा, असा माझा नेहमी प्रयत्न राहिला आहे. यूपीएससीची तयारी करताना मेडिकल ऑफिसर म्हणून नोकरी केली आणि मुख्य परीक्षा दिल्यानंतर पुन्हा डिसेंबर २०१३ ला मुंबईत परत येऊन भाभा ॲटोमिक रिसर्च सेंटरमध्ये मेडिकल ऑफिसर म्हणून नोकरी सुरू केली. आपल्याला मुलाखतीचा कॉल येईल, असा विश्वास मला होता. त्यामुळे नोकरी करत असताना वेळेचे नियोजन करून मी मुलाखतीच्या तयारीसाठी किमान चार ते पाच तास राखून ठेवले होते. त्यामुळे नोकरी करूनही मला मुलाखतीची संपूर्ण तयारी करता आली.

## स्वत:ला दिलेली कमिटमेंट

यूपीएससीच्या २०१३ च्या परीक्षेत मी ३१६ व्या रँकसह यशस्वी झालो याचा आनंद गगनात न मावण्यासारखाच होता. पण ही एक आईवडिलांना आणि मला स्वत:ला मी दिलेली कमिटमेंटसुद्धा होती. यूपीएससीची तयारी करताना मी प्रत्येक वेळी येणारी पहिली पायरी अभ्यासपूर्वक पूर्ण करत गेलो. एक पायरी पूर्ण झाली की, मी लगेच नंतरच्या तयारीला लागायचो. अगदी सांगायचे झाले तर परीक्षेसाठी पर्यायी विषय कोणता निवडायचा हेदेखील मी ठरवलेले नव्हते. समोर जी टास्क आपण निवडली आहे ती फक्त चांगल्या पद्धतीने पूर्ण करायची

एवढेच डोळ्यासमोर असायचे. मेडिकल सायन्सचा माझा अभ्यास महाविद्यालयीन शिक्षणादरम्यानच झालेला असल्याने मी हाच विषय निवडला आणि त्याला मला फायदाही झाला.

## मार्गदर्शनाबरोबरच स्वअभ्यास महत्त्वाचा

पूर्वपरीक्षा पास होण्याचा आत्मविश्वास असल्याने मी मुख्य परीक्षेच्या तयारीकरिता सहा महिने दिल्लीला गेलो. तेथे मार्गदर्शन घेतले. पहिला प्रयत्न असल्याने सहाजिक अभ्यास अधिक अपेक्षित होता. त्याप्रमाणे नियोजन केले. दहा ते बारा तास अभ्यास केला. मुख्य परीक्षा दिली. पेपर चांगला गेला आणि कळले की तयारीसाठी दिल्लीला आलेच पाहिजे होते असे नाही. योग्य मार्गदर्शनानंतर विशिष्ट पद्धतीने स्वत: अभ्यास केला तर सहज यश मिळू शकते.

आपल्या तयारीला दिशा मिळाली तर शिकवणी वर्गाची आवश्यकता राहत नाही. अभ्यासक्रम समजून घेऊन, कशी तयारी करायला हवी हे आपले आपणच अधिक ठरवू शकतो. आपला कुठल्या विषयाचा अभ्यास आहे, कुठल्या विषयाला अधिक वेळ देणे गरजेचे आहे हे आपले आपणच अधिक चांगले ठरवू शकतो. त्यामुळे अभ्यासक्रम समजून घेत स्वत: अभ्यास केला तरी यशाचा मार्ग सुकर होतो.



पहिलाच प्रयत्न असल्याने अभ्यासाचे तास अधिक होते. त्यामुळे अभ्यासाचा ताण घालवण्यासाठी मी आठवड्यातून एकदा एक चित्रपट बघायचो. अभ्यासाचा ताण घालवण्याचे आपल्याकडे एकतरी माध्यम हवे. त्यासाठी आवड, छंद जोपायला हवा. मुख्य परीक्षेच्या तयारीदरम्यान मी स्वत: स्वत:ला प्रोत्साहित करत होतो. त्यामुळे अभ्यासाचा ताण जाणवला नाही. याचा परिणाम असा झाला की पूर्वपरीक्षेसाठी पाच ते सहा आणि मुख्य परीक्षेसाठी दहा ते बारा तास मी अभ्यास करून यश प्राप्त करू शकलो.

## मोलाचे मार्गदर्शन

यूपीएससीची तयारी करताना मला मित्रांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले. माझ्यासोबतच भारतीय राजस्व सेवा मिळालेला विविक भस्मे या मित्राचे आणि डेप्युटी सीइओ ओम रामावत यांचे मोठ्या भावाप्रमाणे मला मार्गदर्शन मिळाले. मात्र स्वअभ्यास तितकाच महत्त्वाचा ठरला. आपण सर्वप्रथम आपल्याला काय योग्य आहे, आपण कशाचा अधिक अभ्यास करायला हवा, कुठल्या गोष्टी आपल्यात कमी आहेत, कुठल्या जमेच्या बाजू आहेत, आपल्या एकूण ज्ञानाची खोली किती आहे हे आपण आत्मपरीक्षण करून स्वत: लक्षात घ्यायला हवे आणि त्यानुसार तयारी करायला हवी. बाजारात असंख्य पुस्तके असतात परंतु त्यापैकी कोणते वाचायचे आणि त्यातही त्या पुस्तकातील नेमकी कोणती व किती माहिती वाचायची हे आपण ठरवायला हवे. पुस्तक हातात घेतल्यानंतर ते सुरुवातीपासून शेवटपर्यंत वाचायचे हा ग्रह मनातून काढून टाकायला पाहिजे. काय वाचावे व काय वाचू नये हे समजले म्हणजे आपला बराच वेळ वाचतो. यायोगे कमी वेळेत परिपूर्ण तयारी करता येते. शिवाय यूपीएससीच्या अभ्यासक्रमानुसारच अभ्यास करण्यावर भर द्यावा. एकाच मुद्द्यासाठी अनेक पुस्तकांचे वाचन टाळावे आणि वाचले तरी स्वत:चे टिपण काढून परीक्षेपूर्वी त्याची उजळणी करावी.

**राजाराम देवकर**
उपसंपादक

## यशाची सूत्रे

● स्वत:ला लागू होईल अशी अभ्यासपद्धती अवलंबवावी. ● आपला किती अभ्यास झाला आहे आणि किती बाकी आहे याचा काटेकोर ताळेबंद ठेवावा. ● दर्जेदार पुस्तके वाचावी. एखाद्या पुस्तकातील काही भाग आपल्याला माहीत असला तर तो पुन्हा वाचत बसण्यापेक्षा आपल्याला जे माहीत नाही तेवढेच वाचावे. अनेक पुस्तके वाचत बसल्यामुळे वेळ पुरत नाही. ● पुस्तके पुन्हापुन्हा वाचण्याचे टाळावे. त्यातील टिपण काढून त्याची उजळणी करावी. ● आपल्या चुका शोधून काढा. गुण कमी येण्याची कारणे शोधून ती दूर करा. ● अभ्यासक्रम आणि वेळ याचं योग्य नियोजन करा. एका दिवसात किती अभ्यास करायचा हे ठरवा. एखादा दिवस वाया गेला तर त्या दिवसाची अभ्यासाची तूट भरून काढा. यामुळे अभ्यास पूर्ण होऊन शेवटच्या दिवसात ताण येत नाही. पूर्ण दिवसादिवसाचे नियोजन करा. ● मुख्य परीक्षेसाठी लिखाणाचा सराव करावा. ● आठवड्यातून एक तरी पेपर सोडवावा. ● अभ्यासक्रमाबाहेरचे अनावश्यक साहित्य वाचणे टाळावे. ● शेवटी उजळणी आवश्यक ● सामान्य अध्ययनाचे पेपर एकमेकांशी जोडलेली असतात. त्यासंबंधीची प्रकरणे एकत्र वाचावीत. ● वर्तमानपत्रातील कोणतीही माहिती वाचताना तिचा अभ्यासक्रमाशी संदर्भ शोधावा. ● वेळोवेळी वरिष्ठांचे मार्गदर्शन घ्यावे.



माहिती व जनसंपर्क महासंचालनालयात लोकसभा निवडणूक २०१९ च्या अनुषंगाने उभारण्यात आलेल्या माध्यम प्रतिसाद केंद्राला भेट देऊन पाहणी करताना अपर मुख्य सचिव तथा मुख्य निवडणूक अधिकारी अश्वनी कुमार.

# सुरळीत आणि सुरक्षित

**अश्वनी कुमार**
अपर मुख्य सचिव व मुख्य निवडणूक अधिकारी

लोकशाहीचा सर्वात मोठा उत्सव असलेल्या लोकसभा निवडणूक २०१९ मधील राज्यातील चौथ्या टप्प्याचे मतदान २९ एप्रिल रोजी १७ मतदार संघात अत्यंत उत्साहात पार पडले. गेले काही महिने मुख्य निवडणूक अधिकारी यांचे कार्यालय, सर्व जिल्हाधिकारी, पोलीस अधिकारी संबंधित यंत्रणेने रात्रंदिवस झोकून देऊन काम केले आहे. १०१ वर्षाच्या वयोवृद्ध मतदारांपासून ते १८ वर्षाच्या नवमतदारांपर्यंतचे जागरूक आणि आपल्या कर्तव्याप्रति जागरूक असलेले नागरिक उत्साहाने मतदान केंद्रावर येत होते. अधिकाधिक मतदारांनी मतदान करावे यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्नशील होतो. त्यासाठी वेगवेगळ्या माध्यमांचा प्रभावीपणे वापर केला. दिव्यांग मतदार, वृद्ध मतदार, तृतीयपंथी मतदारांनी निवडणूक प्रक्रियेत सहभागी व्हावे यासाठी आम्ही केलेल्या प्रयत्नांना निश्चितच चांगले यश आले. दिव्यांगांसाठी सर्व सुविधा आम्ही उपलब्ध करून दिल्या. महिलांमार्फतच काही निवडणूक केंद्रात सर्व कामे करण्यात आली. अशी अनेक 'सखी' केंद्रे आकर्षकरीत्या सजवण्यात आली होती. फुले, फुगे, गालिचे, कमानी यांनी या महाउत्सवाचे रूप आणखी देखणे केले. अनेक ठिकाणी 'सेल्फी पॉइंट' उभारून, नवमतदारांपासून सर्वांनाच, मतदान केल्यानंतरचा आनंद मोबाइलमध्ये टिपून घेण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. ॲम्बयुलन्स, व्हीलचेअर, टॅक्सी, रॅम्प आणि डोली अशा अनेक सुविधा मतदान केंद्रात पुरवण्यात आल्या.

**महाराष्ट्रातील लोकसभा निवडणुकीच्या चारही टप्प्याचे मतदान सुरळीतरीत्या पार पडले. सर्व यंत्रणांनी प्रभावीरीत्या या निवडणुकीचे व्यवस्थापन व संनियंत्रण केले.**

## काटेकोर अंमलबजावणी

सूक्ष्म नियोजन आणि त्याप्रमाणे काटेकोर अंमलबजावणी यामुळेच महाराष्ट्रातील निवडणुका अत्यंत सुरक्षितपणे पार पडल्या. मॉक व्होटिंगच्या वेळेस काही अत्यल्प समस्या सोडल्यास

ईव्हीएम यंत्र अत्यंत कार्यक्षमतेने कार्यरत होती. व्हीव्हीपॅट यंत्रणेबद्दल कोणतीही समस्या निर्माण झाली नाही.

भारत निवडणूक आयोग यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या कार्यालयामार्फत गेले काही महिने डोळ्यात तेल घालून काटेकोररीत्या निवडणुकीची पूर्व तयारी केली जात होती. निवडणूक घोषित झाल्यानंतर तर हे कार्यालय जवळपास २४ तास कार्यरत होते. २४ तास सुरू असणारे नियंत्रण कक्ष सुरू करण्यात आले. मतदारांच्या कोणत्याही समस्यांचे निराकरण करण्यासाठी हेल्पलाइन प्रभावीरीत्या कार्यरत होती. सी-व्हिजिल हे ॲपही उपलब्ध करून देण्यात आले. समाजमाध्यमे, इलेक्ट्रॉनिक माध्यमे आणि वृत्तपत्रे यामध्ये निवडणूकविषयक येणाऱ्या नकारात्मक बातम्या/मते यांच्यावर लक्ष ठेवण्यासाठी २४ तास सुरू असणारे माध्यम प्रतिसाद केंद्र (मीडिया मॉनिटरिंग सेंटर) उभारण्यात आले. या केंद्रातून आलेल्या माहितीच्या अनुषंगाने तत्काळ प्रतिसाद देण्यात आला. निवडणूक पारदर्शक व्हावी आणि कोणत्याही शंकेला वाव राहू नये, यासाठी सतत दक्षता घेण्यात आली.



## मतदार यादी

२०१९ या वर्षी होणारी निवडणूक विचारात घेऊन जानेवारी २०१८ पासून मतदार यादी शुद्ध व अद्ययावत करण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात आले आहेत. मतदारांमध्ये जागृती निर्माण करणे आणि त्यांचा सहभाग वाढवणे याकरिता 'स्विप'अंतर्गत विविध उपक्रम हाती घेण्यात आले. त्याचा खुप चांगला परिणाम झाला. जानेवारी २०१८ ते आजपर्यंत सुमारे दीड कोटीहून (१,५७,५१,६९९) अधिक अर्ज निकाली काढण्यात आले. त्यामध्ये नमुना अर्ज क्र. ६ अन्वये एकूण ६७ लाख ३१ हजार २९९ इतके मतदार नव्याने जोडले आहेत, तर ५६ लाख ५ हजार ६३६ इतक्या मतदारांच्या नोंदींमध्ये दुरुस्ती करण्यात आली आहे. याव्यतिरिक्त १७ लाख १६ हजार ६५४ इतक्या मतदारांची नावे वगळण्यात आली आहेत. एका वर्षात मतदार यादीत यापूर्वी कधीही एवढे मोठे काम झालेले नाही, ही बाब विशेष नोंद घेण्यासारखी आहे.

## प्रशिक्षण

निवडणूक प्रक्रिया राबवणे ही सर्वात मोठी अत्यंत अवघड बाब असते. त्यासाठी लाखो व्यक्तींची गरज भासते. सुरक्षा यंत्रणेची गरज भासते. निवडणूक प्रक्रियेतील व्यक्तींना काही प्रशिक्षण द्यावे लागते. निवडणुकीसाठी लागणारे साहित्य उदा. ईव्हीएम मशिन, व्हीव्हीपॅट मशिन, शाई, लाख, वाहने आदींचा पुरवठा अत्यंत काळजीपूर्वक करावा लागतो. यात कोणतीही हेळसांड करून चालत नाही. शिवाय कोणतीही आणीबाणीची परिस्थिती उद्‌भवल्यास, पर्यायी व्यवस्थेचे नियोजन करून ठेवावे लागते. निवडणूक प्रक्रियेतील कोणतीही शृंखला (लिंक) कमकुवत राहणार नाही, याकडे लक्ष पुरवावे लागते, आम्ही या नियोजनात आणि व्यवस्थापनात कुठेही कमी पडलो नाही, त्यामुळे निवडणुकीचा प्रत्येक टप्पा यशस्वीरीत्या पार पडला.

या निवडणुकीत प्रत्यक्ष सहभाग असलेल्या सर्व जिल्हाधिकारी व त्यांच्या आधिपत्याखालील यंत्रणा, पोलीस अधीक्षक व त्यांच्या आधिपत्याखालील यंत्रणेवर अतिशय ताण असतो. पण महाराष्ट्रातील या दोन्ही यंत्रणांनी हा ताण अत्यंत समर्थपणे सहन केला आणि निवडणूक प्रक्रिया सुरळीतपणे पार पडली. यातून त्यांचे प्रशासकीय कौशल्य, नियोजन, कार्याच्याप्रति असलेली निष्ठा आणि प्रोफेशॅनलिझम दिसून येते, याबद्दल या यंत्रणा अभिनंदनास पात्र आहेत. शिक्षक, अंगणवाडी सेविका, डॉक्टर्स इतर विभागातील अधिकारी आणि कर्मचारी यांनीही निवडणुकीत आपले कर्तव्य उत्तमरीत्या बजावले. या निवडणूक प्रक्रियेत सहभागी असलेल्या लहानातल्या लहान घटकांपासून ते सर्वात मोठ्या घटकाच्या सजगतेमुळे आणि सक्रियतेमुळे लोकसभा निवडणूक २०१९ ची प्रक्रिया प्रभावीपणे व यशस्वीरीत्या पार पडली आहे.

## मतदानासाठीचे आवाहन

आम्ही वेळोवेळी अधिकाधिक मतदारांनी मतदान करावे, यासाठी आवाहन केले होते. ग्रामीण भागात आणि विशेषत: नक्षलग्रस्त परिसर, आदिवासीबहुल क्षेत्र, दुर्गम डोंगराळ भाग येथे अनेक अडचणी असूनसुद्धा नागरिकांनी भरभरून मतदान केले. शहरी भागातील मतदारांनी याचा आदर्श घ्यावा, असे आवाहन आम्ही केले. या आवाहनाला शहरी भागात आणि विशेषत: मुंबईत चांगला प्रतिसाद मिळाला. २०१४ च्या निवडणुकीपेक्षा २०१९ च्या निवडणुकीत अधिक मतदारांनी आपला हक्क बजावला. निवडणुकीची सुटी, पर्यटन किंवा मौजमजेसाठी न घालवता बहुसंख्य शहरी मतदारांनी मतदान केले हे चित्र मनाला उभारी देणारे आहे. याबद्दल आम्ही सर्व मतदारांचे मनापासून आभारी आहोत.

## सरासरी ६०.६८ टक्के मतदान

महाराष्ट्रातील लोकसभेच्या सर्व ४८ जागांसाठी मतदानाचा कार्यक्रम सुरळीतपणे पार पडला.



**आदिवासी क्षेत्रात मतदानासाठी महिलांची लागलेली रांग.**




चार टप्प्यांत एकूण सरासरी ६०.६८ टक्के इतके मतदान झाले. एकूण ८ कोटी ८५ लाख ६४ हजार ९८ इतक्या मतदारांपैकी ५ कोटी ३७ लाख ४१ हजार २०४ इतक्या मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला.

२०१४ च्या तुलनेत विचार केल्यास मतदानाचे प्रमाण सारखेच राहिले.

पहिल्या टप्प्यात ७ मतदारसंघासाठी ६३.४६ टक्के, दुसऱ्या टप्प्यातील १० मतदारसंघांसाठी ६२.८८ टक्के, तिसऱ्या टप्प्यातील १४ मतदारसंघांसाठी ६२.३६ टक्के तर चौथ्या आणि शेवटच्या टप्प्यातील १७ मतदारसंघांमध्ये अंदाजे ५७ टक्के मतदान झाले.

सी-व्हिजिल ॲपवर ४ हजार १३ तक्रारी प्राप्त झाल्या असून, त्यापैकी २ हजार २४४ तक्रारी योग्य असल्याने त्यावर कारवाई करण्यात आली. महाराष्ट्र निवडणूक अधिकारी यांच्या संकेतस्थळावर मतदार यादीत नाव शोधण्यासाठी मतदानाच्या एका दिवशी सुमारे १ कोटी ९९ लाख हिट्स झाल्या.

## मतदारांमध्ये उत्साह

२०१९ या वर्षी होणारी निवडणूक विचारात घेऊन जानेवारी, २०१८ पासून मतदार यादी शुद्ध व अद्ययावत करण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात आले. मतदारांमध्ये जागृती निर्माण करणे आणि त्यांचा सहभाग वाढवणे याकरिता 'स्वीप'अंतर्गत विविध उपक्रम हाती घेण्यात आले. त्याचा चांगला परिणाम झाला. उन्हाळ्याचे दिवस असूनही मतदानाच्या सर्वच टप्प्यांमध्ये मतदारांमध्ये उत्साह दिसून आला. शहरी भागांमध्ये मतदारांनी तसेच सेलेब्रिटीज यांनी अतिशय उत्साहाने भाग घेऊन मतदान केले. महाराष्ट्रामध्ये गडचिरोली-चिमूर मतदारसंघात सर्वात जास्त म्हणजे ७१.९८ टक्के इतके मतदान झाले, तर कल्याण मतदारसंघात सर्वात कमी ४४.२७ टक्के मतदान झाले.

## मनुष्यबळ

संपूर्ण निवडणूक प्रक्रिया पार पाडण्याकरिता सुमारे ७ लाख ४९ हजार ३७४ कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली होती. तसेच कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी सुमारे २ लाख २५ हजार पोलिसांची नियुक्ती करण्यात आली होती. या वेळी राज्यामध्ये प्रथमच प्रत्येक मतदान केंद्रावर ईव्हीएमसोबतच व्हीव्हीपॅटचा वापर करण्यात आला. त्याकरिता एकूण १ लाख ८५ हजार ८५० बॅलेट युनिट (बीयू), १ लाख १७ हजार १३९ कंट्रोल युनिट (सीयू) आणि १ लाख २३ हजार २०६ व्हीव्हीपॅट वापरण्यात आले.

## निवडणूक प्रक्रियेची पाहणी

लोकसभा निवडणुकीतील मतदान व निवडणूक प्रक्रियेची प्रत्यक्ष पाहणी ऑस्ट्रेलियन हाय कमिशनच्या शिष्टमंडळाने मुंबईत केली. त्यांनी मुंबई शहर जिल्हाधिकारी कार्यालयास भेट दिली. तसेच मतदान केंद्रावर जाऊन मतदान यंत्रणेची पाहणी केली. या शिष्टमंडळाने कफ परेड येथील मतदान केंद्रास व जयहिंद कॉलेज येथे असलेल्या सखी मतदार केंद्रास भेट दिली. मतदान केंद्रावर उपस्थित तरुण मतदारांशी संपर्क साधला. मतदान केंद्रावरील रांगा तसेच तेथील प्रक्रिया पाहून निवडणूक यंत्रणेची प्रशंसा केली. भारत निवडणूक आयोगामार्फत ही विशेष भेट आयोजित करण्यात आली होती.

## प्रसारमाध्यमांची सकारात्मक भूमिका

लोकशाहीला बळकट करण्यासाठी सर्व प्रसारमाध्यमे महत्त्वाची भूमिका बजावतात. या निवडणुकीतही त्यांनी अत्यंत सकारात्मक भूमिका बजावली. मतदारांना त्यांच्या कर्तव्याप्रति जागरूक व्हावे म्हणून लोकशिक्षणाचे काम केले. निवडणूक प्रक्रियेत ज्या काही त्रुटी त्यांना आढळून आल्या, त्याचे चित्रण करून व वर्तमानपत्रात त्याची माहिती देऊन आम्हाला सजग केले. त्यामुळे वेळेवर सुयोग्य निर्णय व कार्यवाही करता येणे शक्य झाले. माध्यमांची ही सकारात्मक भूमिका यंदाची निवडणूक प्रक्रिया यशस्वी करण्यात महत्त्वाची ठरली आहे. त्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत. सर्वांचे मनापासून सहकार्य असेल आणि सर्वांनी एकदिलाने व एकनिष्ठेने कार्य केले तर कोणतीही अवघड बाब सोपी होते आणि यश मिळायला कठीण जात नाही. लोकशाहीचा हा सर्वात मोठा उत्सव यशस्वी झाला याचे श्रेय महाराष्ट्राच्या संपूर्ण नागरिकांना, प्रशासकीय यंत्रणेला आणि माध्यमांना आहे. यातच आपल्या लोकशाहीचे सामर्थ्य दडले आहे. या सामर्थ्याच्या बळावर देश अधिक उंची आणि प्रगती साध्य करण्यास सज्ज झाला आहे.


**मतदान करून आल्यानंतर दिव्यांग महिला.**


# ताडोबातील वनभ्रमंतीचा आनंद...



स्वच्छंद वावर करताना अस्वल



इंडियन पाँड हेरॉन



गरुड (चेंजेबल हॉक ईगल)

छायाचित्र : ऋता कळमणकर (वन्यजीव छायाचित्रकार)

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2018-20
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 12th to 17th Every Month
Date of Publication : 10th of Every Month




Visit: www.mahanews.gov.in | Follow Us: /MahaDGIPR | Like Us: /MahaDGIPR | Subscribe Us: /MaharashtraDGIPR

प्रति/TO

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

*If undelivered, please return to:*

प्रेषक / From

मीनल जोगळेकर
वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
लोकराज्य शाखा, ठाकरसी हाऊस, २रा मजला, मुंबई पोर्ट ट्रस्ट, पोर्ट हाऊसजवळ, शुरजी वल्लभभाई मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई – ४०० ००१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक मीनल जोगळेकर, वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी डिलिजंट मीडिया कॉर्पोरेशन लि., प्लॉट नं. ईएल /२०१, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, महापे, नवी मुंबई – ४०० ७०४ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक: ब्रिजेश सिंह